
**4**

प्रारंभिक

**वैचारिक कार्यकर्ता**

– जयंत पाटील




**5**

प्रबंध संपादकीय

**आव्हाने संकटांची!**

– दिलीप वळसे पाटील



**6**

संपादकीय

**संकटाचे संधीत रुपांतर**

– डॉ. सुधीर भोंगळे



**10**

**काढावीच लागतील अतिक्रमणे पूररेषेतली**

**जलसंपदामंत्री जयंत पाटील यांची पूरप्रश्नासंबंधी डॉ. सुधीर भोंगळे यांनी घेतलेली विशेष मुलाखत**



**20**

**प्रणब मुखर्जी : राजकारणाचा चालता बोलता संदर्भ ग्रंथ**

– **गहिनीनाथ**



**26**

**नाही अचानक, ना अतर्क्य पण अनपेक्षितच!**

– **अभय टिळक**




**34**

**राजकीय पक्षांसाठी रचनात्मक कार्यक्रम**

– **प्रा. नीळकंठ रथ**




**46**


**अर्थव्यवस्थेवर दाटून आलेले काळे ढग**

– **आकाश,** नवीदिल्ली (वार्तापत्र)

**58**

**लोकमान्यांचे अर्थचिंतन**

– **अभय टिळक**



**70**


**अन्न, नागरी व पुरवठा विभागाची कामगिरी मंत्री छगन भुजबळ यांची मुलाखत**

– **विकास भुजबळ**

**76**

**भूदान योगी विनोबा**

– **प्रा. डॉ. गणेश राऊत**



**84**

**कानोकानी** (राजकीय विनोदी हलके-फुलके किस्से)

– **घंटाकर्ण**

**94**

**बिहार विधानसभा निवडणूक : बाजी कोण मारणार?**

– **अवलोकितेश्वर**



**98**

**गृहमंत्र्यांची कौतुकास्पद कामगिरी (अनिल देशमुख यांची मुलाखत)**

– **वैभव तुमाने**




**102**

**शेवटचे पान– मोडक सागर धरण**

– **हेमन्त टकले**












# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!


मूल्य ३० रु./पृष्ठे १०८ । सप्टेंबर २०२० । वर्ष ११ वे / अंक ५


# अनुक्रमणिका


**संचालक**
**हेमन्त टकले**

**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**

**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१

**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर

**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'** च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

# प्रारंभिक



# वैचारिक कार्यकर्ता

ध्येयवादी व प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर पक्ष संघटना उभी राहत असते. म्हणून कार्यकर्ता हा राजकीय पक्षाचा मूलाधार असतो. राजकीय पक्षाची स्वतःची म्हणून एक विचारसरणी असते. या विचारांच्या चौकटीत पक्षाच्या सर्व नेत्यांनी व कार्यकर्ते आणि सभासदांनी काम करावे अशी अपेक्षा असते. विचार हा कधीही एकाक्ष व रिजीड नसतो. तो काळाप्रमाणे परिवर्तीत होत असतो. ज्यांना हे परिवर्तन करणे जमते तेच पक्ष चिरंतन किंवा दीर्घकाळ चालू शकतात. ज्यांना नवीन बदल स्वीकारता येत नाहीत ते पक्ष रोजच्या जीवघेण्या संघर्षात तग धरु शकत नाहीत. ते अस्तंगाला जातात. त्यांचा सूर्य लवकर मावळतो. काळाप्रमाणे बदलण्यासाठी नेता आणि कार्यकर्ता या दोघांचीही वैचारिक पातळी अभ्यासपूर्ण बैठकीची असलीच पाहिजे पण त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे दोघांचा उच्च पातळीवरचा वैचारिक समन्वयही असला पहिजे. नुसता नेता दूरदृष्टीचा व पुरोगामी असून भागत नाही. कार्यकर्ताही त्याच विचारांनी भारलेला असावा लागतो. नेत्याच्या विचारांवर त्याची गाढ श्रद्धा व विश्वास असावा लागतो. तेव्हाच पक्ष मजबुतीने उभा राहू शकतो. निव्वळ सामान्य सभासदत्वाच्या पाच रुपयांच्या आणि क्रियाशील सदस्यत्वाच्या ५५ रुपयांची पावती फाडल्याने पक्ष उभा राहात नाही. आजकाल सर्व पक्षांचे सभासद कसे केले जातात हे आपण सारेजण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. राजकीय पक्षाच्या सरकार दरबारातील मान्यतेकरिता ही सभासद नोंदणी आवश्यक आहेच. त्याबद्दल माझ्या मनात शंका नाही. पण खरा प्रश्न असा आहे की पक्षात वैचारिक कार्यकर्ता कसा व केव्हा उभा राहणार?



निव्वळ वाढीव सभासद संख्या दाखविण्यासाठी खोट्या पद्धतीने एकाच व्यक्तीने इतरांचे पैसे भरून सभासद नोंदणी करू नये म्हणून यावेळी सभासद नोंदणीसाठी डीजीटल पद्धतीचा वापर करण्याचे आम्ही ठरविले आहे. ज्या व्यक्तींना सभासद केले जाईल त्यांचा मोबाईल क्रमांक अर्जावर नमूद केलेला असेल. त्या मोबाईलवर फोन करून आम्ही, 'तुम्ही खरेच सभासद झाले आहात का? पक्षाची व मा. पवार साहेबांची विचारसरणी तुम्हांला मान्य आहे का?' असे प्रश्न विचारून सभासद नोंदणीची तपासणी करणार आहोत? येत्या २ ऑक्टोबरपासून ही सभासद नोंदणी सुरू होणार आहे. जास्तीत जास्त सभासद कसे होतील याकडे कार्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे.

शेवटी कोणत्याही वाईट गोष्टीचा अंत किंवा चांगल्या गोष्टींची उभारणी ही प्रेमाने होणार नाही व संघर्षानेही होणार नाही. तर ती विचाराने होईल. प्रेमामुळे व संघर्षामुळे कशाचाही अंत वा प्रारंभ होत नाही. संघर्षात घर्षण होते व दोन्ही बाजू क्षीण होतात. प्रेम ही कोणती नवी गोष्ट निर्माण करु शकत नाही. प्रेम उत्साह निर्माण करते पण समाजात क्रांती मात्र विचारानेच होत असते. त्यामुळे वैचारिकदृष्ट्या कार्यकर्ता तयार होणे आवश्यक आहे. अन्यथा दलबदलू, स्वार्थी, सत्तांध नेते व कार्यकर्ते तयार होतात. जनतेला सर्व गोष्टी दिसत असल्यामुळे व समजत असल्यामुळे (कदाचित ती जाहीरपणाने बोलत नसेल) ते अशा विचारहीन लोकांची गणना 'फुटकळ' मध्येच करतात.


वैचारिक बांधिलकी मानून त्याप्रमाणे लोकसेवकाची भूमिका कर्तव्य निष्ठेने पार पाडणारा कार्यकर्ता जनतेला हवा असतो. त्याच्यावर ते मनापासून प्रेम करतात. म्हणून विचारांवर श्रद्धा असणे जास्त महत्त्वाचे आहे. संघर्षाने क्रांती नव्हे, तर क्षय होतो व प्रेमाने क्रांती नव्हे तर वृद्धी होते. तरीही संघर्षाचाच प्रसंग आला तर मी विचार प्रचारासाठी संघर्षही करीन, टाळणार नाही. संघर्षही ही एक युक्ति आहे. तिची गरज पडली तर तिचाही स्वीकार करु. परंतु क्रांतीही विचार प्रचारानेच होत असते, म्हणून मी विचारांचा प्रचार करीत राहणार आहे अशी वृत्ती असणारा व त्यासाठी धडपडणारा कार्यकर्ता प्रत्येक पक्षाला हवा असतो. सुदैवाने आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे भाग्य असे आहे की श्री. शरद पवार साहेबांसारखे उत्तुंग दूरदृष्टीचे, अभ्यासू व प्रदीर्घ अनुभव असलेले लोकनेते आपल्याला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून लाभलेले आहेत. देशातले सर्व राजकीय पक्षांचे नेते त्यांचे मार्गदर्शन निरनिराळ्या प्रश्नांवर घेत असतात. त्यांची स्वतःची अशी देशहिताचा प्राधान्याने विचार करणारी व सर्वांशी समन्वय साधित बरोबर घेऊन जाणारी विकासाची एक अद्भूत दृष्टी आहे. ती विचारानेच तयार झालेली आहे. मा. पवार साहेबांच्या विचारांवर श्रद्धा व विश्वास असणारी व्यक्तीच आपण पक्षाची सभासद केली पाहिजे. निव्वळ खोगीर भरतीने पक्ष मजबुतीने उभा राहणार नाही. त्यासाठी वैचारिक कार्यकर्ताच लागेल.

# प्रबंध संपादकीय



# आव्हाने संकटांची

कोरोना महामारीचे संकट मागील सहा महिन्यांपासून आपण अनुभवतो आहोत. मोजदाद करता येणार नाही इतके प्रचंड नुकसान या कोरोना कोविड-१९ ने आपल्या सर्वांचे केले आहे. मानवी जीवनाशी संबंध असणारी सर्व क्षेत्रे कोरोनाने पादाक्रांत केल्यामुळे एकही क्षेत्र या संकटातून सुटलेले नाही. त्याची लोकांना नुसती झळच पोहोचली आहे असे नाही तर प्रत्येक घराला व कुटुंबाला या संकटाने व्यापलेच पण आता कायम भितीयुक्त वातावरणात कोंडले आहे. घराघरात माणसे घाबरलेली आहेत. महाराष्ट्रात तर रोज १५ ते २५ हजार लोकांना या रोगाची बाधा होत असल्याचे ऐकून माणूस चक्रावून तर गेलाच, पण भितीनेही गारठून गेला आहे. बऱ्याच माणसांना नैराश्याने ग्रासलेले आहे. अगोदरच आर्थिक मंदी, नोटबंदी, जीएसटी यांसारख्या विषयांमुळे व केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे जनता जेरीस व मेटाकुटीला आली होती. रोजचे जगणे तिला अशक्य झाले होते. त्यात कोरोनाची भर पडल्यानंतर आता संकटावर मात करायची तरी कशी असा प्रश्न आ वासून उभा असतानाच अतिवृष्टी, पूर, हातातोंडाशी आलेली मूग, मटकी, उडीद, सोयाबीन, कापूस, भात यांसारखी पिके अती पावसाने खराब होणे, कुजणे, त्यांना कोंब फुटणे अशी नवनवीन समस्या वेगाने पुढे येताना दिसताहेत.



‘संकटे कधी एकेकटी येत नाहीत’ (Calamaties never come alone) अशी एक म्हण आहे. याचा अनुभव आपण आता घेत आहोत. महाराष्ट्राच्या कोणत्या ना कोणत्या विभागाला दरवर्षी पूर, दुष्काळ, अतिवृष्टी, दरडी कोसळणे व मनुष्यहानी होणे, रस्ते-पूल वाहून जाणे यांसारख्या समस्या भेडसावतच असतात. एका समस्येला ठिगळं लावून तोंड द्यावे तर दुसऱ्या समस्येचं मोठे भगदाड पडलेले असते. समस्यांची सावरासावर करण्यातच सगळी शक्ती आणि पैसा खर्च होतो आहे. यात केवळ सरकारचीच ताकद, वेळ आणि धन जाते आहे असे नाही. सर्वसामान्य माणसांनाही रोजचे जगणे सुकर करण्यासाठी या सर्व पातळ्यांवर लढावेच लागते आहे. हे जगणे आणि लढणे हीच तर आता तारेवरची मोठी कसरत आहे. खिशात काही नसताना आणि पोटात भुकेचे कावळे कोकलत असताना लढायचे तरी कसे आणि कुणाकुणाशी हा प्रश्न अनुत्तरीतच असतो. भुकेल्या पोटी मनुष्य तत्त्वज्ञान ऐकत नाही, न्याय-अन्यायाचा विचार करीत नाही आणि प्रार्थनेसाठीही कुणापुढे वाकत नाही असे सेन्सा या प्रसिद्ध विचारवंताने लिहून ठेवले आहे.

देशांतर्गत प्रश्न चोहोबाजूंनी उफाळून आलेले असतानाच अनेक आंतरराष्ट्रीय प्रश्नांनीही डोके वर काढले आहे. जातीय दंगली, धार्मिक संघर्ष, दहशतवाद, नक्षलवाद, अतिरेकी कारवाया, भाषिक व सीमा वाद याबरोबरच आता आयात-निर्यात, उद्योगधंद्यांची उभारणी, पायाभूत व मूलभूत सोयीसुविधांची निर्मिती, आंतरराष्ट्रीय करांचे प्रमाण व त्यासंबंधीची धोरणे, संरक्षण साहित्याची खरेदी-विक्री व उत्पादन यांसारख्या अनेक विषयांवरुन जगभर तिसऱ्या महायुद्धाचे सावट पसरु लागले आहे. उद्या कदाचित जर युद्धाला तोंड फुटलेच तर आपला देश त्यापासून अलिप्त राहू शकणार नाही. कारण तिसऱ्या महायुद्धात आपल्या शेजारी असलेला चीन अग्रभागी असणार आहे. किंबहुना चीनमुळेच हे युद्ध घडेल की काय अशी भिती जाणकारांमध्ये आहे. चीनने भारतापुढे तर युद्धाचे संकटच उभे केले आहे. लडाख, अरूणाचल, ईशान्य भारत या सर्व ठिकाणांबरोबरच आता अगदी उत्तराखंडमध्ये देखील चीनचा उपग्रह गस्ती घालून सैन्यांच्या तयारीची व्यवस्था पाहून त्याचे फोटो काढतो आहे. पाकिस्तान, नेपाळ हे देश तर आपल्या विरोधात गेलेच आहेत पण ते आता चीनच्या वळचणीला जाऊन बसले आहेत. एवढंच नव्हे तर ज्या बांगला देशाला स्वतंत्र करण्यासाठी १९७१ साली आपण पाकिस्तानशी युद्ध केले तो बांगलादेशही आता भारताच्या विरोधी भूमिका घेऊ लागला आहे ही सगळी कशाची लक्षणे आहेत? आपले परराष्ट्र धोरण नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यापासून डळमळीत होऊन चुकीच्या दिशेने जावू लागले आहे याचा तर हा प्रसाद नसेल ना अशी शंका व्यक्त होते आहे. अशा वेळी आपल्याला देश मजबुतीने एकसंघ ठेवावा लागेल. समाजात जाऊन त्याबाबत जागृती निर्माण करावी लागेल. सगळे अंतर्गत मतभेद, गटबाजी, संघर्ष, दुजाभाव, जाती-धर्मभेद बाजूला सारुन एकजुटीने खांद्याला खांदा लावून विकासाची पालखी वाहून नेण्याचे काम करावे लागेल. हे मोठे आव्हान कार्यकर्त्यांसमोर आहे.

## संपादकीय



# संकटाचे संधीत रुपांतर

कोरोना महामारीच्या संकटामुळे आपण सगळेजण त्रस्त आहोत. प्रत्येकाला या संकटाची काही ना काही झळ पोहोचलेली आहे. चीनने हे संकट उभे करुन संपूर्ण जगाला वेगळाच धडा शिकविला आहे. लाखो माणसांचे यात जीव गेले असले तरी जगण्याची अनावर ओढ आणि भुकेचा आगडोंब प्रत्येकाचा शाबूत आहे. यासाठी अन्नाची जी निर्मिती करावी लागते ती शेतीतूनच होते. शेतीसाठी पाणी लागते. बिनपाण्याची शेती अजून जगात कुणाला जमलेली नाही. सुदैवाने मागील वर्ष आणि यंदाचे वर्ष पाऊस अत्यंत चांगला झालेला आहे. पाण्याचे साठे पूर्ण भरलेले आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टीने पूर येऊन गेलेत. खरीप पिकांचे बरेच नुकसान झाले आहे. तरी देखील रब्बी व उन्हाळी हंगामातल्या पिकांसाठी लागणारे पाणी निसर्गाने पुरेसे उपलब्ध करुन दिले आहे. निसर्ग सावत्र आणि सख्ख्या अशा दोन्ही आईच्या भूमिका पार पाडताना आपण पाहतो आहोत. संकटाच्या काळात सुरुवातीला भाजीपाला, फळे, फुले यांचा खप कमी झाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांच्या या मालाला मागणी नव्हती. परिणामी अनेक शेतकऱ्यांनी हा माल काढून टाकला, उपटून फेकला, जनावरांना खायला घातला. पण आता मात्र परिस्थिती बदलली आहे. बाजार सुरु झाले आहेत. लोकांची मागणी वाढू लागली आहे. शहरांमध्ये तर विक्रेते अत्यंत चढ्या भावाने हा माल विकताहेत. अशा वेळी हा माल जोमाने निर्माण करण्याची पुन्हा एकवार संधी आपल्यापुढे निर्माण झाली आहे.

लॉकडाऊनमुळे शहरातले अनेक लोक, कामगार, तरुण मुले ही गावातल्या शेतीवर परत आली आहेत. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन ती शेतीत रस घेऊ लागली आहेत. हे अत्यंत सकारात्मक चित्र आहे. फक्त एकच दक्षता या सर्वांनी बाळगण्याची गरज आहे, ती म्हणजे उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक काटेकोर पद्धतीने व पुरेपूर वापर करुन पाण्याच्या प्रत्येक थेंबातून अधिकाधिक उत्पादन व उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने ऊस सोडून नकदीच्या अन्य पिकांकडे वळले पाहिजे. या दृष्टीने सघन व अतिसघन पद्धतीच्या फळबागा (म्हणजे ४ x १ मिटरवर एकरी १००० किंवा ४ x २ मिटरवर एकरी ५०० झाडे लावणे), पॉलिहाऊस व शेडनेट मध्ये फळे, भाजीपाला, फुले यांचे उत्पादन, डाळवर्गीय व गळीत धान्य पिकांची लागवड, उत्पादनाच्या ठिकाणीच शेतकऱ्यांनी एकत्र येऊन छोट्या प्रक्रिया उद्योगांची उभारणी, करार शेती, प्रिसीजन फार्मिंग, रिसोर्स टू रुट या तंत्राचा वापर, शेतकऱ्यांनी गटांमार्फत शहरात मालविक्रीची व्यवस्था उभी करणे, ग्राहकांना घरपोच माल नेऊन देणे या गोष्टी करण्याची गरज आहे. संकटातूनच त्यावर मात करण्याची नवी संधी निर्माण होत असते. आपण नेहमी तक्रार करतो आम्हाला 'सेवेची संधी' मिळत नाही. पण आता निसर्गाने म्हणा की चीनने म्हणा 'संधीची सेवा' उपलब्ध करुन दिली आहे. आपण ती कशी, केव्हा व किती तनमनधनाने करणार यावरच संधीचे फळ अवलंबून राहणार आहे.

**ऋग्वेदातील वरूण सुक्तामध्ये पाच हजार वर्षांपूर्वी लिहिले आहे.**

**इमा आप शिवतम (पाणी अत्यंत पवित्र आहे.)**

**इमा सर्वस्य भेषिजे (पाणी सर्वांची भरभराट करते)**

**इमा राष्ट्रस्य वर्धिनी (पाणी राष्ट्राची उन्नती करते)**

पाण्याच्या उपलब्धतेवर सगळ्या प्रकारची शेती अवलंबून आहे. पाणी किती, कशा प्रकारचे व कोणत्या गुणवत्तेचे आहे यावरुन शेतकरी त्या पाण्याचा वापर कोणत्या पिकांसाठी करायचा हे ठरवित असतो. म्हणजे पिकपध्दती निश्चित करणाऱ्या अनेक घटकांमध्ये पाणी हा एक घटक असून तो सर्वाधिक महत्वाचा आहे. शेतीला लागणारे पाणी हे निसर्गातूनच मिळते. मग ते पावसाचे असो, बर्फ वितळून तयार झालेले असो किंवा भूगर्भात मुरलेले किंवा भूपृष्ठावर साचविलेले असो. सिंचनासाठी लागणारे पाणी अजून तरी कृत्रिमरीत्या माणसाला तयार करता आलेले नाही; पुढेही येईल असे वाटत नाही. त्यामुळे पाण्यासाठी आपल्याला कायम पावसावर म्हणजे निसर्गावर अवलंबून राहावे लागणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. या पावसापासून महाराष्ट्रात आज जेवढे पाणी उपलब्ध होते त्यातले ८९ टक्के पाणी सिंचनासाठी वापरले जाते. ८ टक्के पाणी पिण्यासाठी वापरले जाते आणि ३ टक्के पाणी उद्योगधंद्यांना वापरले जाते. जेवढे भूजल उपलब्ध होते त्यातले ९४ टक्के पाणी सिंचनासाठी आणि ६ टक्के पाणी पिण्यासाठी व ०.२ टक्के भूजल उद्योगासाठी वापरले जाते. महाराष्ट्र शासनाने २०१८ मध्ये जो राज्य एकात्मिक जल आराखडा प्रसिध्द केला आहे त्यात १७ अब्ज घनमिटर हे भूजल आणि ६६ अब्ज घनमिटर हा भूपृष्ठावरील पाणीसाठा असल्याचे नमूद केले आहे. हेक्टरी तीन हजार घनमिटरपेक्षा कमी पाणी जिथे उपलब्ध आहे तिथे दोन पिके घेता येणार नाहीत आणि दुहंगामी पिकरचनाही उभी करता येणार नाही. तीन हजार घनमिटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध असणारे क्षेत्र महाराष्ट्रात ४२ टक्के आहे. या क्षेत्रातील शेतीची स्थिती अत्यंत गंभीर आहे. मराठवाड्यातील बहुतांश क्षेत्र यात समाविष्ट आहे. संपूर्ण भारत देशात जवळपास पाच हजार मोठी धरणे आहेत. त्यातील ३५ ते ३६ टक्के धरणे एकट्या महाराष्ट्र राज्यात आहेत. तरी देखील दुष्काळ, पाणी टंचाई, अवर्षण प्रवण, टँकर यांचा

सामना महाराष्ट्रातील जनतेला वारंवार करावा लागतो आहे. कारण धरणे पाण्याने भरणे हे मोसमी पावसावर अवलंबून आहे. हा पाऊस फक्त ४ ते ५ महिने असतो. त्यातही चांगल्या पावसाचे दिवस फक्त १० ते १५ असतात. १ जूनला सुरु झालेला पाऊस १५ ऑक्टोबरला संपतो असे साधारण गणित आहे. या काळात पडलेला पाऊस भूपृष्ठावर साठवून ते पाणी काटेकोर व्यवस्थापन करून वर्षभर पुरवावे व वापरावे लागते. सिंचनासाठी बांधलेल्या मोठ्या धरणांमधील पाणी हल्ली मोठी शहरे व गावांकरिता माणसे व जनावरे यांना पिण्यासाठी राखून ठेवावे लागते. त्यामुळे सिंचनाच्या क्षेत्रात घट होते आहे.

धरण बांधण्यापूर्वी जी पिकपध्दती मूळ आराखड्यात दाखविलेली असते आणि लाभ खर्चाचे जे गुणोत्तर (बी.सी.रेशो) नमूद केलेले असते ते प्रत्यक्षात कुठेही आस्तित्वात नसते. ते फक्त कागदावर व नकाशावर असते. कारण प्रकल्पाला मंजुरी मिळावी म्हणून ती पिकपध्दती व बी.सी. रेशो तयार केलेला असतो. एकदा का प्रकल्पाला मंजुरी मिळाली की मूळ पिकपध्दती आणि बी.सी. रेशो यांना पूर्णपणे हरताळ फासला जातो. त्यामुळे कोणत्याही धरणाची वा प्रकल्पाची मूळ आणि वास्तवातली पिकपध्दती यात प्रचंड महदंतर असते. कागदावरची पिकपध्दती प्रत्यक्षात कुठेच आस्तित्वात नसते. नेमके कोणत्या पिकाखाली किती क्षेत्र आहे याचा मोजमाप केलेला अचूक आकडा आजतरी कोणत्याही विभागाकडे उपलब्ध नाही. किंबहुना चारमाही, आठमाही व बारमाही होणारे सिंचन किती? प्रत्येक हंगामातली पिकपध्दती व पिकनिहाय क्षेत्र किती? त्याची उत्पादकता किती? प्रत्येक पिकाला वापरले जाणारे पाणी किती? अचूक मोजमाप कुणाकडे आहे? सगळा अंधाधुंद कारभार आहे. पाण्याचे मोजमापच नाही.घनमापन पध्दतीने मोजून पाणीवापर नाही. मिटरही नाहीत. त्यामुळे जगातले शेतीतले सगळे प्रगत व विकसीत "देश भारतात पाण्याची मुबलक उपलब्धता आहे. पाण्याचे दारिद्र्य नाही. नियोजनाचे दारिद्र्य आहे", असे सातत्याने ओरडून सांगतात.



महाराष्ट्रात आणि विशेषत: वारंवार दुष्काळाचा सामना कराव्या लागणाऱ्या मराठवाड्यात घेतल्या जाणाऱ्या ऊस पिकावरुन सातत्याने टीका व ओरड होते. चितळे आयोगापासून अनेकांनी मराठवाड्यातून ऊस हे पिक हद्दपार केले पाहिजे आणि ते विदर्भ व कोकण परिसरात म्हणजे जिथे पाण्याची मुबलक उपलब्धता आहे तिथे वाढविले पाहिजे अशा प्रकारचे मत व्यक्त केलेले आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पुढाकारातुन जुलै २०२० मध्ये नुकताच ऊस पिकावर वेबिनार झाला. त्यामध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे माजी सदस्य सचिव आणि आंतरराष्ट्रीय सिंचन आयोगाचे माजी सचिव श्री.सुरेश कुलकर्णी म्हणाले, चीनमध्ये ६५ टक्के पाणी सिंचनासाठी वापरतात. विकसीत देशात म्हणजे जर्मनीत ९ टक्के आणि अमेरिकेत ३० टक्के पाणी सिंचनासाठी वापरतात. उत्पादन वाढवून पाणी वापरात घट घडवू शकलो तर आपण खरी प्रगती करीत आहोत असे मानता येईल.शेतीपेक्षा इंडस्ट्रीची वॉटर प्रॉडक्टीव्हीटी जास्त आहे. महाराष्ट्रात ८० लाखाहून अधिक लोकांना कृषि प्रक्रिया उद्योगाने रोजगार दिलेला आहे. पाण्यासाठी सतत चढाओढ व संघर्ष चालु आहेत. उजनीचे धरण २ अब्ज घनमीटरचे (११७ टिमसी. त्यातला ५४ टीएमसी उपयुक्त व ६३ टिएमसी मृतसाठा) आहे. त्यातले ८० टक्के पाणी ऊसासाठी वापरले जाते. कागदावरच हे धरण आठमाही आहे. प्रत्यक्षात बारमाही ऊस उभा आहे व तो भिजतो आहे. मग लोक प्रश्न विचारतात,धरण आठमाही आणि उन्हाळ्यात कालवा व लिफ्टच्या पाण्याने ऊस भिजतो कसा? आज तरी कोणी याचे उत्तर देत नाही."

श्री कुलकर्णी पुढे म्हणाले, मराठवाड्यातली एकूण जमीन ५६.७ लाख हेक्टर आहे. सिंचनासाठी एकूण ८ अब्ज घनमीटर हे भूपृष्ठीय जल आहे आणि ५ अब्ज घनमीटर हे भूजल आहे. मराठवाड्याची निर्मित सिंचन क्षमता ११.५ लाख हेक्टर आहे. प्रत्यक्षात धरणाच्या पाण्यातून कधीही ३.३ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र भिजलेले नाही.म्हणजे तेवढे प्रत्यक्ष सिंचन आहे. भूजल सिंचीत क्षेत्र अंदाजे १० लाख हेक्टर आहे. म्हणजे मराठवाड्यातले एकूण सिंचन क्षेत्र १३ लाख ३ हजार हेक्टर एवढे आहे. त्यात ऊसाचे क्षेत्र ३ लाख हेक्टर एवढे आहे. नांदेड आणि औरंगाबाद या दोन विभागात मिळून ३२ साखर कारखाने आहेत आणि २०१९-२० च्या गळीत हंगामात त्यांनी केलेले ऊसाचे गाळप ६५.८५ लाख मे.टन आहे. शेतक-यांच्या ऊस दर देयबाकीची रक्कम ३३ कोटी, ५५ लाख रूपये एवढी आहे. मराठवाड्यात ऊस पिकासाठी होणारा पाण्याचा वापर हा ६ अब्ज घनमीटर आहे. म्हणजे एकूण उपलब्ध पाण्याचा ७५ टक्के पाणी मराठवाड्यात ऊस याच एका पिकासाठी वापरले जाते. ऊस क्षेत्राची सिंचीत क्षेत्राशी टक्केवारी २३ टक्के आहे. ऊसासारखी एफआरपी जर सरकारने सोयाबीन, तूर, कापूस आणि करडई या पिकांना दिली तर गळीत धान्यबिया व डाळवर्गीय बिया यांची आयात मोठ्या प्रमाणावर कमी होऊन शेतकरी त्या पिकांकडे वळतील.

"तेलंगणाने जसे भात पिकावर नियंत्रण आणले आहे तसे आपणही ऊस पिकावर नियंत्रण आणून ते पूर्णपणे ठिबक



सिंचनाखाली नेले पाहिजे असे सांगून श्री. सुरेश कुलकर्णी म्हणाले, २०१५ मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने राज्यातील सर्व ऊस पिक सक्तीने ठिबकवर नेण्याचा आदेश सरकारला दिला होता. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. महाराष्ट्रात ऊसाचे क्षेत्र साधारणपणे १० ते ११ लाख हेक्टरच्या दरम्यान असते. त्यापैकी अडीच लाख हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आहे. उर्वरीत ७.५ लाख हेक्टर क्षेत्र पारंपारीक पद्धतीने पाटाने भिजते आहे. प्रवाही पद्धतीने एवढे पाणी ऊसासाठी वापरणे राज्याला परवडणारे नाही".

या वेबिनारमध्ये रांजणी येथील नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज या कारखान्याचे चेअरमन श्री. बी.बी. ठोंबरे आणि संचालक श्री. पांडुरंग आवाड म्हणाले, गेल्या ८ ते १० वर्षापासून ऊसाच्या पाण्याबाबत आम्ही निरनिराळे प्रयोग करतोय. आमच्या कारखान्याच्या परिसरात शेती, विहीर बागायत असून साडे दहा हजार हेक्टर ऊस आहे.त्यापैकी साडे सहा हजार हेक्टर ऊस ठिबक सिंचनावर नेलेला आहे. प्रवाही पद्धतीने, पाटाने २ ते ३ कोटी लिटर पाणी वर्षभरात शेतकरी ऊसाला एकरी देतो. पण आम्ही ठिबक संचाच्या सहाय्याने ६० ते ७० लाख लिटर पाणी वर्षभरात देऊन एकरी ११० टनापर्यंत ऊस काढला आहे. अति पाणी वापरामुळे ऊस पिक बदनाम झाले आहे. खरे तर ऊस पिकाला एवढ्या पाण्याची गरजच नाही. पण शेतकरी चुकीचे वागतोयं. पाण्याची कमतरता असलेल्या भागात १०० टक्के ऊस ठिबकवरच न्यावा लागेल. मराठवाड्यातून ऊस पिक हद्दपार करणे तितके सहज व शक्य नाही.शेतकरी ऊस पिक लावण्याच्या मागे तीन मुख्य कारणे आहेत. १) ऊसाला निश्चित हमीभाव सरकारने ठरवून दिलेला आहे, तो दिला नाही तर साखर कारखान्यांवर गुन्हा दाखल होतो. शेतक-याला हमीभाव मिळतो. २) ऊसाच्या विल्हेवाटीची म्हणजे विपणनाची व्यवस्था आहे. त्याला माल विकण्याबाबत कवडीची चिंता नाही. कुठेही बाजारात विक्रीसाठी जावे लागत नाही. ऊस विकल्याबरोबर शेतक-यांच्या खात्यात १४ दिवसानंतर पैसे जमा होतात आणि ३) ऊसावर रोग, किडी यांचा प्रादुर्भाव कमी आहे आणि प्रति एकरी उत्पन्न जास्त मिळते.

श्री.ठोंबरे पुढे म्हणाले, मागच्या वर्षी (२०१९-२०) राज्यातील १४४ साखर कारखान्यांनी ५४५ लाख टन ऊसाचे गाळप करून ६६.६१ लाख टन साखर उत्पादित केली होती. राज्यातील साखर उद्योगाची वार्षिक उलाढाल ५६०७२ कोटींची असून ऊस उत्पादक शेतक-यांना १३५०८ कोटी रूपये तर ऊस तोडणी मजूर व वाहतूकदारांना २६०० कोटी रूपये मिळाले आहेत. राज्यात जवळपास ३० लाख ऊस उत्पादक शेतकरी असून साखर कारखान्यात २ लाख कामगार आहेत. व अप्रत्यक्षरित्या २० लाख लोकांना रोजगार मिळतो. म्हणजे एकूण जवळपास ५२ लाख लोकांचा या व्यवसायाशी थेट संबंध आहे. मागच्या वर्षी ऊसाचे क्षेत्र ८.२२ लाख हेक्टर होते. ते यावर्षी (२०२०-२१) १०.६६ लाख हेक्टर झाले आहे. म्हणजे २.४४ लाख हेक्टरने ऊसाचे क्षेत्र वाढले आहे. शिवाय हेक्टरी उत्पादकताही १८.६७ मेट्रीक टनाने वाढली आहे. त्यामुळे यावर्षी गळीतासाठी ८१५.५० लाख मे. टन ऊस उपलब्ध होईल असा अंदाज आहे. मागील वर्षापेक्षा यावर्षी २७०.२४ लाख मे. टन ऊस जास्त आहे. त्यामुळे साखर उत्पादन ९२.०६ लाख मे. टन म्हणजे मागच्या वर्षीपेक्षा ३०.५५ लाख मे. टनापेक्षा जास्त होईल. चालू हंगामात ५० सहकारी व ९० खाजगी असे १४० साखर कारखाने स्वबळावर आर्थिक नियोजन करून ६१५ मे.टन ऊसाचे गाळप करू शकतील. २०० लाख मे.टन ऊस मात्र गळीताशिवाय शिल्लक राहण्याचा धोका आहे.


शासनाच्या बजेटच्या २५ ते ३० टक्के रक्कम ऊस या पिकातून जाते. मलेशिया, इंडोनेशिया यांनी संशोधन करून कमी पाणी लागणा-या व कमी दिवसात येणा-या ऊसाच्या जाती शोधून काढल्या आहेत. ४० दिवसांनी पाण्याची पाळी आली तरी ऊसावर विपरित परिणाम होत नाही. ८ महिन्यात मलेशियात ऊस येतो. कोरडवाहू ऊस ही संकल्पना त्यांनी विकसीत केली आहे. पाण्याची कमतरता असलेल्या भागात आपणही नवीन जाती तयार करून त्या वाढविल्या पाहिजेत व संशोधन संस्थानी ते काम हाती घेतले पाहिजे. ऊसाला शुगर बीट हे पर्यायी पिक आहे. कमी दिवसात, कमी पाण्यात येते. ऊसाइतकेच उत्पादन बीट मधूनही मिळते. बीटपासून थेट इथेनॉल निर्मितीही करायची आहे. ऊस पिकात आज ऊस लागवड, आंतरपिके, ऊस तोडणी मजूर, तोडणी यंत्रे अशा अनेक समस्या आहेत. ऊस तोडणीसाठी स्वदेशी निर्मितीचे यंत्र अद्याप यशस्वी झालेले नाही. परदेशी यंत्रे मोठ्या क्षेत्रासाठी बनविलेली आहेत. आपल्याला २ ते ४ एकर ऊस तोडणारे यंत्र विकसीत करावे लागेल, असेही श्री. ठोंबरे व श्री. आवाड म्हणाले.

पिक पद्धतीमध्ये ऊस या पिकाचा इतका सविस्तर आढावा का घेतला असा प्रश्न वाचकांना पडण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात पिक पद्धतीतला खरा संघर्ष ऊस विरूद्ध इतर सर्व पिके असाच आहे.ऊसाला प्रचंड पाणी वापरले जात असल्यामुळे इतर पिकांवर अन्याय होतो. त्यांना पुरेसे पाणी मिळत नाही. शेतकरीही ऊसाला प्राधान्य देऊन इतर पिकांकडे दुर्लक्ष करतो. किंबहुना पाणी पुरेसे उपलब्ध झाले असे दिसले की, लगेच शेतकऱ्यांच्या ओढा ऊस लागणीकडे वळतो. महाराष्ट्रात जवळपास ऊसाचे क्षेत्र १० लाख हेक्टर आहे. त्यातले २.५ लाख हेक्टर ठिबकखाली आणि




७.५ लाख हेक्टर प्रवाही पद्धतीने भिजणारे आहे. ऊसाला ठिबकने पाणी दिले तर हेक्टरी १४.५ हजार घनमीटर पाणी लागते असा शेतक-यांचा अनुभव आहे. राहुरी कृषि विद्यापिठाची शिफारस हेक्टरी १२ हजार घनमिटर पाण्याची आहे. आता आपण ठिबकद्वारे व प्रवाही पद्धतीने ऊसाला पाणी महाराष्ट्रात किती वापरले जाते याचा हिशेब काढू.प्रति हेक्टरी १४ हजार घनमिटर या प्रमाणे २.५ लाख हेक्टर ऊसासाठी ३.६ अब्ज घनमिटर पाणी ठिबकने लागेल. उर्वरित ७.५ लाख हेक्टरसाठी पारंपारिक प्रवाही पद्धतीने प्रति हेक्टरी २५ हजार घनमिटर एवढे पाणी धरले तर १८.७५ अब्ज घनमिटर पाणी लागेल. काही लोक २० अब्ज घनमिटर एवढे धरतात. म्हणजे ठिबक व प्रवाही या दोन्ही पद्धतीने मिळून महाराष्ट्रातील १० लाख हेक्टर ऊसाला २२ अब्ज घनमिटर एवढे पाणी लागेल. आज महाराष्ट्रात भूपृष्ठावर उपलब्ध असलेले पाणी, म्हणजे धरण, नदीनाले, ओढे राज्यस्तरीय व स्थानिक बंधारे या सर्वात मिळून ३० अब्ज घनमिटर एवढे पाणी आहे. तेवढे पाणी भूपृष्ठीय सिंचनासाठी वापरले जाते. भूजल विकास आणि सर्वेक्षण यंत्रणेच्या अभ्यास व अंदाजानुसार १६ अब्ज घनमीटर भूजल सिंचनासाठी वापरले जाते. म्हणजे भूपृष्ठ व भूजल दोन्ही मिळून महाराष्ट्रात ४६ अब्ज घनमीटर पाणी सिंचनासाठी वापरले जाते. वापरले जाणारे पाणी आणि सिंचनाचे राज्यातील एकूण क्षेत्र यांची सरासरी काढली तर ती १५ टक्के येते. महाराष्ट्रात भूजल व भूपृष्ठ धरून ६६ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे असे येथे गृहीत धरले आहे. यात भूपृष्ठावरचे सिंचन ३६ लाख हेक्टर आणि भूजलातून होणारे सिंचन ३० लाख हेक्टर आहे. महाराष्ट्रात ऊसाचे क्षेत्र एकूण सिंचन क्षेत्राच्या १५ टक्के आहे. म्हणजे या पिकाला सिंचन करण्यासाठी महाराष्ट्रात जो पाणी वापर होतो तो सरासरी ४८ टक्के आहे आणि मराठवाड्यात हीच सरासरी ७५ टक्क्यांपर्यंत जाते. १५ टक्के ऊस क्षेत्राला ४८ टक्के पाणी वापरले जाते आणि उर्वरित ५२ टक्क्यात इतर सर्व पिके भिजवावी लागतात. आता हे गणित बसवायचे कसे हाच खरा कळीचा प्रश्न आहे. ऊस या पिकाचे क्षेत्र वाढवून न देता ते थोडे कमी करून संपूर्ण पिक ठिबक सिंचनाखाली नेऊन त्याची उत्पादकता वाढवता येईल का ? हा प्रश्न सातत्याने चर्चिला जातो आहे. पण प्रत्यक्षात फारसे काही घडताना दिसत नाही. ऊसाला दिल्या जाणा-या पाण्याचे सामाजिक मूल्य फार मोठे आहे. पण त्याची म्हणावी अशी पुरेपूर जाणीव ऊस उत्पादकांना झालेली आहे असे आज तरी दिसत नाही. ऊसाला दिले जाणारे प्रचंड पाणी थोडे कमी करून ते इतर नकदीच्या पिकांकडे उदाहरणार्थ कापूस, सोयाबीन, सूर्यफूल, कलिंगड, फळबागा, भाजीपाला, फुले, वगैरे वळविले तर त्यातून राज्याची शेती दुबार व तीन हंगामी बनवता येईल. लोकांना बारमाही रोजगार उपलब्ध करून देता येईल आणि उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी जिथे कच्च्या मालाचे उत्पादन होते तिथेच उभी केली तर मूल्यवृद्धी होऊन लोकांना रोजगारासाठी शहराकडे धाव घेण्याची गरज पडणार नाही. ऊस याच एका पिकातून सगळे वैभव उभे राहू शकते असा चुकीचा गैरसमज आमच्या राज्यकर्त्यांनी जो लोकांमध्ये वाढीला लावलेला आहे तो कमी व दुरुस्त करण्याची गरज आहे. ऊसाच्या संघशक्तीचा मी दुस्वास करतो आहे असा कृपा करून गैरसमज करून घेऊ नका. ऊसामुळे इतर पिकांवर जो अन्याय होतो आहे आणि इतर पिके ताकद असूनही मागे पडत आहेत तशी ती पडू नयेत असा शुद्ध हेतू आहे. यात शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचाच विचार व गणित आहे. हे गणित पक्के बसवण्यासाठी नवीन पीक पद्धतीचा स्वीकार आता अपरिहार्य झाला आहे. त्या नव्या दिशेने जाण्याची तयारी आपण सर्वांनी करायला हवी.

कोरोना महामारीच्या संकटामुळे अनेक उद्योगधंदे व व्यवसाय अडचणीत येऊन लाखो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. बेरोजगार झालेले तरुण शेती व्यवसाय करण्याच्या निमित्ताने आपापल्या गावी परतले आहेत. यातली काही तरुण मुले खूप उच्च शिक्षित, तांत्रिक ज्ञान घेतलेली व संगणकासह सर्व प्रकारचे अद्ययावत ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान अवगत असलेली आहेत. यातल्या काही तरुणांनी गावात अत्याधुनिक पद्धतीची 'हायटेक' शेती सुरु केली आहे. संकटाला न डगमगता त्यांनी त्याचे रुपांतर संधीमध्ये करण्याचे ठरविले आहे. त्यातून हे युवक सघन व अतिसघन पद्धतीच्या फळबागा, शेडनेट व पॉलिहाऊसमध्ये फळबागांची लागवड, ॲटोमेशन, एकरी २०० टन ऊस उत्पादनाचा प्रयोग, त्यासाठी मॉड्यूलर स्प्रिंकलरचा वापर, हायड्रोपोनिक्स, एरोपोनिक्स, जर्सी व गीर गायींचे गोठे, उघड्या रानात व बंदिस्त वातावरणात भाजीपाला उत्पादन, फुलशेती याकडे वळले आहेत. बदलाचे हे सुचिन्ह मानावे लागेल. शिकलेली मुळे शेती क्षेत्रात आल्याने व्यावसायिक व व्यापारी पद्धतीची शेती वृद्धींगत होण्यास निश्चित हातभार लागणार आहे. अर्थात यासाठी वित्तीय संस्थांनी मुक्तहस्ते या तरुणांना अत्यंत कमी व्याजदराने कर्ज देण्याची गरज आहे. काही जिल्हा सहकारी बँका ३ लाखापर्यंतचे कर्ज बिनव्याजी देतात. पीडीसीसी बँकेने या पद्धतीने आत्तापर्यंत १५०० कोटी रु. मागील १० वर्षांत वाटले आहेत. याच पद्धतीने या तरुणांना अर्थपुरवठा झाला तर ती स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभी राहू शकतील. त्यातून संकटाचे रुपांतर निश्चितपणे संधी फायदेशीर करण्याकडे होईल.



महाराष्ट्राला वारंवार भेडसावणाऱ्या पूरप्रश्नासंबंधी राज्याचे जलसंपदा व लाभक्षेत्रविकास मंत्री जयंत पाटील यांची डॉ. सुधीर भोंगळे यांनी घेतलेली ही विशेष मुलाखत.



# काढावीच लागतील अतिक्रमणे पूररेषेतली

जयंत पाटील

**प्रश्न : महाराष्ट्रातील यावर्षीची पूरपरिस्थिती नदयांना आलेला एकूण पूर व त्याची क्षमता, वाहून गेलेले पाणी याबाबत काय सांगता येईल?**

**जयंत पाटील :** पूर हा निसर्ग निर्मित आहे. तो समजून घेण्याला आणि नियंत्रित करण्याला मानवाला मर्यादा आहेत. फक्त आपत्ती आली तर तिचा सामना करण्याची व परिस्थितीला तोंड देणे थोडे सुलभ जावे म्हणून काही व्यवस्था अगोदर करुन ठेवणे मानवाच्या हाती आहे. पुराचा अंदाज जर आधीच वर्तविता आला तर बरीचशी हानी टळू शकते. पुराचा अंदाज वर्तविण्याच्या योजनेची सुरूवात केंद्रीय जल आयोगात १९८८ साली यमुना खोऱ्यापासून झाली. आता ती सर्व देशभर विस्तारीत झालेली आहे. पाण्याची व्यवस्था अत्यंत स्वतंत्र, विलग अशी कधी नसते. ती साखळी रुपाने उभी राहते. खालच्या बंधाऱ्याचे भविष्य आणि सुरक्षितता ही वरच्या बंधाऱ्यावर अवलंबून असते. नदी खोऱ्यातले स्त्रवण व स्त्रोतांचा एकत्र विचार करुन ही साखळी कशी बसवायची ते ठरवावे लागते.

पाऊस केव्हा व किती पडेल हे आपल्या हातात नाही. हल्ली कमी वेळेत जास्तीचा पाऊस वेगाने येऊन पडून जातो. त्यामुळे नदीपात्रात व धरणात प्रचंड पाणी येते. धरणाच्या पोटात जेवढे पाणी साठू शकेल तेवढे साठविण्याचा आपण प्रयत्न करतो. बऱ्याचदा भविष्यात पुरेसा पाऊस होईल की नाही या भितीपोटी पडलेला पाऊस व धरणात वाहून आलेले सर्व पाणी अडविण्याचा आपण प्रयत्न करतो. त्यामुळे धरणे लवकर भरली जातात. धरणे पूर्ण भरुन गेल्यानंतर मोठा पाऊस एकदम झाला तर येणारे पाणी धरणात साठविता येत नाही. तो सगळा येवा सोडून द्यावा लागतो. त्यामुळे बऱ्याचदा धरणाच्या खालच्या भागात पाऊस न पडताही पूर आल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. सगळ्या धरणातून एकाच वेळी पाणी सोडले तर ते नदीपात्रात मावत नाही. मग ते इतरत्र गावात, वाड्यावस्त्यांवर घुसते. मागच्या वर्षी असा प्रकार सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात होऊन अनेकांचे मोठे नुकसान झाले होते. ती स्थिती व अनुभव लक्षात घेऊन यंदा टप्प्याटप्प्याने धरणे भरण्याचे नियोजन करण्यात आले. जेणेकरुन पुराची फार मोठी झळ व उपसर्ग लोकांना पोहचू नये यादृष्टीने काळजी घेतली आहे. ती खोरे व विभागनिहाय पुढीलप्रमाणे सांगता येईल :-

### कृष्णा खोरे :-

१. सांगली, सातारा व कोल्हापूर मधील प्रमुख कोयना, कृष्णा व पंचगंगा या तीन नद्यांच्या परिसरात पूरस्थिती निर्माण झाली होती. या तीन जिल्ह्यात या वर्षी दि. ०१ जून पासून मान्सून सक्रिय झाला.

२. माहे ऑगष्ट च्या पहिल्या आठवड्यामध्ये सह्याद्री घाट परिसरात अतिवृष्टी झाली. त्याचवेळी कोल्हापूर जिल्ह्यातील धरणामध्ये जलाशय परिचलन सुची नुसार पाणीसाठा होता. धरण पाणलोट क्षेत्रात व मुक्त पाणलोट क्षेत्रात जास्त प्रमाणात पाऊस





झाल्याने धरणांमधून विसर्ग सोडण्यात आला. त्यामुळे पंचगंगा नदीची पाणी पातळी धोका पातळी पर्यंत पोहचली.

३. दि. १५ ते १७ ऑगष्ट दरम्यान सातारा जिल्ह्यातील कोयना, नवजा व महाबळेश्वर येथे सरासरी २०० ते २५० मी.मी. पाऊस झाला तसेच मुक्त पाणलोट क्षेत्रातील जादा पर्जन्यमानामुळे आर्यविन पूल सांगली येथे ५३९.३० मीटर इशारा पातळी पर्यंत पाणी पातळी वाढली होती.

४. पंचगंगा नदीची पाणी वहन क्षमता राजाराम बंधारा, कोल्हापूर येथे ५३९८५ घफू/सें. आहे व कृष्णा नदीची पाणी वहन क्षमता आयर्विन पुल, सांगली येथे ९८००० घफू/सें. एवढी आहे.

५. सन २०२० मध्ये सांगली आर्यविन पूल येथून ७१







टि.एम.सी. , राजाराम बंधारा कोल्हापूर ( पंचगंगा नदी ) येथून ८४ टि.एम.सी. व राजापूर बंधारा (कृष्णा नदी) २२१ टि.एम.सी. पाणी कर्नाटक राज्यात वाहून गेले आहे.

कृष्णा खोऱ्यात या वर्षी पूर पातळी नियंत्रणात होती.

**विदर्भ :–**

दि. २८/०८/२०२० रोजी मध्यप्रदेश मधील छिंदवाडा, शिवणी बालाघाट जिल्ह्यात फार मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे मध्यप्रदेशातुन वाहणाऱ्या कन्हान, पेंच, बावनथडी, वैनगंगा या नद्यांना दि. २९/०८/२०२० ते ०१/०९/२०२० दरम्यान फार मोठा पूर आला. मध्यप्रदेशातील पेंच नदीवरील चौराई धरणपरिसरात महत्तम ४१४ मिमी इतका पाऊस एका दिवसात झाला.

पेंच नदीवरील तोतलाडोह धरणात ९६०० क्युमेक्स (३३९०१४ क्युसेक्स) इतका येवा होता तथापी खाली निर्माण झालेली पुरपरिस्थिती लक्षात घेता ६९२१ क्युमेक्स (२४४४०८ क्युसेक्स) इतका विसर्ग सोडण्यात आला. उर्वरीत विसर्ग तोतलाडोह धरणाच्या पूर्ण संचय पातळी व महत्तम पूर पातळी या भागात साठवून पूर विसर्ग नियंत्रित करण्यात आला. यामुळे पूराची तीव्रता कमी करण्यात यश आले.

गोसीखुर्द धरणस्थळी ७४ टक्के पाणलोट क्षेत्र हे अनियमित असून उर्वरीत २६ टक्के क्षेत्रामध्ये धरणातील विसर्ग नियंत्रित करण्यात आला.

मध्यप्रदेश मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे गोसीखुर्द धरणातून महत्तम ३०५९७ क्युमेक्स (१०८०५०२ लक्ष क्युसेक्स) इतका विसर्ग सोडण्यात आला. गोसीखुर्द धरणाच्या ठिकाणी इंग्लिस पूर हा २२९९४ क्युमेक्स (८१२०१० क्युसेक्स) इतका असून १०० वर्षात येणारा महत्तम पूर २७५०० क्युमेक्स (९७११३५ क्युसेक्स) आहे. ३१५ वर्षात एकदा येणारा महत्तम पूर हा ३४००० क्युमेक्स (१२००६७६ क्युसेक्स ) इतका असून आलेला पूर हा याच्या जवळपास होता. सदरील पूर १९९४ च्या पूरापेक्षा देखील जास्त होता.

या पुरादरम्यान ६८०९ दलघमी (२४० टीएमसी) येवा प्राप्त झालेला असून तो धरणातून नियमीत स्वरुपात सोडण्यात आला. सदरील येवा हा दि. २८/०८/२०२० रोजी धरणात असलेल्या साठ्याचा १६ पट होता. यावरुन या पूराची तिव्रता लक्षात येते.

तोतलाडोह धरणात जलसंपदा खात्याच्या अधिकारी यांनी पुरपरिस्थितीची तीव्रता ९५००० क्युसेक्स ने कमी केली त्यामुळे इतक्या प्रमाणात गोसीखुर्द धरणातुन सुद्धा कमी पाणी सोडण्यात आले. अन्यथा सध्याची पुराची तीव्रता फार मोठ्या प्रमाणात वाढून फार मोठे नुकसान झाले असते.

विदर्भाला पुराचा अपसर्ग मोठा आहे. पूर क्षेत्राच्या जवळ जाणारा हा प्रदेश असल्याने पुराच्या पट्ट्यात येणाऱ्या सर्व अतिक्रमणांबाबत गांभीर्याने विचार करावा लागेल. सरकारला प्रसंगी त्याबाबत काही ठोस निर्णयही घ्यावा लागेल. पूरक्षेत्राचे नियोजन व नियमन पद्धतशीरपणे करणे आवश्यक असून प्रसंगी

त्यासाठी कायद्याचीही मदत घ्यावी लागेल. पुरापासून धोका असणाऱ्या प्रदेशाचे नियोजन कसे करावे या दृष्टीने आर्थिक संशोधन व विचार पूर वारंवार येणाऱ्या भागात वाढीला लावण्याची गरज आहे. धरणांच्या अवस्त्रोत भागातील पूरप्रवण पट्ट्यांच्या नियोजनाचा व नियंत्रणाचा औपचारिक विचार यापुढे लवकर होणे अत्यंत आवश्यक आहे. आता नवी मोठी धरणे मुख्यत्वे विदर्भात उभारली जाणार आहेत. म्हणून त्यांचे नियोजन करताना पूर नियोजनाचा विचार संलग्न पूरप्रवण प्रदेशाच्या नियोजनाबरोबरच करून पूर साठवणीची पातळी ठरविणे हितकारक राहील.

**प्रश्न : पूर नियंत्रणासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या?**

**जयंत पाटील :** कृष्णा खोऱ्यातील नद्यांना २००५ आणि २०१९ या दोन्ही वेळेला अतिवृष्टीमुळे पूर आला होता. २०१९ च्या पुराचे प्रमाण हे २००५ च्या पुरापेक्षा अधिक होते. पाण्याची उंचीही ६ ते ७ फुटाने अधिक होती. २०१९ च्या पुराच्या वेळेला

## स्वत: नदीकाठी जाऊन नागरिकांना दिला धीर
## जयंत पाटील सांगलीकरांसाठी ग्राऊंड झिरोवर



*पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढत असल्याचे आणि पुराचे संकट घोंगावत आहे याचा अंदाज येताच पालकमंत्री जयंत पाटील यांनी सांगली जिल्हयातील नदीकाठच्या गावात पोहोचून नागरिकांना धीर दिला आहे. संभाव्य पूराचा धोका लक्षात घेता सांगली जिल्ह्यातील नदीकाठच्या गावांना बोटी दिल्या जात आहेत. वाळवा तालुक्यातील वाळवा व शिरगाव या गावांना पालकमंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते बोटी प्रदान करण्यात आल्या. यावेळी मंत्री जयंत पाटील यांनी नदीकाठच्या गावांना भेट दिली व संभाव्य पूरपरिस्थितीबाबत नागरिकांना स्वतः माहिती देत धीर दिला. कोरोना असो वा महापूर सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री जयंत पाटील नेहमीच सांगलीकरांच्या मदतीला धावून आले आहेत. मागील वर्षी याच महिन्यात पश्चिम महाराष्ट्रात महाप्रलयंकारी पूर आला होता. त्यावेळीही जयंत पाटील यांनी झोकून देत मदतकार्य केले होते. याशिवाय अन्न वाटप व इतर अत्यावश्यक वस्तूचे वाटप केले होते. ज्यावेळी जिल्ह्यात कोरोनाचा शिरकाव झाला त्यावेळीही पालकमंत्री जयंत पाटील यांनी तात्काळ हालचाली करत प्रशासनाला जनतेच्या सेवेसाठी दाखल करुन घेतले होते. इतकेच नाही जिथे कोरोनाचे रुग्ण आढळले त्या हॉटस्पॉट परिसरातही पालकमंत्री जयंत पाटील ग्राऊंड झिरोवर होते. आज संभाव्य पूरपरिस्थितीच्या निमित्ताने पुन्हा एकदा जयंत पाटील लोकांच्या खांद्याला खांदा लावून उभे ठाकले आहेत.*

लोकांनी २००५ चा पूर लक्षात घेऊन त्याप्रमाणे नियोजन केले होते. पण त्यापेक्षा जास्तीचा पूर आला. त्यामुळे अंदाज चुकले. यंदा जास्तीत जास्त पूर किती येऊ शकतो याचा अंदाज करून त्याप्रमाणे नियोजन केले व धरणातला पाणीसाठा त्याप्रमाणे नियंत्रित केला गेला. एवढेच नव्हे तर कर्नाटक सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्यात पाणी सोडण्याच्या व साठविण्याच्या प्रश्नावरुन अगोदरपासूनच सुसंवाद व्हावा आणि माहितीची खुलेपणाने देवाणघेवाण होऊन त्यानुसार नियोजन व्हावे अशी व्यवस्था आम्ही केली. त्यासाठी पुढील उपक्रम राबविले.

१. मा. ना. श्री. जयंत पाटील, जलसंपदा व लाक्षेवि, महाराष्ट्र शासन यांचे अंतर्गत प्रदेश, महामंडळ, राज्यस्तरावर व आंतरराज्य समन्वयासाठी मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. २८/०५/२०२० रोजी बैठक घेण्यात आली.

२. दि. ०८/०७/२०२० रोजी सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे मा. ना. श्री. जयंत पाटील, जलसंपदा व लाक्षेवि, महाराष्ट्र शासन व श्री. रमेश जारकीहोळी, जलसंपदा मंत्री कर्नाटक राज्य यांचे मध्ये पूरनियंत्रण व आंतरराज्य पाणीवाटप संदर्भात बैठक घेण्यात आली.

३. पूरनियंत्रणाचे काम प्रभावी होण्यासाठी कृष्णा नदीवरील कराड ते राजापूर बंधाऱ्यापर्यंतच्या भागासाठी जलसंपदा विभागांतर्गत विभागीय स्तरावरील पूर नियंत्रण कक्षाची स्थापना करुन हा कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात आला आहे.

४. कृष्णा उपखोऱ्यातील धरणातील आवक, सोडण्यात येणारा विसर्ग, बाधीत स्थळाजवळील पातळी व पर्जन्यमानाची माहिती संकलित करुन सकाळी ८.०० वा. व सायंकाळी ५.०० वा. जलसंपदाविभाग, मंत्रालय, मा मुख्य अभियंता, ज.स.वि., लवाद, मा. जिल्हाधिकारी व अन्य वरिष्ठ अधिकारी यांना वेळोवेळी सादर करणेची कार्यवाही करणेत येवून याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

५. अलमट्टी धरण व्यवस्थापनाशी दररोज जलशास्त्रीय माहितीची देवाण घेवाण करणेत आली.

६. कृष्णा उपखोऱ्यातील एकत्रित विसर्ग राजापूर बंधारा (महाराष्ट्र राज्याची सरहद्द) येथे मोजला जातो व त्याप्रमाणात अलमट्टी येथून विसर्ग सोडणेबाबत त्यांच्याशी सतत संपर्क साधून कार्यवाही करणेत येते.

७. जलसंपदा विभागांतर्गत कृष्णा खोऱ्यासाठी RTDAS (Real time data Acquisition System) हि नवी प्रणाली विकसीत करण्यात आली असून या प्रणालीअंतर्गत पर्जन्य केंद्रावरील पाऊस मोजण्यात येतो व त्या आधारे पाण्याचा येवा परिगणित करून संभाव्य पूराचा अंदाज बांधला जातो. सर्वसाधारणपणे २४ ते ४८ तास आधी पूराचा अंदाज येवू शकतो.

८. जलसंपदा विभाग़ांतर्गत लोअर गोदावरी भागासाठी RTDAS ही प्रणाली विकसीत करण्यासाठी निविदा प्रक्रिया चालू आहे. ही प्रणाली विकसीत झाल्यानंतर विदर्भ भागातील सुद्धा संभाव्य पूराचा अंदाज सुद्धा योग्य रित्या बांधला जावू शकेल.

**प्रश्न : पूर मोजण्यासाठी नव्याने वापरण्यात येणारी सूत्रे कोणती? किती तास आधी पूराचा अंदाज येवू शकतो?**

**जयंत पाटील** : सर सी. सी. इंग्लिस यांनी २० व्या शतकाच्या प्रारंभी जलविज्ञान शास्त्राचा पाठपुरावा करुन उपलब्ध पाण्याचे आकडे निश्चित करण्यासाठी व पुराचा अंदाज येण्यासाठी काही सूत्रे मांडली होती. ती आपण महाराष्ट्रात बरीच वर्षे वापरीत होतो. श्री. इंग्लिस यांनी हा सर्व अभ्यास सह्याद्रीच्या कुशीतील स्त्रवण क्षेत्रावरच करुन त्याच्या मर्यादाही टिपणीमध्ये स्पष्ट केल्या होत्या. इंग्लिस सूत्राने पूर अणि पाणलोट क्षेत्राचा थेट संबंध निर्माण केलेला असून त्यासाठी काही सहगुणक आणि घातांक वापरले. परंतु या सूत्रात पावसाची तीव्रता, भूपृष्ठाचे भौगोलिक







स्वरुप (आकार, चढउतार, पावसाने लक्ष केंद्रित केलेला भूभाग व वेळ) इत्यादी बाबी प्रतिबिंबित होत नाहीत. शिवाय एका पाणलोट क्षेत्राचे आकारमान जसे वाढेल त्या प्रमाणात पुराचे आकारमान जे बदलायला पाहिजे ते बदलण्याची क्षमता या सूत्रात नाही. उदा. या सूत्रात पाणलोट क्षेत्र (कॅचमेंन्ट एरिया) हे एकच असे चलबल (व्हेरीएबल) असल्याने अहमदनगर किंवा जळगाव मधील कमी पावसाच्या पाणलोट क्षेत्रात येणारा पाऊस आणि तेवढ्याच पाणलोटात कोकण किंवा महाबळेश्वरला येणारा पूर हा एकच दर्शविला जाऊ शकतो हे चुकीचे आहे. यामुळे पुराचे करण्यात येणारे अंदाज बऱ्याच प्रमाणात चुकू शकतात. म्हणून महाराष्ट्रातील सर्वसामान्य सहा उपप्रदेशांचा विचार करुन अशाच प्रकारची नवीन सूत्रे तयार करण्यात आली आहेत. यात इंग्लिस सूत्राचा साधा, सरळ सुलभपणा आहेच पण इंग्लिस सूत्रातल्या सर्व त्रुटी दूर केलेल्या आहेत. त्यामुळे पाणलोट क्षेत्र कितीही लहान-मोठे आकाराचे व कुठल्याही विभागातील असो, नवीन सूत्रामुळे मांडला जाणारा पुराचा अंदाज हा सविस्तरपणे युनिट हायड्रोग्राफ पद्धतीने केल्या जाणाऱ्या पुराच्या अंदाजाच्या जवळपास (९० टक्के) येऊ शकतो.

जलसंपदा विभागांतर्गत कृष्णा खोऱ्यात RTDAS (Real time data Acquisition System) हि नवी प्रणाली विकसीत करण्यात आली असून त्याचे संकेतस्थळ www.rtsfros.com असे आहे. या प्रणालीअंतर्गत पर्जन्य केंद्रावरील पाऊस मोजण्यात येतो व त्या आधारे पाण्याचा येवा परिगणित करून संभाव्य पूराचा अंदाज बांधला जातो. सर्वसाधारणपणे २४ ते ४८ तास आधी पूराचा अंदाज येवू शकतो.

**प्रश्न : कोल्हापूर-सांगली पूर दरवर्षी एवढया मोठया प्रमाणात का येतो?**

**जयंत पाटील** कोल्हापूर सांगली भागात दरवर्षी पूर येतोच असे नाही. सांगली कोल्हापूर येथील सन २०१९ मधील महापूराच्या पार्श्वभूमीवर शासनाने गठीत केलेल्या वडनेरे समितीच्या अहवालामध्ये पूर येण्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे नमूद केली आहेत.

१. कमी वेळेत जास्त पाऊस :- धरण पाणलोट क्षेत्रात व मुक्त पाणलोट क्षेत्रात एकाच वेळी जास्त पर्जन्य वृष्टी झाल्यास नद्यांची वहनक्षमता कमी पडल्याने पूरस्थिती निर्माण होते.

२. नदीची भौगोलिक रचना :- कोल्हापूर सांगली जिल्ह्यामध्ये कृष्णा, वारणा व पंचगंगा या तीन प्रमुख नद्यांचे पाणी येत असून नद्यांचा संगम, कमी उतार ( Low gradient) व नद्यांची वळणे ( River Meandering) यामुळे पाण्याचा प्रवाह संथ होवून पूरस्थिती निर्माण होते.

३. नदीमध्ये साठलेला गाळ, पूरप्रवण क्षेत्रात झालेली बांधकामे व अतिक्रमणे.

**प्रश्न : आलमटटी आणि सांगली-कोल्हापूरच्या पूराचा काही संबंध आहे का? याबाबत वडनेरे समितीने दिलेल्या अहवालाबाबत मतमतांतरे आहेत, आपले मत काय?**

**जयंत पाटील** : आलमट्टी धरण हे सांगली व कोल्हापूर शहरापासून सर्वसाधारणपणे २६० कि.मी. इतक्या अंतरावर कृष्णा नदीवर आहे. शासनाने गठीत केलेल्या वडनेरे समितीने सन २०१९ मधील महापूरा बाबत विस्तृत अभ्यास करुन अलमट्टी धरणाचा सांगली व कोल्हापूरच्या पूराशी संबंध नसल्याचे मत व्यक्त केले आहे. हा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने केला असला तरी हा अभ्यास करताना काही क्षेत्रीय मर्यादा होत्या. समितीच्या मताशी मी पूर्णपणे सहमत नाही. अलमट्टी धरणाचे वरचे बाजूस असणाऱ्या सर्व structures चा जलशास्त्रीय अभ्यास पूर्ण होणे अद्याप बाकी आहे.

वडनेरे-समितीच्या अहवालाबाबत तज्ज्ञांमध्ये आणि कोल्हापूर-सांगलीतल्या जनतेमध्ये बरीच मतमतांतरे आहेत. स्थानिक जनतेला हा अहवाल अजिबात मान्य नाही व पसंत पडलेला नाही हे मला माहिती आहे. याबाबत अनेक लोकांनी त्यांच्या प्रतिक्रिया माझ्याकडे व्यक्त केल्या आहेत. कोल्हापूर आणि कर्नाटकाच्या सीमेवर जे बंधारे व हिप्परगा बराजसारखी मोठी धरणे उभी केली आहेत. तिथे वाटेत मोठ्या मोठ्या उंचीचे (उदा. मांजरी) भराव घातलेले आहेत. या भरावांमुळे पाणी अडते. ते पुढे वाहून जात नाही. त्याचा फुगवटा मागे येतो आणि कोल्हापूर-सांगलीतल्या पाण्याची उंची वाढते असे बऱ्याच लोकांचे म्हणणे आहे. तशी तक्रारही आहे. या सर्वांचा तज्ज्ञांमार्फत अभ्यास करुन घ्यावा लागेल. त्यानंतरच वस्तुस्थिती समोर येईल. असा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची आणखीन एक समिती लवकरच नेमली जाईल.

सांगली-कोल्हापूरच्या पूरासंबंधी वडनेरे समितीने जी मते व्यक्त केली आहेत त्या सर्व मतांशी मला सहमत होता येणार नाही. काही मतांबाबत माझे विचार व अनुभव निराळे आहेत. स्थानिक लोकांचीही मते निरनिराळी आहेत. या सर्व मतांचा एकत्रितपणे विचार व चर्चा होणे आवश्यक आहे. त्यासंबंधी तज्ज्ञ व अनुभवी लोकांना आणि स्थानिक जनतेच्या प्रतिनिधींना एकत्र करून जाहीरपणे चर्चा घडवून आणण्याचा मानस आहे. परंतु सध्या कोरोना कोविड-१९ या महामारीचा सर्वत्र वेगाने प्रसार होत असल्यामुळे हा व्हायरस आटोक्यात आल्यानंतरच त्यासंबंधीचे चर्चासत्र आयोजित करण्यात येईल.

**प्रश्न : पूरप्रवण रेषेत झालेली अतिक्रमणे काढता येतील का? त्याबाबतचे धोरण काय?**

**जयंत पाटील** : प्रत्येक नदीची पूरप्रवण रेषा ठरलेली आहे. तिच्या बाहेर बांधकामे व इतर विकास कामे व्हावीत अशी अपेक्षा आहे. परंतु बऱ्याच ठिकाणी पूरप्रवण रेषेच्या आतमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकामे झालेली आहेत, अतिक्रमणे झालेली आहेत. यामुळे पुराचा उपसर्ग व त्रास जनतेला भोगावा लागतो आहे. पूर येणे व त्याची क्षमता ठरविणे आपल्या हातात नाही. धरणाच्या पोटात जेवढे पाणी मावू शकेल तेवढेच आपण साठवू शकतो. त्यापेक्षा जास्त पाणी आले तर ते नदीपात्रात सोडण्याशिवाय पर्याय राहात नाही. अतिक्रमणांमुळे पूराची समस्या जिथे आणखीन गंभीर व तीव्र बनत असेल अशा ठिकाणी तातडीने ही अतिक्रमणे दूर करण्याचा निर्णय व कारवाई करावीच लागेल. कारण शेवटी लोकांचे जीवन महत्त्वाचे आहे. त्यामुळे पूररेषेच्या आत जी अतिक्रमणे झालेली आहेत त्याकडे सरकारला दुर्लक्ष करता येणार नाही. कधी ना कधी ती अतिक्रमणे काढावीच लागतील. अन्यथा पूरापासूनची इजा वाढत जाईल.

**प्रश्न : पूराचे पाणी इतरत्र वळवून दुष्काळी भागात वाहून**







# दुष्काळग्रस्त मराठवाड्याला ठिबक सिंचनाद्वारे पाणी

## जयंत पाटील यांची इस्त्रायलमधील तज्ज्ञांशी व्हिसीद्वारे बैठक

***दुष्काळग्रस्त मराठवाड्याला ठिबक सिंचनाद्वारे पाणी पुरवण्याबाबत मेकोरेट कन्सल्टंट डॉ. दियागो बर्गर आणि काऊंसिल जनरल ऑफ इस्त्रायल यांच्या समवेत जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी ११ ऑगस्ट २०२० रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक घेतली. इस्त्रायलमध्ये झालेल्या जलक्रांतीच्या धर्तीवर मराठवाड्यात त्यापद्धतची यंत्रणा राबवता येईल का याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मेकोरेट कन्सल्टंट, काऊंसिल जनरल ऑफ इस्त्रायल यांनी सहकार्य करण्यास सहमती दर्शवली तसेच एक संयुक्त अभ्यास गट स्थापन करण्याबाबतही निर्णय झाला. जलसंपदा विभागाचे सचिव संजय घाणेकर, मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे संचालक डॉ. एन. व्ही. शिंदे व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच इस्त्राईलचे प्रतिनिधी म्हणून याकोव, निलरोड कलमार,अनय जोगळेकर, दियागो बर्गर,जलसंपदा विभागाचे सहसचिव अतुल कपोले व सहसचिव संजय बेलसरे उपस्थित होते.***



**नेण्यासाठी आपण नव्याने काही प्रकल्प हाती घेणार आहात का?**

**जयंत पाटील :** टेंभू ता. कराड येथून कृष्णा-निरा बोगदा प्रकल्प यांसारखे नविन प्रकल्प हाती घेण्याचे विचाराधीन आहे.मात्र अशा प्रकल्पांना लवाद निर्णयाचे व्यवधान असल्यामुळे अन्य राज्यांची सहमती प्राप्त होणे आवश्यक आहे.

**प्रश्न : मराठवाड्याला हे पूराचे पाणी देता येईल का?**

**जयंत पाटील :** मराठवाड्यात उगम पावणाऱ्या नद्या या मुख्यत्वे दुष्काळी प्रदेशातच उगम पावतात. त्यामुळे त्यांचा येवा खूप कमी असतो. शिवाय मराठवाड्यात पडणाऱ्या पावसाचे प्रमाणही कमी आणि अनियमित असते. म्हणून पाणी टंचाई व दुष्काळ यांचा वारंवार सामना मराठवाड्याला करावा लागतो आहे. मराठवाड्यातील जनतेला आणि विशेषतः शेतकऱ्यांनाही विकासाची मोठी आस आहे. शेतीत निरनिराळे प्रयोग करुन व विविध पिके घेऊन तो तग धरण्याचा प्रयत्न करतो आहे. कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्याला पाणी देण्यासंबंधीची चर्चा मागील अनेक वर्षांपासून चालू आहे. काही पाणी देऊन झाले आहे. उर्वरीत पाण्याच्या योजना चालू आहेत. तथापि ब्रिजेशकुमार लवादाने पाणी हस्तांतरणावर काही मर्यादा घातल्या आहेत. त्यामुळे लवादाच्या निर्णयाच्या अधीन राहूनच मराठवाड्याला कृष्णा खोऱ्यातून पाणी देता येईल. मराठवाड्याचा जो भाग कृष्णा खोऱ्यात येतो त्याला पाणी देण्यासंबंधी लवादाचा कोणताही अटकाव नाही. मात्र कृष्णा खोऱ्याच्या बाहेर मराठवाड्याचे जे क्षेत्र आहे त्याला पाणी देता येणार नाही असे लवादाने स्पष्ट केलेले आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र या तीनही राज्यातून वाहणाऱ्या कृष्णा नदीत जे पाणी उपलब्ध होते त्याचा आणि राज्यांच्या पाणी मागणीचा विचार केला तर कृष्णा खोरे हे ही पाणी उपलब्धतेच्या दृष्टीने तुटीचेच खोरे आहे असे मत लवादाने व्यक्त करुन पाणी इकडून तिकडे नेण्यावर बंधने घातली आहेत. भिमा नदीतील पुराचे पाणी काही प्रमाणात कृष्णा मराठवाडा प्रकल्पाद्वारे मराठवाड्यास देणे शक्य होईल.

# प्रणब मुखर्जी

## राजकारणाचा चालता बोलता... संदर्भ ग्रंथ

गहिनीनाथ

**पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदासह केंद्रात परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री, अर्थमंत्री अशी निरनिराळी मानाची पदे भूषवून शेवटी भारताचे सर्वोच्च असे राष्ट्रपतीपद भूषविलेल्या प्रणब मुखर्जी यांचे नुकतेच निधन झाले, त्यांच्या आठवणींना दिलेला उजाळा...**



प्रत्येक राजकीय पक्षात अशा काही व्यक्ती असतात की ज्यांच्या गुणवत्ता व पात्रतेला तेथे न्याय मिळत नाही. परंतु त्यांची निष्ठा अभंग राहते आणि त्या निष्ठेनेच ते काम करीत राहतात. प्रणव मुखर्जी काही प्रमाणात याच श्रेणीत येतात. ते पंतप्रधान होऊ शकले असते परंतु परिस्थितीने त्यांना ते पद मिळू दिले नाही. तरीही त्यांची काँग्रेसवरील निष्ठा कायम राहिली. अनेकदा अनौपचारिक गप्पांमध्ये त्यांच्या हुकलेल्या पंतप्रधानपदाचे कारण ते त्यांच्या हिंदी भाषेला देत असत. 'माझी हिंदी भाषा एवढी भयंकर आहे की मी हिंदी बोलायला लागलो तर लोकं मतंच देणार नाहीत' असे ते म्हणत. ते हे विनोदाने म्हणत परंतु ते वेळ मारुन नेण्यासाठी असे. त्यांच्या मनात तो सल कायम राहिला असावा. पंतप्रधानपद मनमोहनसिंग यांना मिळाल्यानंतर त्यांना त्यांच्या सरकारमध्ये सामील होण्याची इच्छा नव्हती. परंतु सोनिया गांधी यांच्या वैयक्तिक आग्रहावरुन आणि त्यांच्या ज्येष्ठतेला पूर्ण न्याय मिळण्याच्या हमीवर सरकारमध्ये सामील होण्यास त्यांनी होकार दिला. या ठिकाणी चंद्रगुप्त मौर्याच्या काळातील एका व्यक्तीची आठवण येते. त्या व्यक्तीवर विशाखादत्ताचे 'मुद्राराक्षस' नावाचे संस्कृत नाटकही आहे. मगध साम्राज्यातील शेवटचा नंदवंशीय राजा धनानंद होता. त्यानेच चाणक्याचा अपमान केल्याने चाणक्याने त्याचे साम्राज्य नष्ट करण्याची प्रतिज्ञा केलेली होती. चंद्रगुप्त मौर्याचा राज्याभिषेक झाल्यानंतर विशाल मगध साम्राज्यासाठी कुशल प्रशासकाची नितांत आवश्यकता होती. धनानंदाचे प्रधान अमात्य राक्षस होते. त्यांच्या प्रशासनिक कौशल्याबद्दल खुद्द चाणक्याला आदर होता. परंतु अमात्य राक्षस हे टोकाचे स्वामीनिष्ठ म्हणून परिचित होते. त्यामुळे धनानंदाचा पाडाव झाल्यानंतर ते दुसऱ्या राज्यात जाऊन चंद्रगुप्ताविरुध्द कारवाया करु लागले. चाणक्याने त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला पण ते नंद वंशाची निष्ठा सोडायला तयार नव्हते. अखेर चाणक्य चंद्रगुप्ताकरवी अमात्य राक्षसाचे परममित्र व्यापारी चंदनदास याला मृत्युदंड देत असल्याची घोषणा करतात. त्याबरोबर अमात्य राक्षस मित्राचा जीव वाचविण्यासाठी चंद्रगुप्त व चाणक्याकडे दयायाचना करु लागतात.





चाणक्य त्यांना अट घालतो की चंद्रगुप्ताचे अमात्यपद स्वीकारुन पूर्वीप्रमाणेच मगध साम्राज्याचे प्रशासन तुम्ही सांभाळावे. हा नीतीमान राजा आहे. राक्षस त्याला होकार देतात आणि चंद्रगुप्त निर्धास्त राज्य करु लागतो. युपीए मध्ये प्रणव मुखर्जी यांची भूमिकाही 'अमात्य राक्षस' यांच्यासारखीच राहिली. त्यांनी त्यांची निष्ठा काँग्रेसला वाहिली होती व त्या आधारेच त्यांनी या सरकारचे

'संकटमोचक' म्हणूनही वेळोवेळी भूमिका निभावली.



मुखर्जी यांच्यावरील अन्यायाची दखल घ्यावीच लागेल. युपीए सरकार स्थापन झाल्यानंतर सोनिया गांधी यांनी त्यांना मंत्री होण्याची गळ घातली आणि त्यांच्या ज्येष्ठतेचा सन्मान केला जाईल असेही सांगितले. त्यामुळे मुखर्जी यांचा समज झाला की त्यांना दुसऱ्या क्रमांकाचे गृहमंत्रीपद दिले जाईल. त्यामुळे आपल्या पत्रकारमित्रांबरोबर बोलताना देखील प्रणवदा हे गृहमंत्रीपदाच्या कोणकोणत्या जबाबदाऱ्या असतात वगैरे गोष्टी बोलत होते. प्रत्यक्षात काय घडले ? जे लोकसभा निवडणूक हरले होते त्या शिवराज पाटील यांना सोनिया गांधी यांनी गृहमंत्री केले. तो सर्वांनाच धक्का होता. मुखर्जींना संरक्षणंत्रीपद देण्यात आले. तसेच लोकसभेचे नेते म्हणून त्यांची निवड करण्यात आली. संरक्षणमंत्रीपद हे महत्वाचे पद निश्चित आहे परंतु गृहमंत्रीपद हे दुसऱ्या क्रमांकाचे म्हणजेच पंतप्रधानांच्या खालोखाल खाते मानले जाते.

राजशिष्टाचारानुसार पंतप्रधानांच्या अनुपस्थितीत गृहमंत्री हाच देशाची सूत्रे सांभाळतो. किंबहुना तो एक प्रघात आहे. प्रणव मुखर्जी यांच्या मनाला ही गोष्ट लागणे अपरिहार्य होते परंतु त्यांनी त्याबद्दल चकार शब्दाने नाराजी व्यक्त केली नाही. अर्थात काही काळानंतर त्यांना संरक्षणमंत्रीपदावरुन हलवून परराष्ट्रमंत्री करण्यात आले. हे खाते मात्र प्रणवदांना मानवले. परंतु हळूहळू त्यांना त्या खात्याची दगदगही सहन होईना आणि सततचे परदेशदौरे आणि अतिशय कामाची वर्दळ असलेले हे खाते असल्याने त्यांनी परदेश दौरे कमी केले.

मुंबईवरील हल्ल्यानंतर परिस्थितीने पुन्हा वळण घेतले. 'युपीए-१'चे ते शेवटचे वर्ष होते व सरकारही अखेरच्या टप्प्यात होते. शिवराज पाटील यांना गृहमंत्रीपदावरुन जावे लागले. त्यांच्या जागी प्रणव मुखर्जी यांना न नेमता पी.चिदंबरम यांना गृहमंत्री करण्यात आले आणि त्यांच्याकडील अर्थखात्याची अतिरिक्त जबाबदारी प्रणव मुखर्जी यांच्याकडे देण्यात आली. तो एकप्रकारे त्यांना दिलासा होता. असे सांगतात की मनमोहनसिंग हे अर्थखाते प्रणव मुखर्जी यांच्याकडे देण्यास फारसे उत्सुक नव्हते. परंतु सोनिया गांधी यांना कोणत्याही परिस्थितीत मुखर्जी यांना गृहमंत्री करायचे नव्हते व यात मुखर्जी यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली. या नात्याने त्यांनी सरकारचा शेवटचा हंगामी अर्थसंकल्पही सादर केला.

यानंतर निवडणुका झाल्या आणि अनपेक्षितपणे काँग्रेसचे संख्याबळही वाढले आणि त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुन्हा सत्तेत आले जे 'युपीए-२' म्हणून ओळखले जाऊ लागले. हे सरकार सत्तेत आल्यानंतर गृहमंत्रीपद आणि अर्थमंत्रीपद असे प्रश्न पुन्हा उभे राहिले. मनमोहनसिंग यांना



चिदंबरम हे अर्थमंत्रीपदी हवे होते परंतु त्यांची इच्छा फलद्रूप होऊ शकली नाही. चिदंबरम गृहमंत्रीपदी कायम राहिले आणि मुखर्जी यांच्याकडेही अर्थमंत्रीपद कायम राहिले. इंदिरा गांधी यांच्या काळात ते अर्थमंत्री होते व शक्तिशाली अर्थमंत्री म्हणून त्यांचा लौकिक होता कारण इंदिरा गांधी यांनी त्यांना 'नंबर-२'चे स्थान दिले होते. इंदिरा गांधी यांनी राजशिष्टाचार बदलून त्यांच्या अनुपस्थितीत म्हणजेच त्या परदेशदौऱ्यावर गेल्यावर केंद्रीय मंत्रिमंडळाची सूत्रे अर्थमंत्री असलेल्या प्रणव मुखर्जी यांच्याकडे देण्यास सुरुवात केली. तो विश्वास त्यांनी संपादन केला होता. त्यामुळे एवढ्या वर्षांनंतर अर्थमंत्रीपद पुन्हा त्यांच्याकडे आल्याने त्यांची नाराजी काहीशी दूर झाली.



परंतु प्रणव मुखर्जी हे परंपरागत अर्थशास्त्री होते व त्यामुळेच त्यांनी अर्थमंत्री या नात्याने जी काही पावले उचलली किंवा ज्या नव्या योजना लागू केल्या त्या विवादास्पद ठरल्या. विशेषतः त्यांनी लागू केलेली 'जनरल अँटि अव्हॉइडन्स रूल' योजना वादग्रस्त ठरली. त्यांनी आर्थिक सुधारणांना वेग देण्याऐवजी काही परंपरागत उपायांचा अवलंब केला. यातून त्यांच्या आर्थिक धोरणांबद्दल असंतोष वाढत गेला आणि सरकार अंतर्गत तसेच पक्षांतर्गत पातळीवरही त्यांच्यावर टीका होऊ लागली. परंतु त्यांची ज्येष्ठता लक्षात घेऊन पंतप्रधान मनमोहसिंगदेखील त्यांना सूचना करीत नसावेत. परिणामी अर्थव्यवस्थेत विस्कळितपणा निर्माण झाला. त्यात आर्थिक मंदीचे वारे सुरु झाले होते आणि मुखर्जी यांच्या उपाययोजना परिणामकारक ठरेनात. यातूनच अर्थखाते पुन्हा चिदंबरम यांच्याकडे देण्याच्या मागण्या होऊ लागल्या आणि त्या काळात मुखर्जींना पुन्हा तणावाला तोंड द्यावे लागले.

२०१२ उजाडल्यावर राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या हालचाली सुरु झाल्या. प्रणव मुखर्जी यांनी मोर्चेबांधणी सुरु केली. अर्थमंत्री म्हणून त्यांच्यावर टीका होऊ लागली होती. त्यामुळे त्यांनी वेगळ्याच मार्गाने जाण्याचे ठरविले. पंतप्रधानपदी म्हणजेच साऊथ ब्लॉक किंवा रेसकोर्स रोडवर जाता आले नाही तर मग थेट 'रायसीना हिल'वर जाण्याबाबत त्यांच्या मनात विचार घोळ लागले. मंत्री व संसदपटु या नात्याने व प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत मुखर्जी यांनी सर्व पक्षांमध्ये अत्यंत चांगले संबंध निर्माण केले होते. लालकृष्ण



अडवानी, अटलबिहारी वाजपेयी, ज्योति बसू किंवा त्यांच्यानंतरचे कम्युनिस्टांचे सर्व प्रमुख नेते यांच्याबरोबर त्यांनी मैत्री निर्माण केली होती. त्याचाच आधार घेण्याचे त्यांनी ठरविले. या त्यांच्या मोर्चेबांधणीत त्यांना ममता बॅनर्जी, मुलायमसिंग यांची साथ मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते शरद पवार हे त्यावेळी केंद्रात कृषिमंत्री होते. त्यांनी देखील मुखर्जी यांना साथ दिली. काँग्रेसचा उमेदवार निवडून येण्यासाठी ममता बॅनर्जी, मुलायमसिंग, कम्युनिस्ट यांच्या मतांची आवश्यकता होती. त्यामुळे या नेत्यांनी त्यांचे वजन मुखर्जी यांच्या पारड्यात टाकले. शरद पवार यांच्या मध्यस्थीमुळे शिवसेनेने देखील भाजपची

नेतेही झाले. थोडक्यात प्रणवदांनी पंतप्रधानपदाचे नव्हे तर राष्ट्रपतिपदाचे स्वप्न पूर्ण केले.

यासंदर्भातही मुखर्जी यांनी त्यांच्या आठवणीत उल्लेख करताना आणखी एक रहस्य उलगडले आहे. २०१२ पर्यंत 'युपीए-२' प्रतिमा घसरायला लागली होती. त्यामुळे अशी चर्चा होऊ लागली होती की मनमोहनसिंग यांना राष्ट्रपति करुन प्रणवदांना पंतप्रधान करायचे. परंतु ती केवळ एक कल्पनाच होती असे ध्यानात आल्यानंतर प्रणवदांनी स्वतःच राष्ट्रपति व्हायचे ठरवले व त्या स्वप्नाची पूर्तता केली.

सक्रिय राजकारणात असताना प्रणव मुखर्जी विविध पदांवर राहिले. त्या पदांमुळे त्यांचा पत्रकारांशी सतत संपर्क




साथ सोडून मुखर्जी यांना पाठिंबा जाहीर केला. अशी वातावरणनिर्मिती झाल्याने सोनिया गांधी यांचा नाईलाज झाला आणि त्यांनी प्रणव मुखर्जी यांच्या नावाला म्हणजेच राष्ट्रपतिपदासाठीच्या उमेदवारीला होकार दिला. अन्यथा सोनिया गांधी यांच्या मनात तत्कालीन उपराष्ट्रपति हमीद अन्सारी यांना राष्ट्रपति म्हणून बढती देण्याची इच्छा होती. परंतु मुखर्जी यांच्या बाजुने वाढता पाठिंबा पाहिल्यानंतर त्यांनी माघार घेतली. मनमोहनसिंग यांच्या दृष्टीने ही पर्वणी होती. कारण प्रणव मुखर्जी राष्ट्रपति होण्याने अर्थमंत्रीपद रिकामे होणार होते आणि त्या जागेवर पुन्हा चिदंबरम यांना नेमणे शक्य होते. तसेच करण्यात आले आणि गृहमंत्रीपद म्हणून सुशीलकुमार शिंदे यांची वर्णी लागली. ते लोकसभेचे

आला. एकेकाळी काँग्रेस महासमितीचे ते प्रमुख प्रवक्ते आणि मीडिया विभागाचे प्रमुखही होते आणि त्यानिमित्ताने त्यांच्याशी नियमित वार्तालाप करण्याची संधी मिळाली. त्यानंतर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'युपीए'चे सरकार २००४मध्ये सत्तेत आले. मुखर्जी हे त्या सरकारचे प्रमुख आधारस्तंभ राहणार यात कुणालाच शंका नव्हती. त्यामुळे त्या काळातही त्यांच्याशी संपर्क राहिला आणि त्यामुळेच राष्ट्रपति झाल्यानंतरही त्यांनी या पत्रकारांच्या समूहाशी नियमित संपर्क राखला होता.

मंत्री असताना पत्रकारांशी गप्पा मारण्याची सवय लागलेली होती आणि राष्ट्रपति या नात्याने ते सक्रिय राजकारणात नसल्याने पत्रकारांना आमंत्रित करुन





त्यांच्याबरोबर अनौपचारिक गप्पा मारण्याचे कार्यक्रम ते अगदी नियमितपणे करीत असत. महिना किंवा दोन महिन्यातून एकदा ते ज्या पत्रकारांना ओळखत त्या सर्वांना चहापानाला बोलावत असत. गप्पा आणि खाणेपिणे असा तो कार्यक्रम अगदी दोनदोन तास चालत असे. यामध्ये पत्रकार त्यांच्याबरोबर फोटो काढून घेत असत किंवा अगदी वाटेल त्या विषयावर त्यांच्याशी चर्चा होत असे. मुखर्जीही मनमोकळेपणाने प्रश्नांना उत्तरे देत असत. निघताना ते न चुकता सर्वांना 'वॉर्निंग' द्यायला विसरत नसत..... 'एव्हरीथिंग इज ऑफ द रेकॉर्ड, नथिंग टू बी पब्लिश्ड' असे ते सर्वांना हसतहसत सांगत असत. अल्पोपहारात ते बंगाली मिठाई ठेवत. एकदा त्यांनी खजुराच्या गुळापासून बनवलेला संदेश सर्वांना आग्रहाने खायला घातला. खरोखरच चविष्ट असा तो गोड पदार्थ होता. मग प्रणवदांनी त्याची माहितीही सांगून तो कसा आरोग्यकारक आहे तेही सांगितले. प्रणवदा त्यांच्या प्रकृति व आरोग्याबाबत अतिशय जागरूक असत. रोज ते आठ किलोमीटर चालण्याचा व्यायाम करीत असत. इंदिरा गांधी यांच्या काळापासून ते १३ तालकटोरा मार्ग या बंगल्यात रहात असत. ज्येष्ठतेमुळे त्यांना याहून मोठा बंगला मिळू शकत होता पण ते त्या लहानशा बंगल्यातच राहिले. तो बंगला त्यांना लाभदायक होता अशी त्यांची श्रध्दा होती. तेरा हा आकडा त्यांना शुभ असल्याचा किस्साही त्यांचे निकटवर्ति सांगत असत. त्यांचा विवाह तेरा तारखेला झाला होता. राष्ट्रपति झाले तेही तेरावे! त्यामुळे तेरा या संख्येचे त्यांच्या आयुष्यात महत्व होते असे सांगितले जात. योगायोग असा की त्यांचे निधन ३१ ऑगस्टला झाले. तो आकडा उलटा केल्यास '१३' होतो.



प्रणवदांना ओळखीचे पत्रकार प्रणवदा किंवा चक्क दादा म्हणून हाक मारत असत आणि तेही त्यांना प्रतिसाद देत असत. राष्ट्रपति झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रपतिभवनातील ग्रंथालयाचे मोठ्या हौशीने पुनरुज्जीवन केले. त्यात अनेक जुनी व दुर्मिळ पुस्तके होती त्यांची साफसफाई करुन ती जतन करण्यासाठी उपाय केले. अशाच एका गप्पांच्या मैफलीत त्यांनी या ग्रंथालयाचा फेरफटका मारताना येथे अध्ययनासाठी जरूर येत चला असे सांगितले होते. भारतीय राजकारण, राजकीय इतिहास, प्रशासन, संसदीय लोकशाही, भारतीय राज्यघटना आणि तिचा विकास हे त्यांच्या अत्यंत आवडीचे विषय होते आणि त्यावर ते तासंतास बोलत असत. ज्या राजकीय नेत्यांकडून पत्रकारांना देखील शिकता येत असे अशा राजकीय पिढीचे ते प्रतिनिधी होते. ती पिढी आता जवळपास अस्तंगत होत चालली आहे. मुखर्जी हे त्याच मालिकेतले अगदी शेवटचे म्हणावे लागतील. असा अभ्यासू आणि मार्गदर्शक नेता दुर्लभच!

# नाही अचानक, ना अतर्क्य परंतु अनपेक्षित!

अभय टिळक







काही बाबी अशा असतात की त्या अतर्क्यही नसतात आणि अवचितच, ध्यानीमनी नसताना टपकल्या असेही म्हणता येत नाही. परंतु, त्यांतील एखादी गोष्ट प्रत्यक्षात ज्या वेळी साकारते तेव्हा तिचे रूप-स्वरूप मात्र अनपेक्षित शाबीत होते. धक्का बसतो तो त्याचाच. सध्या चालू असलेल्या २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या १ एप्रिल २०२० ते ३० जून २०२० या तिमाहीदरम्यान आपल्या देशाचे ठोकळ वास्तव उत्पन्न, २०१९-२० या गेल्या वित्तीय वर्षातील १ एप्रिल २०१९ ते ३० जून २०२९ या तिमाहीच्या तुलनेत तब्बल २४ टक्क्यांनी घटल्याचे वास्तव 'सेन्ट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन' या संस्थेने ३१ ऑगस्ट २०२० या दिवशी प्रकाशित केले तेव्हा धक्का बसला तो नेमका त्या पडझडीच्या आकारमानाचे रंगरूप अपेक्षेपेक्षा खूपच अधिक दिसल्याने. देशाच्या ठोकळ उत्पादनाला वास्तवात हानी पोहोचणार याची अटकळ सगळ्यांनाच होती. त्यांमुळे घडून






आलेली घट अटळ अजिबातच म्हणता येत नाही. कोविड १९ या अपूर्व विषाणूचा सगळ्या जगावर पडलेला घाला जरी 'अचानक' या कोटीतील असला तरी, २०२० सालातील मार्च महिन्यापासून अर्थकारणाची चाके 'लॉकडाऊन' झालेली असल्याने उत्पादनाला फटका बसणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट सगळ्यांनाच दिसत होते. त्यांमुळे, देशी वास्तव उत्पादनामध्ये २४ टक्क्यांची झालेली घसरण 'अचानक' म्हणता येत नाही. मात्र, सगळ्यांनाच जोरदार चिमटा बसला तो ही घट चांगली २४ टक्क्यांच्या घरात आहे, हे कळल्यानंतर. ही बाब मात्र खचितच अनपेक्षित होती व आहे.

ही अवस्था, पावसाळ्यात पाण्याने भरलेल्या एखाद्या खड्ड्यातून गाडी गेल्यानंतर जो जबर दणका बसतो तशी म्हणायला हवी. खड्ड्यात पाणी भरलेले असल्यामुळे त्या खड्ड्याची खरी लांबी-रुंदी-खोली यांचा काहीच अदमास येत नसतो. आपण त्यांमुळे भ्रमात राहतो आणि गाडी दामटतो. अपेक्षेपेक्षा खड्डा खोल आणि मोठा निघाला की मणके खिळखिळे होतात. देशाच्या ठोकळ उत्पादनातील ही २४ टक्क्यांची वास्तव घट बघितल्यानंतर आपल्याला हादरा बसला कारण केंद्रात सत्तेवर असलेल्या सरकारच्या धुरीणांनी 'सब कुछ आलबेल हैं' असल्याच्या भावनेचे पाणी भरून ठेवत भारतीय अर्थव्यवस्थेला कोविड १९ या विषाणूच्या संसर्गापायी पडलेल्या खिंडाराचे आकारमान कळूच नये याची भक्कम मोर्चेबांधणी केलेली होती. कोरोनाच्या आक्रमणापायी आजारलेली भारतीय अर्थव्यवस्था



सावरण्यासाठी २०२० सालातील जुलै महिन्यात केंद्र सरकारने २० लाख कोटी रुपयांचे 'पॅकेज' जारी करून, अमेरिका व जपान या देशांच्या खालोखाल इतके भरभक्कम इंजेक्शन अर्थव्यवस्थेला टोचल्याबद्दल स्वतःची पाठ थोपटून घेतलेली होती. साहजिकच, भारतीय अर्थव्यवस्थेची रोगप्रतिकारक शक्ती त्या इंजेक्शनमुळे चांगली कणखर बनलेली असल्याची आश्वस्त करणारी भावना सर्वसामान्यांमध्ये नांदत होती. त्या भावनेचा उथळपणा देशी वास्तव उत्पादनातील २४ टक्क्यांच्या घसरणीने उघडा पाडला.

मुदलात आर्थिक आणि वित्तीय साक्षरतेची इयत्ता कमालीची अल्प असलेल्या आपल्यासारख्या देशातील सर्वसामान्यांना डोळे दिपविणारे आकडे ठासून भरलेली 'पॅकेजेस' जाहीर करून हातोहात फसविणे फार सोपे असते. सध्याचे सत्ताधीश करताना दिसतात ते नेमके हेच. 'गुंतवणूक' आणि 'रोखता' या दोन मुळात एकमेकींपेक्षा गुणात्मकरीत्या भिन्न बाबी होत, याचे ज्ञान नसल्याने २० लाख कोटींच्या 'पॅकेज'ची सरकारने केलेली धूळफेक तेव्हा धकून गेली. २० लाख कोटी रुपयांच्या त्या 'पॅकेज'मध्ये ख-या अर्थाने सर्वसामान्यांच्या क्रयशक्तीमध्ये भर पडण्यास हातभार लावणारा अंश होता जेमतेम दीड ते दोन लाख कोटी रुपयांचा. हे सत्य त्या वेळी अनेक अर्थतज्ज्ञ सतत सांगत राहिले. परंतु, 'हॉर्वर्ड' आणि 'हार्डवर्क' अशा आचरट कोट्या करीत तटस्थ अभ्यासक-संशोधकांची टिंगल करण्यातच धन्यता मानणा-या केंद्रातील सर्वोच्च धुरीणांनी मिथ्या कल्पनांचे फुगे उडविणे चालूच ठेवले. तज्ज्ञ सल्लागारांच्या निरपेक्ष आणि शास्त्रपूत सल्ल्याची मुळातच प्रचंड ॲलर्जी' असलेल्यांच्या हातात सत्तेचे सर्वोच्च दोर असल्यामळे या पेक्षा वेगळे काही अपेक्षिणे खुळेपणा ठरतो. अमेरिका, ब्रिटन, स्पेन, जर्मनी यांच्यासह जपान, इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर यांसारख्या आशियाई देशांच्या अर्थव्यवस्थांनाही कोविड १९च्या प्रादुर्भावाचा फटका बसला. आज पुढ्यात आलेली आकडेवारी त्या वास्तवाची साक्ष पुरविते. देशी ठोकळ उत्पादनात आपल्या देशाच्याबाबतीत घडून आलेली २४ टक्क्यांची तूट तशी फारशी जगावेगळी नाही. ब्रिटन आणि स्पेन या दोन देशांचा क्रमांक या यादीमध्ये आपल्या देशाच्या नंतर अनुक्रमे दुस-या व तिस-या क्रमांकावर लागतो. त्यांमुळे, प्रश्न देशी वास्तव उत्पादनातील घसरणीच्या निव्वळ आकडेवारीचाच केवळ नाही. इथे प्रश्न आहे तुलनेचा. प्रश्न आहे तो अन्य देशांकडून आपण या संदर्भात काही शिकणार अथवा नाही, हा. कारण, भारत, ब्रिटन आणि स्पेन हे तीन देश वगळता अन्य देशांच्या ठोकळ वास्तव उत्पादनातील तिमाही घट साधारणपणे १५ ते १६ टक्क्यांच्या परिघातील आहे. या सार्वत्रिक पडझडीला एकमात्र काय तो अपवाद दिसतो आणि तो म्हणजे चीनचा. देशी ठोकळ उत्पादनामध्ये चालू वित्तीय वर्षातील पहिल्या तिमाहीदरम्यान घाऊक प्रमाणावर घसरण नोंदविली जात असताना चीनने मात्र ३.२ टक्क्यांची नाममात्र का होईना वाढ नोंदविलेली आहे. परंतु, चिनी सत्ताधीश प्रसृत करत असलेल्या कोणत्याही आकडेवारीवर विश्वास ठेवावा, अशी परिस्थिती अजिबात नाही. या बाबतीत चीनची विश्वासार्हता पूर्णपणे रसातळाला गेलेली आहे. किंबहुना, जागतिक समुदाय कोविड १९च्या उद्रेकापायी उद्भवलेल्या आणीबाणीचा मुकाबला करण्याने जेरीला आला असताना भारताबरोबर सीमावादाचे भांडण उकरून काढत ज्या लष्करी कागाळ्या चीनने सुरूकेल्या आहेत त्या बघता चिनी अर्थकारणातील भीषण वास्तवापासून चिनी जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठीच चीनचे हे चाळे चालू असावेत, असे मानण्यास भरपूर जागा आहे.

हे सगळे एक वेळ राहू देत. आज आपल्या पुढ्यात मुख्य मुद्दा आहे तो ठोकळ देशी उत्पादनातील या घसघशीत घटीवरून आपण काय बोध घ्यायचा, हा. ही वेळ 'मन की बाता' मारण्याची नव्हे तर, मनापासून प्रामाणिक उपाययोजना कार्यक्षमपणे अंमलात आणण्याची आहे. कारण, देशी ठोकळ

उत्पादितामध्ये घडून आलेली २४ टक्क्यांची ही तिमाही घट जितकी कोविडनिर्मित आहे तितकीच ती आततायी धोरणांपायी उद्भवलेली देखील आहे. अर्थात, केंद्रातील सत्ताधारी ही बाब कधीच मान्य करणार नाहीत, हा मुद्दा वेगळा. परंतु, कोंबडे झाकून ठेवले तरी त्यांमुळे उजडावयाचे काही थांबत नाही. भारतीय अर्थकारणाला गेल्या तीन ते सव्वा तीन वर्षांत बसलेला हा तिसरा धक्का आहे. ८ नोव्हेंबर २०१६ या दिवशी अवचितच जाहीर झालेला नोटाबदलीचा 'फार्स', १ जुलै २०१७ पासून अत्यंत घाईघाईने आणि म्हणूनच पुरेशा पूर्वतयारीविनाच जारी केलेला वस्तु आणि सेवा कराचा अंमल आणि आता चालू कॅलेंडर वर्षातील फेब्रुवारी-मार्च महिन्यापासून घोंघावणारी कोविड १९ची ही वावटळ, हे तीन मोठे धक्के भारतीय अर्थव्यवस्थेने आजवर पचविले आहेत. केवळ भारतासारखी बहुविध वैशिष्ट्ये असणारी, उदंड स्तरीकरण असलेली, प्रचंड आणि तरूण लोकसंख्या लाभलेली अर्थव्यवस्थाच अशी तीन-तीन मूलगामी स्थित्यंतरे पचवू शकेल अथवा शकते. परंतु, म्हणून तिचा किती अंत बघायचा याला काही मर्यादा आहे की नाही, हा साधा विचारही आज  दिसत नाही. कोविड १९चा हंगामा सुरू होण्यापर्वापासनच खरे म्हणजे, भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगेकुचीचा वार्षिक सरासरी दर उतरणीला लागलेला होता. त्या घसरणीला कोरोनाच्या फैलावाचा अकस्मात जबर धक्का बसला आणि अर्थकारण घरंगळले.

त्यांमुळे, देशी वास्तव उत्पादनाच्या आकारमानात चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत जी लक्षणीय घसरण दिसून आली तिची कार्यकारणपरंपरा बरीच मागे जाऊन समजावून घ्यायला हवी. या उद्रेकातून बाहेर पडण्यासाठी येत्या काळात कराव्या लागणा-या उपाययोजनांच्या काही दिशा त्यांतूनच आपल्या पुढ्यात साकारतील.

अत्यंत मोठे, गुंतागुंतीचे, विस्तृत जाळे विस्तारलेले असंघटित उद्योगव्यवसायांचे क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एकमेव आगळे वैशिष्ट्य होय. काही अर्थतज्ज्ञांच्या अभ्यासानुसार देशातील एकंदर रोजगारापैकी जवळपास ८५ ते ९० टक्के रोजगार आणि देशी ठोकळ उत्पादनापैकी जवळपास ४५ टक्के उत्पादन या असंघटित क्षेत्रामधून आकार घेते. चालू कॅलेंडर वर्षातील मार्च महिन्यापासून जारी झालेल्या 'लॉकडाऊन'चा जीवघेणा फटका बसला तो नेमका या असंघटित क्षेत्रालाच. देशी ठोकळ उत्पादन चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये तब्बल २४ टक्क्यांनी का घटले असावे, याचा उलगडा आता सहजपणे व्हावा. नोटाबदलीच्या नौटंकीने तीनएक वर्षांपूर्वी कंबरडे मोडले होते ते नेमक्या याच असंघटित क्षेत्राचे. तीन वर्षांनी त्याच क्षेत्रावर पुन्हा घाला पडला तो कोविड १९चा. २०१६ सालापूर्वीचे तीन मॉन्सून अनियमित शाबीत झाले होते. २०१६ सालातील पावसाळा चांगला झाल्याने खरीपाची पिके हाती येण्याच्या आशेने बहरलेल्या बळीराजाची पुरती नाकेबंदी झाली ती रोकड रकमेची भीषण चणचण अवतरल्याने. कोविड १९च्या आकांतापायी 'लॉकडाऊन'चा फास आवळला गेला आणि त्या हाराकिरीपायी पुन्हा भरडले गेले ते शेतीक्षेत्रच. रानाशिवारात पिकलेला माल बाजारात पोचवावा म्हटले तरी वाहतूक-दळणवळण ठप्प असल्याने हातपाय बांधले गेले होते. तोच अनवस्था प्रसंग ओढवला तो शहरोशहरी विस्तारलेल्या असंघटित उद्योगांवर आणि त्यांत रोजीरोटी कमावणा-या अंगमेहनती कष्टक-यांवर. या असंघटित क्षेत्राची गुंतागुंत, विस्तार, त्यांतील स्तरीकरण, संघटित उद्योगव्यवसायांशी जडलेल्या या क्षेत्राच्या बहुविध नात्याचे पदर-उपपदर यापैकी कशाचा म्हणजे कशाचाच नेमका अंदाज राजधानीमधील बाबूंना नसल्यामुळे नोटाबदली आणि



'लॉकडाऊन' यांसारख्या भीषण उपायांचे असंघटित क्षेत्रावर होणारे संभाव्य दुष्परिणाम नेमके कसे व किती असतील याचा अंदाजच धोरणकर्त्यांना तेव्हा आला नाही. आजही तो आला असेल असे म्हणवत नाही. देशी ठोकळ उत्पादनातील २४ टक्क्यांच्या तिमाही घसरणीमध्ये ठळक प्रतिबिंब पडलेले आहे ते धोरणकर्त्यांच्या पातळीवर असंघटित क्षेत्राच्या रंगरूपाबाबत नांदणा-या घनघोर अज्ञानाचे.

नेमक्या याच कारणापायी, देशी ठोकळ उत्पादितामध्ये दिसलेली २४ टक्क्यांची घट ही तरी नेमकी आणि विश्वसनीय आहे किंवा नाही, यांबाबत अनेक जाणत्या अर्थतज्ज्ञांना आजघडीला बळकट शंका आहे. कारण, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची नेमकी संख्या, त्यांचे आकारमान, गुंतवणूक, रोजगार, उलाढाल यांची अचूक, अद्ययावत आणि तपशीलवार आकडेवारी नियमितपणे गोळा करणारी यंत्रणाच आपल्या देशात व्यवस्थात्मक पातळीवर कार्यरत बनलेली नाही. साधारणपणे पाच-सहा वर्षांच्या अंतराने केली जाणारी आर्थिक जनगणना (इकॉनॉमिक सेन्सस्) हाच

काय तो एकमात्र माहितीस्त्रोत असंघटित उद्योगव्यवसायांच्या अंतरंगात डोकवून पाहण्यासाठी अभ्यासकांना उपलब्ध होतो. त्यांतच, २०२० सालातील मार्च महिन्यापासून जारी झालेल्या 'लॉकडाऊन पायी उद्योगव्यवसायांबाबतची ताजी माहिती क्षेत्रीय पाहण्यांद्वारे संकलित करण्याबाबतही व्यावहारिक मर्यादा पडलेल्या होत्या. साहजिकच, चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीदरम्यानच्या देशी ठोकळ उत्पादिताबाबत 'सेन्ट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन'ने मांडलेले मोजमाप हे अपुऱ्या आकडेवारीच्या आधारे भरपूर काही गृहीतके मनाशी धरत सिद्ध केलेले आहे. अर्थकारणातील व्यवहारांबाबत येत्या काळात अधिक व भरवशाची आकडेवारी उपलब्ध होईल तेव्हा व तसे देशी ठोकळ उत्पादनाचे मोजमाप अधिक नेमके बनेल. परिणामी, चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीदरम्यान देशी ठोकळ उत्पादनामध्ये घडून आलेली घट आजमितीस २४ टक्क्यांच्या परिघात दिसत असली तरी तिचा व्याप प्रत्यक्षात त्याहीपेक्षा अधिक असेल तर त्याचे आश्चर्य वाटावयास नको, असा इशारा जाणते व डोळस अर्थशास्त्रज्ञ आज देत आहेत.

देशी अर्थव्यवस्थेचा जणू कणाच असणाऱ्या या असंघटित क्षेत्राकडे बघण्याच्या आपल्या धोरणदृष्टीमध्ये आपण गुणात्मक बदल घडवून आणणार किंवा नाही, हा एक मोठा चर्चाप्रांत कोविड १९ च्या प्रादुर्भावापायी उद्भवलेल्या परिस्थितीने आपल्या पुढ्यात खुला केला आहे. आपल्या देशातील नगरा-महानगरांमध्ये अस्ताव्यस्तपणे विस्तारलेल्या उद्योगव्यवसायांच्या या असंघटित क्षेत्रात रोजीरोटी कमाविणाऱ्यांची अवस्था मायमराठीमधील 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना', अशी आहे व असते. प्रत्येक नवीन पिढीनिशी तुकड्या-तुकड्यांत विभागली जाणारी आणि म्हणूनच आतबट्ट्याची ठरणारी शेती उपजीविकेचा आकर्षक पर्याय उरत नाही आणि शहरांमधील संघटित उद्योगक्षेत्रात शिरकाव करून देणारे ज्ञान, कौशल्य आणि अनुभव पदरी नाही अशा कोंडीमध्ये सापडलेल्या होतकरू हातांनी निरुपायाने शोधलेला जगण्याचा पर्याय म्हणजे असंघटित उद्योगव्यवसायांचे शहरी क्षेत्र, अशीच या उद्योगव्यवसायाकडे बघण्याची दृष्टी आजवर राहिलेली आहे. मोठ्या शहरांमधील रस्तोरस्ती अनंत प्रकारच्या जिनसांची विक्री करणारे विक्रेते, फेरीवाले, हातगाडीवाले, वाहतूक व्यावसायिक (आता यांच्यातच भर पडलेली आहे ती 'ओला' व 'उबर' यांसारख्या नवीन व्यावसायिक प्रारूपांची), बांधकाम क्षेत्रातील मजूर, रोजंदारीवर बाजारपेठांमध्ये ओझी उचलणारे कष्टकरी, हॉटेले, खानावळी, वसतिगृहे, लॉजेस्, शिक्षणसंस्था, खासगी कार्यालये, कुरियर सेवा, चित्रपटगृहे...अशांसारख्या अनेकानेक आस्थापनांमध्ये हंगामी तत्त्वांवर काम करणारे कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगार यांनी शहरी असंघटित उद्योगव्यवसायांचे क्षेत्र गजबजलेले आहे. 'लॉकडाऊन'पायी शहरी अर्थकारणाच्या नाड्या आवळल्या गेल्यानंतर सर्वांत भीषण परवड झाली ती नेमकी हातावर पोट असणाऱ्या याच असंघटित क्षेत्रातील मनुष्यबळाची. शहरी असंघटित क्षेत्रातील रोजगार, व्यवसाय, व्यावसायिक, उलाढाल आणि क्रयशक्ती यांची जी जबर हानी कोविड १९च्या शहरी उद्रेकापायी घडून आली तिचा खूप मोठा वाटा देशी ठोकळ उत्पादितामधील २४ टक्क्यांच्या घसरणीमध्ये आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव पहिल्या टप्प्यांत मुख्यतः दाट



लोकवस्तीच्या मोठ्या शहरांमध्येच फोफावल्याने असंघटित क्षेत्रातील मनुष्यबळाने निरुपायापायी घरची वाट धरली. त्यांतून दोन समस्या उद्भवल्या. त्यांतील एक तात्कालिक स्वरूपाची आहे तर दुसरी मात्र दीर्घकालीक. शहरांमधून आपापल्या खेड्यांकडे पावले वळविलेल्या कष्टकऱ्यांच्या माध्यमातून शहरोशहरी पाय पसरलेला कोविड १९ पार गावांपर्यंत पोहोचला हे झाले त्या दोन समस्यांमधील तात्कालिक समस्येचे गाभा अंग. हे यथावकाश आटोक्यात येईलही. पण, कोविड १९च्या फैलावादरम्यान शहरांमध्ये भोगलेल्या हलाखीचा चटका बसलेले मजूर आता त्यांच्या गावी काय करणार, या प्रश्नाचे उत्तर आपल्याला द्यावे लागणार आहे. देशी ठोकळ उत्पादनाच्या वाटचालीची या पुढील काळातील दिशा नेमक कशी असेल व कोरोनाच्या दणक्यापायी खचलेली भारतीय अर्थव्यवस्था येत्या काळात कशी, किती व कधी सावरेल या प्रश्नांची उत्तरे या मुद्याशीच खिळलेली आहेत आणि असणार आहेत. या वास्तवालाही पुन्हा दोन परिमाणे

आहेत. एक म्हणजे, कोरोनाच्या पर्वात गावोगावी परतलेले कष्टकरी शहरांकडे पूर्वीच्या प्रमाणात आणि पूर्वीच्या आवेगाने परतले नाहीत तर, शहरी असंघटित क्षेत्रातील उद्योगव्यवसायांना कामकरी हातांचा तुटवडा जाणवेल आणि त्यांचे पुनरु त्थान अधिकच जटिल बनेल. हे झाले या समस्येचे शहरी परिमाण. दुसरे म्हणजे, खेडोपाडी परतलेल्या या कष्टक-यांना त्यांच्या स्थानिक परिसरातच चांगल्या दर्जाचा व उत्पादक स्वरूपाचा रोजगार आपण कसा, किती आणि नेमका केव्हा उपलब्ध करून देणार, हे झाले याच समस्येचे ग्रामीण परिमाण.

कोरोनाच्या चटक्याने पोळलेल्या भारतीय अर्थकारणाचे पुनरुज्जीवन या प्रश्नाला आपण कसे व केव्हा सामोरे जातो




यांवर अवलंबून राहील. आज सगळ्यांत मोठा यक्षप्रश्न आहे तो कोरोनापायी हरपलेल्या क्रयशक्तीचा. चालू वित्तीय वर्षातील पहिल्या तिमाहीमध्ये देशी ठोकळ उत्पादितामध्ये २४ टक्क्यांची जी घट दिसते तिला सर्वाधिक कारणभूत आहे तो म्हणजे कमालीचा घटलेला उपभोग. रोजीरोटी गमावल्यामुळे हतबल झालेल्यांनी खरेदीकडे हात आखडता घ्यावा, यात अस्वाभाविक असे काहीच नाही. परिणामी, भारतीय अर्थव्यवस्थेमधील मागणी आजमितीला कमालीची थंडावलेली आहे. 'पॅकेजेस'च्या मलमपट्ट्या चिकटवल्याने मलूल झालेल्या या मागणीला सक्षम उभारी लाभणार नाही. त्यासाठी चाके गतिमान बनवावी लागतील ती रोजगारनिर्मितीची. यांबाबत मात्र आज कोणीही बोलत तर काहीच नाही, परंतु, या पैलूची किमान जाणही धोरणांच्या पातळीवर जाणवत नाही. सार्वत्रिक किमान उत्पन्नाच्या हमीचा पर्याय या समस्येवर जालीम उपाय ठरेल, असा आवाज उमटताना ऐकू येतो. परंतु, त्यासाठी पैसा कोठून आणायचा याचे उत्तर कोणापाशीच नाही.

चालू वित्तीय वर्षासाठी केंद्र सरकारने वित्तीय तुटीचा जो अंदाज नजरेसमोर ठेवलेला होता तो केव्हाच पार झालेला आहे. वित्तीय तूट भरून काढण्यासाठी कर्जे उभारण्याची जी मर्यादा केंद्र सरकारने चालू वित्तीय वर्षासाठी निश्चित केलेली होती तिच्यापेक्षा अधिक कर्जाऊनिधी सरकारने चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या सहामाहीतच उचललेला आहे. रोजगार नाही त्यांमुळे क्रयशक्ती नाही. खिशात पैसा नाही त्यांमुळे खरेदीबाबत सपशेल निरुत्साह दिसतो. खरेदीच नसल्यामुळे मालाला उठाव नाही. मालच खपत नसल्याने नवीन उत्पादनाची गरजच वाटत नाही. उत्पादन ठप्प असल्याने गुंतवणूक, रोजगार गपगार आहेत. रोजगारवाढ खुंटल्याने क्रयशक्ती गोठलेली आहे...हे दुष्टचक्र भेदायचे कसे, हा आजचा मुख्य पेच आहे. बँकांना वेठीला धरून त्यांच्या माध्यमातून सवलतीच्या व्याजदराने कर्जे उपलब्ध करून देत भांडवल बाजारात केवळ मुबलक रोखता खेळती ठेवल्याने गुंतवणुकीचे चक्र भिरभिरायला लागेल, असे समजणे हे निखळ असंमजसपणाचे आहे. हाच खुळेपणा २० लाख कोटी रुपयांच्या पॅकेजमध्ये ठासून भरलेला दिसतो. पण बोलणार कोण...? आणि बोलले तरी ऐकणार कोण...?

कोविड १९च्या शहरी उत्पातापायी घडून आलेल्या या परतीच्या स्थलांतराचा लाभ उठवत, एकीकडे खुरटलेली शेती आणि दुसरीकडे बेबंदपणे फोफावणारे नागरीकरण या आजच्या दुस्तर वास्तवावर परिणामकारक उपाययोजना जारी करण्याची खरे म्हणजे एक चांगली संधी आपल्याला लाभलेली आहे. हे काम सोपे नाही. कारण त्यालाही दोन परिमाणे आहेत. एक आहे तात्कालीक तर दुसरे दीर्घकालीक. खुरटलेली शेती आणि अस्ताव्यस्त नागरीकरण हे मुदलात एकाच वास्तवाचे दोन पैलू होत. ते वास्तव म्हणजे असंतुलित प्रादेशिक आर्थिक विकासाचे. मोठ्या आकाराची शहरे बेशिस्तपणे वाढणे ही याच असंतुलित प्रादेशिक विकासाची परिणती होय. वस्तु आणि सेवा कराची प्रणाली व्यवहारात लागू झाल्याने या प्रादेशिक असंतुलनाला खतपाणीच लाभणार आहे. विकेंद्रीत आर्थिक-औद्योगिक विकास हेच या दुर्धर समस्येवरील दूरगामी व मूलभूत उत्तर ठरते. मोठ्या शहरांच्या परिसरातच एकवटणा-या औद्योगिक विकासाची झिरपण तुलनेने अविकसित पट्ट्यांतील गावां-तालुक्यांपर्यंत होण्यास चालना मिळाल्याखेरीज ग्रामीण, अर्धविकसित भागांत बिगर शेतीक्षेत्रांत चांगल्या गुणवत्तेच्या रोजगारसंधी पुरेशा प्रमाणावर निर्माण होणे अवघड आहे. उद्योगांच्या विकेंद्रीकरणाला हातभार लागण्यासाठी निकड आहे ती दर्जेदार पायाभूत सेवासुविधा देशाच्या कानाकोप-यांत निर्माण करण्याची. रस्ते,

प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, वीजनिर्मिती, पाणीपुरवठा यांसारखे विषय हे राज्यसूचीमध्ये आहेत. त्या विषयांसंदर्भात धोरणे आखून त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात पुढाकार घेण्याचे उत्तरदायित्व आहे राज्य सरकारांचे. परंतु, आजमितीला राज्य सरकारे आहेत वित्तीय अडचणीत. मुळात, ज्या प्रकारची आर्थिक संघराजात्मक व्यवस्था आपल्या देशात आहे तिच्यामध्ये तुलनेने अधिक आर्थिक व वित्तीय लवचीकता एकवटलेली आहे ती केंद्र सरकारकडे. 'लॉकडाऊन'दरम्यान अर्थकारणाची चाके ठप्प होऊन महसुलाचे स्रोत आटल्याने तुलनेने अधिक संकटात आली ती राज्य सरकारे. त्यांतच, वस्तु आणि सेवा कराची व्यवस्था लागू केल्यानंतर राज्य सरकारांच्या तिजोरीत उद्भवलेल्या महसूल तुटीची भरपाई करण्यापोटी केंद्राकडून राज्यांना देय

हा झाला दुसरा पर्याय. या दोहोंतील पहिल्या पर्यायासंदर्भात काही युरोपीय देशांचे पूर्वानुभव आपल्याला उपयुक्त ठरण्यासारखे आहेत. ते अजमावून बघण्यासाठी शासनसंस्था, शिक्षणसंस्था आणि उद्योजकांच्या संस्थासंघटना यांच्या संयुक्त प्रयत्नांची मोट बांधणे अगत्याचे ठरते. युरोपातील काही देशांनी १९८०च्या दशकामध्ये असे प्रयोग यशस्वीपणे राबविले. त्यांपैकी काही धडे डोळसपणे गिरवणे उपयुक्त ठरू शकेल. जर्मनी, स्पेन, इटली, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड यांसारख्या युरोपीय देशांमधील उद्योगक्षेत्रांची फेररचना १९८०च्या दशकामध्ये चालू झाल्यानंतर उद्योगक्षेत्रातील अनेक कामगारांच्या रोजंदारीवर कु-हाड कोसळली. उद्योगांमधील बदललेले, अधिक प्रगत तंत्रज्ञान हे त्यांमागील एक मुख्य कारण होते. त्या सगळ्या पर्वादरम्यान, मग,






असलेल्या रकमाही केंद्राची तूट फुगल्याने थकलेल्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये, उद्योगव्यवसायांचे विकेंद्रीकरण राज्यांच्या तुलनेने अविकसित भागांमध्ये घडून येण्यासाठी आवश्यक असणा-या पायाभूत सेवासुविधा सर्वदूर निर्माण करण्याइतपत वित्तीय साधने राज्य सरकारांपाशी असतील अशी अपेक्षाही सध्या तरी बाळगता येत नाही. मग, कोविड १९ पायी शहरे सोडून गावांकडे परतलेल्यांना स्थानिक परिसरात रोजगार उपलब्ध कसा व कोठून करून द्यावयाचा, या प्रश्नाला ताबडतोबीने उत्तर कसे शोधायचे याच्या वाटा धुंडाळणे भाग पडते.

याला सध्या तरी पर्याय दिसतात ते दोनच. शहरांमधून गावांकडे फिरलेल्या श्रमशक्तीची रोजगारक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने रोजगाराभिमुख व रोजगारपूरक ठरणारी व्यावसायिक, तंत्रशिक्षणप्रधान अशी प्रशिक्षणव्यवस्था उत्क्रांत करणे, हा झाला त्यांतील पहिला मार्ग. तर, शेतीसह एकंदरच ग्रामीण अर्थकारणाचे पुनरुत्थान जोमाने घडवून आणण्यासाठी कार्यक्रम प्रवर्तित करणे,

या देशांमधील शासनसंस्था, तांत्रिक तसेच व्यावसायिक प्रशिक्षण देणा-या शिक्षणसंस्था आणि उद्योगांच्या संघटना यांनी एकत्र येऊन रोजगार गमावलेल्या कामगारांच्या पुर्नप्रशिक्षणाचे कार्यक्रम मोठ्या कल्पकतेने राबविले. प्रगत उत्पादनतंत्राशी जुळवून घेता न आल्यामुळे ज्यांच्यावर बेरोजगारी ओढवलेली होती अशा कामगारांची रोजगारक्षमता उचित अशा तांत्रिक, व्यावसायिक तसेच कौशल्यप्रधान प्रशिक्षणाद्वारे उंचावण्यावर त्या सगळ्या प्रयत्नांचा मुख्य भर होता. कोरोनापायी शहरांतील रोजगार सोडून गावांकडे परत फिरलेल्या होतकरूहातांना कौशल्यांचा साज चढवून स्थानिक परिसरातील उद्योगांना प्रशिक्षित असे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे समयबद्ध कार्यक्रम आपणही राबविले तर त्यांतून दोन बाबी साध्य होतील. एक म्हणजे, तरूण श्रमशक्तीला ग्रामीण परिसरातच चांगल्या स्वरूपाचे उत्पादक रोजगार उपलब्ध होऊ शकतील आणि त्याच वेळी औद्योगिकदृष्ट्या अ-विकसित भागांमध्ये आपला कारभार उभारण्यास अनुकूल असणा-या

उद्योगघटकांना चांगले प्रशिक्षित मनुष्यबळ स्थानिक परिसरातूनच मिळू शकेल. यांतून दोन गोष्टी दीर्घकाळात साध्य होतील. एक म्हणजे, ग्रामीण भागांतच बिगर शेती रोजगारसंधींचे क्षेत्र विस्तारून शेतीवर असलेला अतिरिक्त मनुष्यबळाचा बोजा हलका होण्यास मदत होईल. त्यांतून शेतीक्षेत्राच्या सरासरी उत्पादकतावाढीस चालना मिळू शकेल. आणि दुसरे म्हणजे, स्थानिक परिसरात चांगला रोजगार उपलब्ध नाही म्हणून निरुपायाने शहरांकडे वळणा-या होतकरूंना आपल्या परिसरातच कामधंदा मिळाल्याने शहरांकडे होणारे अफाट स्थलांतरही रोखले जाईल. १९९०साली महाराष्ट्रामध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फलोद्यानाला प्रेरणा देणारा जो अचूक आणि दूरदर्शी कार्यक्रम माननीय शरद पवार यांनी राबविला होता त्यांमागील दीर्घकालीन विकासदृष्टी



नेमकी हीच होती. फळांचे वाढीव उत्पादन साध्य झाले की त्यांतून फळांवर प्रक्रिया घडवून आणणा-या उद्योगांचे जाळे राज्याच्या ग्रामीण भागांत निर्माण होऊन शेतक-याला चार पैसे अधिक मिळण्याबरोबरच नोकरीसाठी मुंबई-पुण्याकडे धाव घेण्याची हतबलता स्थानिक तरूणांवर येणार नाही, अशी दुहेरी धोरणदृष्टी त्यांमागे होती.

'लॉकडाऊन'मुळे ठप्प बनलेले अर्थकारण आणि त्यांपायी रोजगार गमावल्याने हरपलेली क्रयशक्ती यांच्या विळख्यातून सुटण्यासाठी रोजगारवाढीला चालना देणे हाच तातडीचा आणि हमीचा पर्याय ठरतो. त्यासाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम गावपातळीपासून सर्वत्र राबवित असतानाच, प्रशिक्षित होतकरूंना उद्योगधंद्यांत नोक-याही मिळाव्यात या दृष्टीने 'अप्रेन्टिसशिप'सारख्या उपक्रमांना भरघोस प्रेरणा देण्याबाबत सरकारने तातडीने विचार करायला हवा. त्यांतून प्रशिक्षित तरूणांना रोजगाराचे दरवाजे खुले होतील. त्यासाठी शिष्यवृत्या,

शिकाऊ उमेदवारांना कामावर घेणा-या उद्योगांना करविषयक तसेच गुंतवणूकविषयक सवलती अशांसारख्या बाबींवर प्रथम लक्ष केंद्रीत करावे लागेल. केवळ रोखता मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्याने क्रयशक्ती वाढणार नाही. उलट त्यामुळे बँकांच्या थकित कर्जाची आजच गंभीर बनलेली समस्या अधिकच जटिल बनण्याची शक्यता वाढेल. केवळ सवलतीच्या व्याजदराने कर्जे मिळत आहेत म्हणून उद्योगधंदे कर्जे दणकून उचलतील हा सरकारचा भ्रम आहे. त्याच वेळी, रोजगार निर्माण करणे सरकारला व कॉर्पोरेट विश्वाला अवघड आहे म्हणून किमान सार्वत्रिक उत्पन्नाची हमी देणा-या सवंग उपक्रमांमुळे महागाईला खतपाणीच मिळेल. परिणामी, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पुढ्यातील कटकटींमध्ये भर पडेल. कारण, महागाई रोखण्यासाठी



कठोर पैसाधोरण अवलंबले तर गुंतवणूक मार खाते आणि कर्जवाटपाद्वारे उद्योगांची चाके गरगरू लागावीत व प्रत्येकाला काही किमान रक्कम अदा केल्याने क्रयशक्ती वाढण्यास मदत होईल म्हणून कर्जे व अनुदानांची खैरात करावी तर महागाई डोके वर काढते असा धोरणात्मक पेच रिझर्व्ह बँकेपुढे उभा ठाकेल.

एकंदरीनेच आजची आर्थिक परिस्थिती कमालीची अवघड आणि गुंतागुंतीची आहे. अशा परिस्थितीमध्ये, सर्व स्तरांवर खुला विचारविनिमय सुरू करणे, संवादाचे पूल बांधणे, तज्ज्ञ अभ्यासकांचा सल्ला (त्यांच्या राजकीय विचारसरणीकडे अथवा पक्ष बांधिलकीकडे न बघता) घेणे आणि मुख्य म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढ्यातील आजचे आव्हान हे खरोखरच बिकट आहे हे मान्य करून विवेकशीलतेने पावले उचलण्याखेरीज पर्याय नाही. 'सब कुछ आलबेल है' अशा प्रकारचा फसवा आशावाद गोंजारत बसण्याने काहीच साध्य होणार नाही. अशी घोर आत्मवंचना प्रचंड आत्मघातकी शाबीत होईल.



**समाजाच्या पार शेवटच्या थरांतील जनसमूहांमध्ये काम करणाया राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना कशा व कोणत्या प्रकारच्या रचनात्मक कार्यक्रम–उपक्रमांमध्ये नेहेमीसाठी गुंतवून ठेवता येईल, याबाबत विचार करण्याची वेळ आता येऊ न ठेपलेली आहे. सहकारी संस्थांचा विचार या संदर्भात डोळ्यांपुढे येतो. सहकारी संस्था या मुळात आणि स्वरू पत: लोकसंस्था होत. मात्र, शासनसंस्थेच्या निधीच्या माध्यमातून या लोकसंस्थांमध्ये सरकारचा सहभाग अतिशय मोठ्या प्रमाणावर घडून आलेला असल्यामुळे आज त्यांचा इमला पुरता खचलेला दिसतो. सहकारी संस्थांचे चलनवलन सरकारच्या इशाऱ्यानुसार घडून येणार नाही अथवा सरकारी अनुदानाच्या भाराखाली त्या दबून जाणार नाहीत, याची हमी घेतली जाणे, हा या सगळ्यांतील कळीचा मुद्दा ठरतो.**

**प्रा. नीळकंठ रथ**



# राजकीय पक्षांसाठी रचनात्मक कार्यक्रम

तळागाळामध्ये पक्षाचे काम करत राहणाऱ्या पक्षकार्यकर्त्यांना दोन निवडणुकांच्या दरम्यानच्या काळात कशा प्रकारे व कोणत्या कामांत गुंतवून ठेवावे, हा प्रश्न जवळपास सर्वच राजकीय पक्षांना भेडसावत असतो. भारतीय जनता पक्ष याला अपवाद ठरतो अथवा ठरावा. निवडणुका होऊन गेल्यानंतर पुन्हा दुसऱ्या निवडणुका जाहीर होण्यादरम्यान जो अवधी असतो त्या





काळात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काय करायचे ? ... हातावर हात टाकून नुसते बसून तर राहता येत नाही. आणि तसे करणे उचितही नाही. रिकाम्या वेळेत नुसत्याच काही तरी टिवल्याबावल्या करत बसण्यापेक्षा काहीबाही कामे करत राहणे हे त्यांतल्यात्यांत बरे असे आपण म्हणतो. निवडणुकांच्यादरम्यानच्या मोकळ्या वेळेत, मग, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते जनतेच्या (म्हणजेच, मतदारांच्या) शासनदरबारी अडकून पडलेल्या वैयक्तिक समस्यांच्या सोडवणुकीकडे वळतात. त्यासाठी स्थानिक आमदार अथवा खासदारांची मदत घेण्यात येते. आपल्या बोलीभाषेत या प्रकारच्या व्यवहाराला आपण मध्यस्थी (आणि, अंमल कठोर भाषेत बोलायचे तर दलाली) असे म्हणतो. ज्या मतदारसंघातून त्या त्या राजकीय पक्षाचा आमदार अगर खासदार निवडून आलेला नसतो, तिथे, साहजिकच अशी कामे करणे शक्य होत नाही अथवा नसते. परिणामी, प्रत्यक्ष निवडणुकांच्या वेळी पक्षकार्यकर्ते निष्प्रभ ठरतात. जनसामान्यांशी कार्यकर्त्यांचा संपर्कच उरला नसेल तर मतदारांचे मन ते कसे वळवणार ?

**याला अपवाद फक्त दोनच राजकीय पक्षांचा – डावे पक्ष आणि भारतीय जनता पक्ष.** या दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांना मात्र कामे असतात अथवा दिली जातात. कामगार संघटनांच्या माध्यमातून शहरी कामगारांचे संघटन घडवून आणण्याचे काम डावे पक्ष करत राहतात. तर, किसान सभांच्या माध्यमातून शेतकरी आणि शेतमजुरांचे संघटन डावे पक्ष ग्रामीण भागांत जारी राखतात. आदिवासी कुटुंबांना जमिनींचे हक्क प्रदान केले जावेत, यासाठीदेखील डावे पक्ष मागण्या करण्यात सक्रिय असतात. खंडकरी शेतकऱ्यांसंदर्भातील प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक करण्यात पश्चिम बंगालमधील सत्ताधाऱ्यांना एके काळी यश आले हे खरे. परंतु, या यशाचा फायदा घेत राहणे किती काळ जमणार ? यथावकाश ग्रामीण भागातील बेरोजगारीच्या समस्येने तिथे नव्यानेच डोके वर काढले. ही समस्या हाताळण्यात डाव्या पक्षांना अपयश आले आणि त्याची किंमत त्यांना निवडणुकांमध्ये मोजावी लागली. आता, हे आव्हान स्वीकारण्यात तृणमूल काँग्रेसलाही, समजा, अपयश आले तर निवडणुकांत त्यांनाही पराभवाची चव चाखावी लागेल. सांगता-नावाजता येईल असे कामगारसंघटनांचे कामही आता शहरांमध्ये दिसून येत नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या आपल्या संस्थापक आणि बौद्धिक गुरूच्या साहाय्याने हिंदुत्वाचा आपला पायाभूत कार्यक्रम व तत्त्वज्ञान यांचा प्रचार-प्रसार करण्याच्या कामी भारतीय जनता पक्ष मात्र तळागाळातील आपल्या कार्यकर्त्यांना गुंतवून ठेवतो. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांसारख्या परिवारातील अन्य संघटनाही या कामात सक्रिय असतात. गंगा-यमुना-सरस्वती यांसारख्या नद्यांना पवित्र मानणारे तसेच भारतमातेची पूजा करणारे तेवढेच काय ते हिंदू आणि अन्य सारे अ-हिंदू व म्हणूनच अ-भारतीय असा भाव या साऱ्यामध्ये अध्याहृत असतो. हिंदुत्वाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार-प्रसार करण्याबरोबरच, गोहत्याबंदी, बेवारशी गोधनाचा सांभाळ करण्यासाठी गोशाला चालविणे, सामूहिक उपासनांचे आयोजन, राम मंदिरापासून ते गोडसेंच्या मंदिरांपर्यंत मंदिरांची उभारणी, हिंदीतर प्रदेशांमध्ये (उदाहरण द्यायचे झाले तर, ईशान्य भारतातील राज्ये) हिंदीचा

पुरस्कार...अशांसारख्या, हिंदुत्वाच्या तत्त्वज्ञानाचे रोकडे आविष्करण घडविणाऱ्या कार्यक्रमांमध्येही त्या पक्षाचे कार्यकते क्रियाशील असतात. यांसारख्या उपक्रमांमध्ये हे कार्यकर्ते पूर्णवेळ गुंतलेले राहतात. यांसारख्या इतर सर्व प्रश्नांबाबत संघाची विचारपूत अशी भूमिका नसल्यामुळे कार्यकर्ते त्या संदर्भात अनभिज्ञ राहतात.









काँग्रेस आणि अन्य बहुतेक प्रादेशिक पक्षांकडे असे काही कार्यक्रमच मुदलात नाहीत. आणि तेच त्यांच्या अपयशाचे कारण शाबीत होते. काँग्रेसच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील रंगरूपाचे स्मरण या सगळ्या पार्श्वभूमीवर होते. उच्चभ्रू आणि सुशिक्षित मध्यमवर्गीयांची संघटना असेच काँग्रेसचे स्वरूप १९२० सालापर्यंत होते. काँग्रेसला बहुसंख्यात्मक बहुजनांच्या संघटनेचे रूप प्रदान केले ते गांधीजींनी. त्याबरोबर, काँग्रेस ही जनसामान्यांची चळवळ बनली. लोकांमध्ये मिळून-मिसळून त्यांना काँग्रेसच्या कार्यक्रमांबद्दल माहिती देण्यासाठी काँग्रेसचे कार्यकर्ते सर्वत्र हिंडू-फिरू लागले. ब्रिटिश सरकारच्या विरोधात असहकाराचे आंदोलन छेडले गेल्याबरोबर काँग्रेसमध्ये वरपासून पार खालपर्यंत सक्रिय असणारे यच्चयावत सगळे काँग्रेसजन त्या आंदोलनात सहभागी झाले. परंतु, असहकाराची चळवळ ही काही सलग चालणारी नव्हती. दरम्यानच्या काळात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना गांधीजींनी रचनात्मक कार्याची दीक्षा दिली.

सूतकताई आणि चरख्यावर विणकाम हे काही केवळ मँचेन्स्टरला दणका देण्यासाठी योजलेले उपाय नव्हते, तर, भारतीय समाज आणि अर्थव्यवस्था यांसाठी गांधीजींनी मोठे विचारपूर्वक अंगीकारलेले ते नवदिशादर्शक कृतिपंथ होते. सूतकताई आणि विणकामासारख्या रचनात्मक कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेत असतानाच, आपल्या समाजजीवनातील भल्याबुऱ्या गुणवैशिष्ट्यांची चर्चा काँग्रेसचे कार्यकर्ते ग्रामीण जनसमूहाबरोबर करू लागले. अस्पृश्यता आणि जातव्यवस्था यांची अनिष्टता व अवांछनीयता, त्या माध्यमातून, सर्वसामान्यांच्या नजरेस आणून दिली जाऊ लागली. जीवनातील पायाभूत अशा विशुद्ध मानवी मूल्यांची शिकवणच सार धर्म देत असतात, हे वास्तव, जनमानसाला समजावण्याचा प्रयत्न आपले लेखन आणि प्रार्थनासभांद्वारा गांधीजी करू पाहत होते. गांधीजीप्रणीत ते सारे रचनात्मक कार्यक्रम १९२० ते १९४२ या कालखंडात अगदी ऐन भरात होते. काँग्रेस संघटना त्या काळात कमालीची सक्रिय आणि जिवंत भासत असे, ही सारी त्याचीच निष्पत्ती. तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांची मुक्तता 'छोडो भारत' आंदोलनानंतर केली गेली आणि, ब्रिटिश शासनकर्ते आता भारतातील आपले बस्तान गुंडाळतील ही बाब स्वच्छपणे प्रकाशमान झाली. याचा परिणाम असा झाला की, फाळणीनंतर स्वतंत्र भारताच्या सत्तापरिघात शिरकाव करून घेण्यातच काँग्रेसचे कार्यकर्ते मश्गुल झाले. फाळणीदरम्यान





उसळलेला धार्मिक हिंसाचार आणि हत्याकांड यांचा भडका शमविण्यासाठी गांधीजी मात्र एकाकीपणे पदयात्रा करत होते. गांधीजीप्रणीत रचनात्मक कार्यक्रमांच्या शिडातील हवाच या साऱ्यादरम्यान पार निघून गेली. काँग्रेस पक्ष आणि पक्षाचे कार्यकर्ते याची ती बदललेली मानसिकता व कार्यपद्धती पाहून अस्वस्थ बनलेले काँग्रेसचे काही क्रियाशील सदस्य काँग्रेस सोडून गेले.

स्वातंत्र्याची प्राप्ती झालेली असल्यामुळे, एक राजकीय संघटना असे असलेले काँग्रेसचे रूप विसर्जित करून तिला सामाजिक संघटनेचा पेहराव चढवावा, असा प्रस्ताव गांधीजींनी काँग्रेस पक्षाच्या पुढ्यात मांडला. परंतु, गांधीजींचा तो प्रस्ताव कोणीच मानला नाही. गांधीजींनी मांडलेल्या त्यांच्या प्रस्तावानुसार, एक सामाजिक संघटना म्हणून काँग्रेसचा पुनरावतार घडविला जाणेच अधिक श्रेयस्कर ठरले असते, असे आता मागे वळून बघताना वाटते. राजकीय संघटना म्हणून काँग्रेसचे विसर्जन झाल्यानंतर जी कोणती राजकीय संघटना नव्याने आकाराला आली असती त्या संघटनेला तळागाळात करावयाची सामाजिक कामे तसेच काही मूलभूत कल्पना सुचविणारे व्यासपीठ म्हणून, सामाजिक संघटनेचे कालोचित रंगरूप नव्याने धारण केलेल्या काँग्रेसला अर्थपूर्णपणे सक्रिय राहता आले असते. या सामाजिक संघटनेमध्ये कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांची आणि (राजकीय पुनरावतार झालेल्या) नवकाँग्रेसची विचारसरणी एकाच मुशीतून घडलेली असल्यामुळे, त्या कार्यकर्त्यांनी नवकाँग्रेसला बळ पुरविले असते. तसे झाले असते तर, आज अनुभवास येणाऱ्या सामाजिकदृष्ट्या प्रतिगामी वृत्तीप्रवृत्तींचा मुकाबला करण्याची वेळ आपल्यावर येती ना.

काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळात प्रवर्तित केलेल्या रचनात्मक कार्यक्रमांना स्वातंत्र्योत्तर काळात खीळ बसली हे खरे. परंतु, नव्यानेच प्रवर्तित झालेल्या काही विकासोपक्रमांच्या माध्यमातून साकारणाऱ्या नवीन सामाजिक संरचनेचा फायदा देशाच्या काही प्रांतांत त्या पक्षाने करून घेतला. नव्याने अस्तित्त्वात आलेल्या रचनात्मक कार्यक्रमांमध्ये पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभागी व्हावे म्हणून त्यांना प्रोत्साहित केले. 'महाराष्ट्र' या नावाचे भू-राजकीय एकक १९६० साली देशाच्या नकाशावर अवतरण्यापर्यंत अस्तित्त्वात असलेल्या जुन्या मुंबई इलाख्याचे उदाहरण या संदर्भात उद्बोधक ठरावे.

सहकारी पतपेढ्यांचे प्रवर्तन गावपातळीवर घडवून आणण्याची एक व्यापक मोहिम भारतीय रिझर्व्ह बँकेने १९५०च्या पूर्वार्धात सुरू केली. अशा पतपेढ्यांचे अल्पमूल्य समभाग खरेदी करत ग्रामीण भागातील शेतकरी त्या कार्यक्रमात सक्रिय बनले. शेतीच्या हंगामांतच सदस्यांकडून कर्जाची मागणी येईल, या हिशेबाने, खरीप आणि रबीच्या हंगामांसाठी शेतीसंलग्न खर्चाची अंदाजित आकडेवारी पतपेढ्यांनी तयार केली. कर्जाऊ रकमेची ती संभाव्य गरज भागविण्याच्या दृष्टीने त्या त्या पतसंस्थेकडे संकलित झालेल्या ठेवी आणि त्यांचे भागभांडवल अपुरे ठरते आहे, असे ध्यानात आले तर आणि तेव्हा, त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक






तिच्याकडील ठेवी घेऊन पतसंस्थांच्या मदतीस धावून आली. अशा सहकारी पतसंस्थांचे सदस्यत्व घेण्याबाबत शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे, त्यांच्या कर्जविषयक गरजांचे नेमके अंदाज तयार करण्यात शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मदत करणे, त्या संदर्भात शेतकऱ्यांच्या पुढ्यात उद्भवणाऱ्या समस्या पतसंस्थांच्या पुढ्यात सादर करणे...अशांसारखी कामे हे केवळ काँग्रेसच्याच नव्हे तर, काँग्रेसेतर अन्य अनेक राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचे एक मुख्य कार्यक्षेत्रच बनून गेले. हे तसे बऱ्यापैकी पूर्ववेळचे काम होते. शेतीच्या तसेच शेतकऱ्यांच्या समस्यांची जवळून ओळख करून घेण्याची एक नामी संधीच त्यांद्वारे पक्षकार्यकर्त्यांना चालून आली. ग्रामीण जनतेबरोबर, या माध्यमातून, प्रस्थापित होणारा त्यांचा संपर्क सातत्यशील आणि तितकाच सुजाण होता. गावपातळीवर तसेच जिल्हास्तरावर कार्यरत असणाऱ्या अशा पतसंस्थांच्या कामकाजामध्ये सक्रिय सहभाग घेण्याबाबत मुंबई इलाख्यातील काँग्रेस संघटनेने आपल्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहनच दिले. यांतूनच, विविध स्तरांवर कार्यरत बनलेल्या सहकारी संस्थांमध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग वाढता राहिला, वाढू लागला. सहकारी चळवळीच्या दृष्टीने मुंबई, मद्रास आणि पंजाब ही तीन राज्ये अव्वल ठरली.

आपल्या देशातील एका अग्रगण्य अर्थतज्ज्ञाचा (माझे शिक्षक, प्राध्यापक धनंजयराव गाडगीळ) सल्ला, आधार व मार्गदर्शन घेत, अहमदनगर जिल्ह्याच्या सिंचित पट्ट्यातील शेतकऱ्यांनी ते पिकवत असलेल्या उसावर प्रक्रिया करण्यासाठी सहकारी तत्त्वांवर साखर कारखाना उभारण्याच्या दिशेने १९५० सालाच्या प्रारंभी पावले उचलण्यास सुरुवात केली. त्या प्रस्तावित सहकारी साखर कारखान्याच्या एका समभागाची किंमत त्या वेळी होती केवळ १० रु पये इतकी. परंतु, तेवढेही आर्थिक बळ पदरात नसलेल्या गोरगरीब शेतकऱ्यांनी अक्षरशः घरातील भांडीकुंडी विकून कारखान्याचे समभाग खरेदी केले. परंतु, तेवढे करूनही, कारखान्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री खरेदी करण्यास आवश्यक असणारी पुंजी काही उभी राहू शकली नाही. शेवटी, अर्थसाहाय्यासाठी राज्य सरकारला विनंती करण्याचे ठरले. सहकारी तत्त्वावर आकारास येत असलेल्या संस्थेच्या वित्तीय कारभारात शासनसंस्थेने पाऊल घालण्याच्या कल्पनेलाच मुळात, तत्कालीन सत्ताधारी काँग्रेस सरकारमध्ये अर्थखाते सांभाळणाऱ्या वैकुंठभाई मेहता यांचा विरोध होता. मोठ्या मिनतवारीनंतर, अखेर, प्रचलीत व्याजदरानुसार कारखान्याला कर्ज देण्यास वैकुंठभाईंनी अनुमती दिली. कारखान्याने घेतलेल्या कर्जाची पुरती परतफेड १० वर्षांच्या कालावधीमध्ये सव्याज करण्याच्या अटीवर ती सहमती दिली गेली. कारखाना रीतसर चालू झाल्यानंतर केवळ सातच वर्षांत सरकारकडून घेतलेले कर्ज कारखान्याने पूर्णपणे सव्याज फेडून टाकले. प्रवरानगरच्या या कारखान्याचे यश पाहून, आपापल्या भागातही सहकारी तत्त्वावरील साखर कारखाने प्रवर्तित करण्याबाबत राज्याच्या सिंचित भागातील शेतकऱ्यांना हुरूप आला. राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी, खास करून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी, सहकारी साखर कारखाने उभारण्यात आणि ते चालविण्यात सक्रिय सहभाग घेतला. प्रदेश काँग्रेसनेही

आपल्या कार्यकर्त्यांना त्या बाबत प्रोत्साहनच दिले.

सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्री संघ राज्यातील प्रत्येक तालुक्यात स्थापन व्हावेत या दृष्टीने एक स्वतंत्र कायदाच अस्तित्त्वात आणण्यात आला. शेतीसाठी शेतकऱ्यांना आवश्यक असणारे उत्पादन घटक तसेच शेतीमध्ये पिकलेला शेतमाल यांची खरेदी-विक्री सहकारी तत्त्वांवर कार्यान्वित बनविण्यात आलेल्या अशा खरेदी-विक्री संघांच्या माध्यमातून सुकर बनावी, हा हेतू त्या मागे होता. कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते या खरेदी-विक्री संघांमध्येदेखील सक्रिय सहभागी झाले. शेतकऱ्यांच्या समस्यांबाबतचे कार्यकर्त्यांचे आकलन त्यांद्वारे पायाशुद्ध बनले. तर दुसरीकडे, अशा संस्था-संघटनांच्या माध्यमातून जनसामान्यांबरोबरची त्यांची नाळही पक्की झाली.

या सगळ्यांच संस्था सहकारी तत्त्वावर स्थापन होऊन कार्यरत बनलेल्या होत्या, ही बाब या ठिकाणी अधोरेखित करावयास हवी. सरकारी संस्था असे त्यांचे स्वरूप नव्हते. सहकारी तत्त्वांवर स्थापन झालेल्या संस्थांना शासनसंस्थेकडून कोणत्याही स्वरूपाचे अनुदान मिळत नसे. केवळ एवढेच नाही तर, शासनसंस्थेचा कोणत्याही स्वरूपातील वित्तीय सहभागही सहकारी संस्थांमध्ये नव्हता. सर्वदूर झिरपलेली अशी ती निखळ सहकारी चळवळ होती. 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वाला अनुसरत, कूळ या नात्याने खंडाने जमीन घेऊन ती कसणाऱ्यांकडे त्या जमिनीची मालकी हस्तांतरित करणारा कायदा मुंबई सरकारने १९५४ साली अस्तित्त्वात आणला. सहकारी चळवळीला त्या कायद्यामुळे मोठे बळच प्राप्त झाले. समाजाच्या तळागाळात काम करणारे कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते त्या सामाजिक चळवळीमध्ये अत्यंत हिरिरीने सामील झाले. या साऱ्यांतून, देशाच्या प्रगतीस जसा एकीकडे हातभार लागला, तसेच दुसरीकडे कॉंग्रेसच्या संघटनेचेही सक्षमीकरण घडून आले.

'महाराष्ट्र' या नावाचे वेगळे भू-राजकीय एकक १९६० साली स्वतंत्र राज्याच्या रूपाने अस्तित्त्वात आले. त्या नंतर वर्षभरातच, अनेकार्थांनी क्रांतिकारक शाबीत होणारा असा एक कायदा राज्याच्या विधानसभेने अस्तित्त्वात आणला. त्रिस्तरीय पंचायत राज्याची व्यवस्था त्या कायद्यान्वये राज्यात प्रस्थापित झाली. जिल्ह्याच्या स्तरावर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिती तर गावपातळीवर ग्रामपंचायत असे त्या व्यवस्थेचे स्वरूप होते. राज्य सरकारच्या निधीद्वारे जिल्ह्यामध्ये कार्यान्वित केल्या जाणाऱ्या सर्व शासकीय विकासयोजनांची अंमलबजावणी करणे, हे या त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्थेतील संस्थांचे काम होते अथवा गणले गेले. जिल्हा परिषदा या लोकनियुक्त संस्था होत्या. भारतीय प्रशासकीय सेवेमधून प्रशासनामध्ये दाखल झालेला अधिकारी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केला जात असे. जिल्ह्याच्या भौगोलिक सीमांतर्गत सर्व विकासकामांचे व प्रकल्पांचे नियोजन, आखणी आणि अंमलबजावणी व त्यांचे शिरस्त्याचे व्यवस्थापन ही जिल्हा त्रिस्तरीय पंचायत राज्य संस्थांची जबाबदारी बनली. या लोकनियुक्त संस्थांनी त्यांच्या त्यांच्या हिताची जोपासना करणाऱ्या विकासप्रकल्पांची आखणी व नियोजन करणे अपेक्षित होते. राज्य सरकारच्या वार्षिक अंदाजित खर्चापैकी जवळपास ४० टक्के रक्कम एक गठ्ठा जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आली. त्या






त्या जिल्ह्यात नियुक्त असलेले शासकीय कर्मचारी जिल्हा परिषदांकडे वर्ग केले गेले व 'जिल्हा परिषदांचे कर्मचारी' म्हणून त्यांना गणले जाऊलागले. जिल्हा परिषदांमधील मनुष्यबळाची भरती करण्यासाठी स्वतंत्र लोकसेवा आयोग निर्माण केला गेला. या साऱ्यामुळे राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांप्रमाणेच जनसामान्यांमध्येही उदंड उत्साह सळसळू लागला. आपापल्या गरजांची व समस्यांची नोंद सर्वसामान्य नागरिक त्या त्या स्तराशी संबंधित पंचायत राज्य संस्थेकडे करू लागले. आपल्या

समस्यांची सोडवणूक करून घेण्यासाठी आमदार-खासदारांकडे जाण्याची गरज त्यांना भासेनाशी झाली. आपापल्या स्थानिक परिसरातील गरजांच्या पूर्ततेमध्ये राजकीय कार्यकर्ते गढून राहू लागले. जिल्हा पातळीवरील विविध प्रश्नांबाबत जिल्हा परिषदांमध्ये असणाऱ्या विषयवार समित्यांच निर्णय घेत असत. विविध राजकीय पक्षांच्या लोकनियुक्त प्रतिनिधींना अशा विषय समित्यांवर प्रमाणित प्रतिनिधित्व मिळत असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावलेला होता. जिल्ह्यापाशी उपलब्ध असलेल्या सीमित साधनसामग्रीच्या मर्यादेतच जिल्ह्याच्या गरजांचा प्राधान्यक्रम बसवून त्यानुसार त्यांचे नियोजन व अंमलबजावणी करण्याबाबतचे धडे



लोकनियुक्त प्रतिनिधी या सगळ्या प्रक्रियेद्वारे हळूहळू गिरवायला लागले. सामाजिक आणि आर्थिक कृतिकार्यक्रमांच्या अशा समन्वयाद्वारे लोकसत्ताक संस्था-संघटनांच्या वाढविस्तारास स्वाभाविकपणेच चालना मिळाली, मिळत राहिली.

परंतु, सहकारी संस्था आणि जिल्हा परिषदा यांनी संपादन केलेले यशच, एका परीने, त्यांच्या मुळावर आले. सहकारी पतसंस्थांना सवलतीच्या अथवा/आणि कमी व्याजदराने कर्जाऊनिधी उपलब्ध करून देण्याच्या राज्य सरकारच्या प्रवृत्तीपायी निधीपुरवठ्याचा एक बाह्य स्रोत पतसंस्थांना खुला झाला आणि, पतसंस्थांच्या कार्यक्षम चलनवलनाबाबत सदस्य शेतकऱ्यांमध्ये तिथवर नांदत आलेल्या ममत्त्वाला हळूहळू ओहोटी लागली. या नवीन प्रवाहाद्वारे हाताशी बाहेरून येणारा असा निधी, कमी व्याजदर आकारून कर्जरूपाने सदस्य शेतकऱ्यांना वाटप करण्याचा परिपाठ सहकारी पतसंस्थांनी अंगिकारल्यामुळे, सदस्यांच्या ठेवी आपल्याकडे वळवणे त्यांना दुष्कर बनू लागले. परिणामी, गावपातळीवर कार्यरत असणाऱ्या सहकारी तत्त्वावरील प्राथमिक पतसंस्था आजघडीला मृत्युशय्येवर आहेत. राजकीय बळाचा तसेच दडपणाचा प्रयोग करून सहकारी साखर कारखान्यांनी सरकारकडून केवळ कर्जेच नव्हे तर भागभांडवलही पदरात पाडून घेण्यास सुरुवात केली. ज्यांच्या शेतातील उसाचे एक कांडदेखील कारखान्याला घातले जात नव्हते असे बिगर उसकरी शेतकरीही सहकारी साखर कारखान्याचे सदस्य बनून त्या व्यवस्थेमधील महत्त्वाची पदे अडवून बसू लागले. सरकारकडून अधिकाधिक निधी पदरात पाडून घेण्याचे कौशल्य दाखविणारी व्यक्ती तुलनेने अधिक यशस्वी व्यवस्थापक म्हणून गणली जाऊ लागली. अस्तित्त्वात असलेलेल्यांपैकी बहुसंख्य साखर कारखाने वित्तीय हलाखीच्या परिस्थितीमध्ये ढकलले जाऊन जवळपास बंद पाडण्याच्या टोकावर येऊन ठेपणे, हीच या साऱ्याची निष्पत्ती.

या सगळ्यांत सर्वाधिक करूण, शोकात्म परिस्थिती ओढवली ती जिल्हा परिषदांवर. स्थानिक पातळीवर उद्धवणाऱ्या अडचणींची तड लावण्यासाठी नागरिकांनी आपापल्या जिल्हयाच्या जिल्हा परिषदेकडे अथवा संबंधित पंचायत समितीकडे धाव घेण्यास सुरुवात केल्यानंतर, स्थानिक आमदार-खासदारांच्या पोटात गोळा उठला अथवा उठू लागला. विधानसभेमध्ये अथवा संसदेमध्ये कार्यरत राहून राज्य अथवा देशपातळीवरील कायदे करण्याचे संवैधानिक काम त्यांना कमी महत्त्वाचे भासू लागले. जिल्हा परिषदा खालसा करण्याचे त्यांच्या मनाने घेतले. जिल्हा परिषदांची निर्मिती त्या संदर्भातील स्वतंत्र कायद्यान्वये करण्यात आलेली असल्यामुळे, जिल्हा परिषदांचे पंख छाटणारा, त्यांचे अस्तित्त्व वास्तवात निष्प्रभ बनविणारा कायदा १९७१ साली मंजूर करण्यात आला.

अगदी तळागाळात राहून कशा प्रकारचे रचनात्मक कार्य राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना करता येते अथवा करणे शक्य असते आणि जे त्यांनी केलेच पाहिजे याची काहीशी झलक महाराष्ट्रातील या प्रयोगाच्या उदाहरणाद्वारे आपल्याला मिळते. 'सरकार' अथवा 'शासन' नावाच्या संस्थेचे अस्तित्त्व देशात तितके बलवत्तर अथवा प्रकर्षाने प्रतीत होता कामा नये, अशा

प्रकारची एक भावना १९९१ सालापासून आणि खास करून २०१४ सालानंतर आपल्याकडे नांदताना दिसते. सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या संस्था यादेखील सरकारी संस्थाच होत, अशा प्रकारची मानसिकता केवळ सरकारच्याच नव्हे तर, अगदी सर्वसामान्य नागरिकांच्यादेखील मनात, गेल्या काही दशकांतील वास्तवाद्वारे झिरपलेली दिसते, जाणवते. निखळ भांडवलीशाहीप्रधान खासगी उद्योगसंघटनाच काय त्या केवळ अर्थपूर्णपणे सक्रिय राहू शकतात, अशीही एक धारणा या सगळ्यांद्वारे मूळ धरताना दिसते. सर्वत्र असा माहौल असताना अथवा असेल तर, एका हिंदुत्त्वाचा प्रचार-प्रसार करत राहण्यापलीकडे राजकीय पक्षांच्या तळागाळातील कार्यकर्त्यांच्या हातात मग उरतेच काय? या वास्तवातून बाहेर येण्यासाठी पूर्णपणे नवीन अशा वैचारिक भूमिकेचे, तत्त्वप्रणालीचे संगोपन-संवर्धन घडविणे आवश्यक ठरते. प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा खासगी असल्या पाहिजेत का...? अगदी



गावापासून ते जिल्ह्यापर्यंत आरोग्यसुविधा पुरविणाऱ्या संस्था-यंत्रणा बिगर शासकीय असायला हव्यात का...? खेडोपाडी तसेच शहरोशहरी पाणीपुरवठादेखील खासगी उद्योग घटकामार्फत केला गेला पाहिजे का...? रस्तेबांधणी, नद्यांच्या काठांवर घाटांची उभारणी, मासेमारीसाठी लहान बंदरे तसेच समुद्र अडविणारे संरक्षक बंधारे वा भराव यांचे बांधकाम, त्यांची निगराणी अशांसारखी कामे खासगी कंपन्यांकडे सोपवायची का...? कारखाने उभारण्यासाठी लहान-मोठ्या उद्योगांना सरकारी मालकीच्या जमिनी विकत बसणे, हाच काय तो एकमात्र धंदा सरकारने करत बसावे का...? गावातील बेरोजगार तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध होऊ शकेल असा उत्पादक स्वरूपाचा एखादा उपक्रम सुरू करण्यासाठी, परिसरातील पडीक क्षेत्र लहान वा मध्यम आकारमानाच्या उद्योगांना खंडाने देणे ग्रामपंचायतींना शक्य का बनू नये...? आपापल्या कार्यक्षेत्रात आवश्यक भासणाऱ्या सार्वजनिक सेवासुविधा पुरविण्याच्या दृष्टीने उचित अशा योजना आखून त्यांची अंमलबजावणी करण्याची कायदेशीर जबाबदारी व निधी गाठीशी असणाऱ्या सक्षम अशा स्वायत्त स्थानिक स्वराज्य संस्था का असू नयेत...? राज्य सरकारचे निव्वळ कंत्राटदार म्हणूनच स्थानिक स्वराज्य संस्थांनी काम करत बसायचे का (आजमितीस या संस्था तशाच पद्धतीने कार्यरत असल्याचे दिसते)...? हे असेच असणार असेल तर, हिंदुत्त्वाचा प्रचार-प्रसार करणे, बेवारस गुरांसाठी गोशाळा चालवणे, गोमांसाची विक्री केल्याच्या अथवा सेवन केल्याच्या वहिमावरून संबंधितांना पकडणे, त्यांची हत्या करणे यांखेरीज मग राजकीय पक्षांच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना अन्य कामे ती कोणती उरावीत...?

भवतालातील सगळी परिस्थिती अशी असल्यामुळेच, निदान स्वतःचे अस्तित्त्व टिकवून धरण्यासाठी का होईना पण, तळागाळात काम करणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांसाठी काही तरी रचनात्मक कार्यभूमिका आणि त्याबरहुकूम योजना तयार करण्याबाबत गंभीरपणे विचार करणे काँग्रेस आणि प्रादेशिक पातळीवरील अन्य राजकीय पक्षांना आता क्रमप्राप्त बनते. पक्षाचा अध्यक्ष निवडण्यापुरतेच हे मर्यादित वा तात्कालीक नाही. पुरेसे तर नाहीच नाही. हा प्रश्न एका राजकीय पक्षाच्या जीवनमरणाचा आहे. आता, या बिंदूवर काँग्रेससारख्या राजकीय पक्षाकडून अपेक्षित आहे तो विचार व भूमिका येत्या दशकांबाबतची. निदान या शतकभराचा तरी पल्ला त्या पक्षाने नजरेपुढे ठेवावयास हवा. पक्षाची सामाजिक-आर्थिक संरचना येत्या काळात कशा प्रकारची असावी, कोणत्या धर्तीचे संघटनात्मक रूप-स्वरूप पक्षाने धारण करावे आणि त्याच्या छायेत कशा प्रकारची कामे व उपक्रम यांत तळागाळात काम करणारे पक्षकार्यकर्ते नियमितपणे सक्रिय राहू शकतील या दिशेने विचारमंथन केले जाणे आता निकडीचे ठरते. हिंदुत्त्वाचे उभे केले जाणारे प्रतिगामी रंगरूप आणि त्याच्या माध्यमातून निपजणारी अमानुषता यांबाबतच केवळ नव्हे तर, जातीयता व शिवाशीव यांच्या विरोधासह अधिकाधिक न्याय्य समाजाच्या उभारणीबाबत जनसामान्यांशी संवाद प्रस्थापित करणे पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना त्यांमुळे शक्य बनेल.

समाजाच्या पार शेवटच्या थरांतील जनसमूहांमध्ये काम करणाऱ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना कशा व कोणत्या प्रकारच्या रचनात्मक कार्यक्रम-उपक्रमांमध्ये नेहेमीसाठी गुंतवून ठेवता येईल, याबाबत विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपलेली आहे. सहकारी संस्थांचा विचार या संदर्भात डोळ्यांपुढे येतो. सहकारी संस्था या मुळात आणि स्वरूपतः

लोकसंस्था होत. मात्र, शासनसंस्थेच्या निधीच्या माध्यमातून या लोकसंस्थांमध्ये सरकारचा सहभाग अतिशय मोठ्या प्रमाणावर घडून आलेला असल्यामुळे आज त्यांचा इमला पुरता खचलेला दिसतो. सहकारी संस्थांचे चलनवलन सरकारच्या इशाऱ्यानुसार घडून येणार नाही अथवा सरकारी अनुदानाच्या भाराखाली त्या दबून जाणार नाहीत, याची हमी घेतली जाणे, हा या सगळ्यांतील कळीचा मुद्दा ठरतो. ही काही फार अभिनव कल्पना अजिबात नाही. सहकारी संस्थांचे अंगभूत वा मूळ स्वरूपच तसे आहे. त्यांची निपजच या तत्त्वानुसार झालेली आहे. परंतु, गोरगरिबांना मदत करण्याच्या नावाखाली आपल्या देशात त्यांचे पार विद्रुपीकरण केले गेले. माझे हे प्रतिपादन अपूर्व अथवा अभिनव आहे, असे मुळीच नाही.

१९९५ साली आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री रामा राव यांनी सहकारी संस्थांच्या संदर्भात एक समांतर कायदा अस्तित्त्वात आणला आणि सहकारी संस्थांना मुक्त करून टाकले. सरकारच्याबरोबर कोणत्याही प्रकारचा वित्तीय संबंध नसणाऱ्या अथवा/आणि सरकारच्या कोणत्याही प्रकारच्या नियंत्रणाखाली नसलेल्या अशा आणि आपल्या संस्थापक सदस्यांनाच केवळ उत्तरदायी असणाऱ्या संस्था असे स्वरूप सहकारी संस्थांना त्या कायद्यान्वये पुन्हा एकवार प्राप्त करून दिले गेले. नवनिर्मित तेलंगणा राज्यातील काझीपेठच्या आजूबाजूस असलेल्या काही जिल्ह्यांमध्ये ५००पेक्षा अधिक सहकारी पतसंस्था आजमितीस कार्यरत आहेत. त्यांतील बव्हंश पतसंस्थांचे कामकाज व व्यवस्थापन खेडोपाडी राहणाऱ्या महिलांच्या हातात असून अतिशय यशस्वीपणे त्या चालू आहेत. या पतसंस्थांनी त्यांच्या काही सामाईक संस्था स्थापन केलेल्या असून आपल्याजवळील वाढीव अथवा शिल्लक निधी सहकारी पतसंस्था त्या सामाईक संस्थेमध्ये ठेवतात किंवा जमा करतात आणि गरज पडेल तेव्हा त्याच संकलित रकमेमधून कर्ज घेतात. या व्यवस्थेबाहेरील एकाही संस्थेचा या सगळ्या चित्रात कोठेही समावेश नसतो. पतसंस्थांच्या सदस्य महिलांनी काही अतिरिक्त भागभांडवलाचे योगदान आपापल्या पतसंस्थेमध्ये दरवर्षी जमा करणे त्यांना बंधनकारक केले जाते. सदस्य महिलांच्या ठेवींवर पतसंस्था त्यांना व्याज अदा करते आणि गरजू सदस्यांना पतसंस्थेने निर्धारित केलेल्या व्याजदरानुसार कर्जे दिली जातात. पतसंस्थेचे सदस्य नसलेल्यांना अथवा, ज्या उपक्रमासाठी संस्था कार्यान्वित करण्यात आलेली आहे त्या उपक्रमात सलग, घटकाभर समजा, तीन वर्षे ज्या सदस्यांचा सक्रिय सहभाग राहिला नसेल अशांना पतसंस्थेच्या सदस्यत्वातून वगळण्यात येते. पूर्वापार अस्तित्त्वात असलेल्या कायद्याच्या जोडीनेच या नवीन कायद्याची अंमलबजावणी मग समांतर पद्धतीने तिथे चालू झाली. आणि, त्यांतूनच एक अरिष्ट ओढवले. निवडणुका झाल्या आणि आंध्रात सत्तांतर घडून आले. सहकारी तत्त्वावर आंध्रात त्या वेळी कार्यरत असलेल्या यच्चयावत डेअऱ्यांनी त्यांचे कामकाज जुन्या सहकार कायद्यान्वये करावे, असा फतवा नव्याने सत्तेवर आलेल्या सरकारने जारी केला. सहकारी तत्त्वावरील डेअऱ्यांच्या कामकाजात हस्तक्षेप करणे राज्यात सत्तारूढ असलेल्या तत्कालीन सरकारला सोयीचे ठरावे म्हणून कदाचित असा बदल जारी केला गेला असावा. अखेर, थेट सर्वोच्च न्यायालयात प्रदीर्घ काळ लढल्या गेलेल्या खटल्यांती न्यायालयाने दिलेल्या निवाड्यामुळेच केवळ त्या डेअऱ्या तगल्या. आंध्राचाच कित्ता गिरवत देशातील अनेक राज्यांनी, यथावकाश, सहकाराचे समांतर नवीन कायदे अस्तित्त्वात आणले. परंतु, त्या नवीन कायद्यांमुळे सहकारी संस्थांच्या प्रगतीस फारसा हातभार लागल्याचे अनुभवास येत नाही. असे




होण्यामागील कारणे सहज समजण्याजोगी आहेत. सहकारी संस्थांसाठी नव्याने मंजूर करण्यात आलेला कायदा हाच सहकाराचा एकमेव कायदा म्हणून व्यवहारात लागू केला जाणे आता अत्यंत अगत्याचे ठरते. आपापल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संबंधित जनसमूहांनी एकत्र येऊन आपल्या सामूहिक हिताचे संवर्धन करण्यासाठी सहकारी तत्त्वांवर प्रवर्तित केलेल्या संस्था, असे सहकारी संस्थांचे अपेक्षित असलेले मूळ विशुद्ध स्वरूप त्यांद्वारेच व्यवहारात साकारू शकेल. अशा खऱ्या अर्थाने सहकारी आणि शासनसंस्थेचा कोणत्याही स्वरूपाचा हस्तक्षेप नसलेल्या, राजकीयीकरण घडून न आलेल्या संस्था प्रवर्तित करणे, मग, गावांत अथवा शहरांत राहणाऱ्या लोकांना शक्य बनेल. अशा प्रकारच्या सहकारी संस्थांचे संघटन घडवून आणणे हा, तळागाळात राहून पक्षाचे काम करणाऱ्या होतकरू कार्यकर्त्यांसाठी अतिशय उपयुक्त असा सकारात्मक कार्यक्रम

ठरू शकेल. अशा संस्थांचे प्रवर्तन आणि व्यवस्थापन यांद्वारेच लोकसत्ताक संस्थासंघटनांद्वारे रचनात्मक कार्य करण्याची कला त्यांना शिकून घेता येईल. सहकारी तत्त्वांवर ज्यांचे प्रवर्तन घडवून आणता येईल असे किती तरी उपक्रम देशाच्या ग्रामीण भागांत हाती घेता येतील. विविध क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या सामाजिक तसेच राजकीय कार्यकर्त्यांसाठी कर्तृत्वाचे हे मोठेच क्षेत्र आज खुले आहे. ज्या कायमस्वरूपी पडीक जमिनी आज गावोगावी कोणत्याही वापराविना पडून आहेत त्यांचे स्वामित्व स्थानिक ग्रामपंचायतींकडे सोपविल्यास नाना प्रकारचे आर्थिक-व्यावसायिक उपक्रम खेडोपाडी चालू करता येणे शक्य बनेल. ग्रामपंचायती, मग, अशा जमिनी बिगरशेती स्वरूपाच्या उत्पादक उद्योगव्यवसायांसाठी होतकरू इच्छुकांना खंडाने




वापरावयास देऊ शकतील. त्यासाठी अशा पडीक क्षेत्रांचा जो काही किमान विकास करावा लागेल तो ग्रामपंचायतींनी करावा. खंडाने अदा केलेल्या जमीनवापराचे असे करार किमान ३० वर्षे इतक्या कालावधीचे असावेत, अशा प्रकारच्या काही मार्गदर्शक सूचनावजा तत्त्वांचा या संदर्भात विचार करता येईल. अशा व्यवस्थेद्वारे गावोगावी उभारल्या जाणाऱ्या उद्योगधंद्यांमध्ये बेरोजगार स्थानिक तरूणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल.

महाराष्ट्राने १९६०च्या दशकात अस्तित्त्वात आणलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद कायद्याच्या धर्तीवरील एखाद्या कायद्याचे पुनरुज्जीवन/अंमलबजावणी देशातील प्रत्येक राज्यात घडविली जावी, असे या टप्प्यावर आता मला सुचवावेसे वाटते. राजकीय पक्षांच्या गावपातळीवर आजमितीस कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांना रचनात्मक कार्याच्या अनंत दिशा त्यांद्वारे उजळून निघतील. एकदा का अशा प्रकारचा कायदा अस्तित्त्वात आला की, जिल्हा-तालुका-गाव या तीनही पातळ्यांवरील पंचायत संस्थांचे कार्यक्षेत्र अगदी आपसूकच निश्चित होऊन जाईल. अशा प्रकारे, आपापल्या कार्यक्षेत्रात स्थानिक गरजांशी सुसंवादी असे उपक्रम राबविण्यासाठी पंचायत राज्य संस्थांपाशी विहित निधीही उपलब्ध होत राहील. स्थानिक स्वराज्य संस्था चालवत असलेल्या खेडोपाडीच्या प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक शाळा, प्राथमिक तसेच जिल्हास्तरीय आरोग्य केंद्रे, शिक्षक तसेच परिचारिकांसाठी चालविण्यात येणारी प्रशिक्षण केंद्रे, विशेष प्रकारचे प्रशिक्षण देणारी उच्च माध्यमिक केंद्रे यांच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांचे कार्यकर्तृत्व सिद्ध करण्याच्या मुबलक संधी उपलब्ध होतील. गावपातळीवरील शाळा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे, नाना प्रकारची प्रशिक्षण केंद्रे यांसारख्या संस्थांचे नियोजन व संघटन कार्यक्षम पद्धतीने घडवून आणणे, हे राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या पुरूष तसेच महिला कार्यकर्त्यांच्या दृष्टीने एक प्रकारे आव्हानात्मक काम ठरेल. अशा प्रकारच्या संस्थांची कार्यवाही करणे, त्रिस्तरीय पंचायत राज्य संस्थांचे कामकाज चालविणे, या स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत राबवावयाच्या उपक्रम व योजनांची अंदाजपत्रके तयार करणे, प्रवर्तित केलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी करणे...या सारख्या माध्यमांतून तळागाळातील राजकीय कार्यकर्त्यांचे लोकसत्ताक संस्था-संघटना चालवण्यासंदर्भातील प्रशिक्षणही आपसूक घडत राहील. गावस्तरावर काम करणाऱ्या पक्षकार्यकर्त्यांना रचनात्मक कार्यांचा असा पर्याय निर्माण होऊन, केवळ विधानसभा अथवा लोकसभेच्या निवडणुकांदरम्यान प्रचार करण्यापलीकडे काहीच काम नसण्याची त्यांची परवशता संपुष्टात येईल. परिणामी, पदरी येणाऱ्या निराशेपासूनही कार्यकर्त्यांची सुटका होईल.


येथवर आपण चर्चा केलेली रचना एकदा का कार्यरत बनली की, जनसामान्यांच्या लेखी गरजेच्या आणि महत्त्वाच्या ठरणाऱ्या बाबी याच होत, हे पक्ष कार्यकर्त्यांच्या ध्यानात येईल. त्या बरोबरच, हिंदुत्त्वाचा पाठपुरावा ही अनिष्ट आणि पुढची वाटचाल खुंटवून टाकणाऱ्या कोणत्या तरी एखाद्या आडमार्गाच्या बोळात समाजाला घेऊन जाणारी दिशाभूल होय, याचाही साक्षात्कार त्यांना घडेल. काँग्रेस, आपल्या देशातील अन्य राजकीय पक्ष यांनीच केवळ नव्हे तर, येत्या काळात नव्याने अस्तित्त्वात येणाऱ्या नवीन राजकीय संस्थासंघटनांनीही याच दिशेने विचार करणे संयुक्तिक ठरेल. स्वतःचे अस्तित्त्व टिकविण्याबरोबरच जनसामान्यांना त्यांचे लोकशाही अधिकार उमजावेत आणि त्यांसाठी त्यांनी आग्रही बनावे यासाठी त्यांचे सक्षमीकरण घडवून आणता यावे, यासाठीही राजकीय पक्षांना हे गरजेचे आहे.

Best

Compliments

# अर्थव्यवस्थेवर दाटून आलेले काळे ढग ?

**आकाश** नवी दिल्ली






करोनाची साथ आटोक्यात येत आहे असे चित्र तूर्तास तरी दिसत नाही. केंद्र सरकारने सुरुवातीच्या काळात श्रेय घेण्याच्या स्पर्धेत लॉकडाऊन केले. त्याचे जे दुष्परिणाम व्हायचे ते झालेच आहेत. परंतु ही साथ हाताबाहेर जात असल्याचे पाहिल्याबरोबर केंद्र सरकारने त्यातून आपले अंग काढून घेतले आणि या साथीचा मुकाबला करण्याची जबाबदारी राज्यांवर टाकून ते मोकळे झाले. फक्त गाइडलाइन्स जारी करण्यापुरता केंद्र सरकार म्हणजेच केंद्रीय गृह मंत्रालय आपला अधिकार वापरु लागले. परंतु या आपल्या तुटपुंज्या आणि मर्यादित साधनसंपत्तीच्या आधारे राज्य सरकारे या साथीचा मुकाबला करीत राहिली. या परिस्थितीतच जीएसटीच्या थकबाकीपोटी राज्यांना द्यावयाच्या रकमेचा प्रश्न अधिक ज्वलंत व बिकट झालेला आहे. या साथीचा प्रभावी मुकाबला करावयाचा असेल तर केंद्र सरकारने कसेही करुन राज्यांना जीएसटीची त्यांना देणे असलेली थकबाकी त्वरित देणे अत्यावश्यक झाले आहे. यासाठी पक्षपाती व भेदभावाचे धोरण केंद्र सरकारने अवलंबिल्यास तो लोकद्रोह होणार आहे.

कोरोनाच्या साथीची वाढती लागण, विकासदरात गेल्या चाळीस वर्षातली नीचांकी घसरण, अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राची पीछेहाट, सीमेवर चीनशी वाढता तणाव आणि संघर्षाचे वातावरण, सामाजिक आघाडीवरही वाढती असहिष्णुता आणि लोकशाही संस्थांवरील वाढते आघात आणि त्यांची वाढती दुर्बलता हे देशाचे ताजे चित्र आहे. गरीब-कष्टकरी वर्गाची वंचना कमी होण्याऐवजी आणखी तीव्र होऊन त्यांना रोजच्या उदरनिर्वाहाला मोताद व्हावे लागत असल्याची स्थिती आहे. राज्यकर्त्यांना याची जाणीव नाही असे म्हणता येणार नाही. परंतु याकडे मुद्दाम दुर्लक्ष करणे आणि लोकांचे लक्ष या मुख्य मुद्यांपासून अन्यत्र भरकटवून त्यांना संभ्रमित करणे हा राज्यकारभाराचाच एक भाग असतो. तो अत्यंत प्रभावीपणे केला जात आहे. ज्या दिवशी चालू आर्थिक वर्षाच्या (२०२०-२१) पहिल्या तिमाहीमधील आर्थिक स्थितीची आकडेवारी जाहीर होणार होती त्याच दिवशी अचानक चीनने लडाख मध्ये आक्रमक चाली करुन काही भाग बळकाविण्याचा केलेला प्रयत्न आणि भारतीय सैनिकांनी तो असफल केल्याची बातमी ठळकपणे समोर आली. याला योगायोग म्हणायचे की आणखी काही ? लोकांना खालावलेल्या आर्थिक स्थितीच्या तीव्रतेचे चटके बसू नयेत यासाठी चीनविरोधी देशभक्ति व राष्ट्रवादाच्या गुंगीचे इंजेक्शन देण्याचा हा प्रकार म्हणावा काय ? असे योगायोग पूर्वीही घडले आहेत. गेल्या सहा वर्षात तर फार वेळा झाले आहेत. परंतु लोकांना हळूहळू राज्यकर्त्यांच्या पोकळ व फोल भाषणबाजीचा अनुभव येऊ लागला आहे. त्यामुळेच आकाशवाणीवरुन दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी होणाऱ्या एकतर्फी प्रवचनाच्या तथाकथित लोकप्रियतेचा आलेख एकदमच ढपलेला दिसून आला.

करोनाची वाढती लागण, अर्थव्यवस्थेमुळे लोकांच्या दैनंदिन जीवनात वाढत चाललेल्या समस्या व अडचणी याच्याशी राज्यकर्त्यांना यत्किंचितही देणेघेणे नसल्याचे आढळून येते. अन्यथा आत्मनिर्भरतेची जाहिरात करण्यासाठी देशी कुत्रे पाळण्याचे आवाहन लोकांना केले गेले नसते. भारतीय खेळण्यांची राज्यकर्त्यांना आठवण झाली आणि भारतीय



खेळण्यांना प्राधान्य देण्याचा आग्रहही करण्यात आला. खेळण्यांची आठवण का तर चिनी खेळण्यांचे महत्व कमी व्हावे म्हणून ! परंतु सीमेवर चीनची दादागिरी सहन करीत दुसरीकडे खेळणी निर्मितीत आत्मनिर्भर होण्याचा आग्रह धरणे हे हास्यास्पद आहे. आपण फार सूक्ष्मात जाऊन विचार करतो असे लोकांना दाखविण्याचा अत्यंत उथळ आव आणण्याचा हा प्रकार आहे. हे एक उदाहरण झाले.

दुसरीकडे अर्थमंत्र्यांनी करोना साथ ही 'देवाची करणी' असल्याचे सांगून देशासमोर उभ्या ठाकलेल्या आर्थिक पेचप्रसंगाची जबाबदारीच झटकण्याचा प्रयत्न केला. हताश-निराश आणि निरुपाय झालेला माणूस देवाच्या आधीन होतो असे म्हणतात. साक्षात अर्थमंत्र्यांच्या उद्गारामुळे आता

देशाचे राज्यकर्तेही या किंकर्तव्यमूढ अवस्थेला पोहेचले असाच अर्थ काढावा लागेल.

२०२०-२०२१ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमधील (एप्रिल ते जून अखेर) विकासदरविषयक आकडेवारी जाहीर झालेली आहे. आकड्यांच्या जंजाळात न शिरता त्या आकड्यांचा साधा-सरळ-सोपा अर्थ हा आहे की करोना साथीच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेचे बारा वाजलेले आहेत. एका बाजुला करोना साथीचा आलेख वर वाढत आहे तर दुसरीकडे विकासदराचा आलेख खालीखाली चाललेला आहे. गेल्या चाळीस वर्षातील उच्चांकी अशी विकासदरातली ही घसरण मानली जाते. जवळपास चोवीस टक्क्यांनी(२३.९ टक्के) विकासदर घटलेला आहे. याबद्दल दोष फक्त करोना साथीला द्यायचा काय हा प्रश्न आहे. राज्यकर्ते आणि त्यांची भक्तमंडळी सारा दोष करोनावर टाकून मोकळे होणार हे देवच बोलून चुकला आहे. अर्थमंत्र्यांनी करोनाची साथ हाच दैवी प्रकोप किंवा देवाची



करणी असल्याचे सांगून देवाला बोल लावलेलाच आहे. परंतु वास्तवापासून किती काळ दूर पळणार हा प्रश्न उरतोच ! ही आकडेवारी मुख्यतः संघटित क्षेत्राशी निगडित आहे. या क्षेत्राचा विस्तार वीस टक्क्यांच्या आसपास आहे. सुमारे ऐंशी टक्के क्षेत्र असंघटित आहे. यामध्ये लहान, घरगुती उद्योग, छोटे छोटे व्यवसाय यांचा समावेश होतो. यासंदर्भातील आकडेवारी अद्याप जमा झालेली नाही. ती उपलब्ध झाल्यानंतर विकासदराची टक्केवारी आणखी खालावलेली आढळेल असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. उपलब्ध माहितीनुसार जे लहान उद्योग आहेत ते अर्धक्षमतेनेच चालवले जात आहेत. म्हणजेच पूर्ण क्षमतेने चालण्याची त्यांची क्षमता उरलेली नाही कारण बाजारात तेवढा उठावच नाही. हे क्षेत्र रोजगार निर्मितीक्षम मानले जाते आणि ते अर्धवट क्षमतेने चालत असतील तर रोजगारही निम्म्याने खालावलेले आहेत असे सहज अनुमान यातून निघते. त्यामुळे अनेक अर्थतज्ज्ञांनी सर्वप्रथम या उद्योगांना पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी सरकारने थेट साह्य केले पाहिजे असे मत व्यक्त केले आहे. तसेच लोकांच्या थेट हातात रोख पैसे कसे जातील यासाठीच्या उपाययोजनांवरही सरकार विचार करु शकते. सारांशाने बोलायचे झाल्यास सरकारतर्फे आणखी एक आर्थिक मदतयोजना जाहीर करण्याची वेळ आली आहे असाही सल्ला अर्थतज्ज्ञ देत आहेत. परंतु सरकार देवावर हवाला टाकून हात वर करणारे असेल तर अर्थव्यवस्थेचा वाली कोण हा प्रश्न निर्माण होतो.

या पार्श्वभूमीवर काही मुद्दे विचारात घ्यावे लागतील. सुरुवात केंद्र व राज्य सरकारे यामध्ये जीएसटीची थकबाकी देण्यावरुन निर्माण झालेल्या वादाची दखल घ्यावीच लागेल. जीएसटी प्रणाली लागू करण्यासाठीचा कायदा संमत करताना त्याला जोडूनच आणखी एक कायदा करण्यात आला होता. जीएसटी प्रणाली लागू केल्यानंतर सुरुवातीच्या काळात राज्यांना महसुली नुकसान सहन करावे लागण्याची शक्यता गृहीत धरुन त्या नुकसानीपोटीची भरपाई केंद्र सरकारने करण्यासंबंधी तो होता. त्यावरही बराच खल झालेला होता आणि पहिल्या पाच वर्षांसाठी ही भरपाई देण्याचे तत्व मान्य करण्यात आले. परंतु कोणतेही केंद्र सरकार दिलेल्या शब्दाला जागेल असे फार क्वचित घडलेले आहे.




त्यामुळे या प्रकरणातही जीएसटी लागू केल्यानंतर भरपाईची रक्कम देण्यास सुरुवात झाली. परंतु वेळच्यावेळी आणि सगळी भरपाई देण्यात टाळाटाळ होऊ लागली आणि ती हप्त्यांच्या स्वरुपात देण्याचे प्रकार सुरु झाले. १ जुलै २०१७ रोजी ही प्रणाली अमलात आली. परंतु गेल्या तीन वर्षात वेळच्यावेळी राज्यांना रकमा मिळाल्या असे घडले नाही. ही भरपाई देण्यासाठी एक वेगळा 'सेस' किंवा 'शुल्क' देखील आकारण्यात येत होते. त्यामुळे केंद्राच्या तिजोरीवर त्याचा थेट बोजा पडण्याची स्थिती नाही. परंतु अर्थव्यवस्थेला आलेली मंदी आणि इतरही कारणांमुळे सरकारच्या कररुपी महसुलातच घट होऊ लागल्याने या सेसच्या रुपाने मिळणाऱ्या महसुलातही घट होणे स्वाभाविक होते. ते कारण पुढे करुन केंद्र सरकारने राज्यांना भरपाई देण्याचे टाळायला सुरुवात केली. म्हणजेच भरपाईच्या रकमेसाठी केंद्रापुढे हात जोडण्याची पाळी राज्यांवर आली आहे. या सेसपोटी वार्षिक तीन लाख कोटि रुपयांचा महसूल केंद्राकडे जमा होण्याचा अंदाज करण्यात आला होता. प्रत्यक्षात त्यापैकी ६५ हजार कोटि रुपयेच जमा होऊ शकतील असे केंद्राचे म्हणणे आहे. म्हणजेच सेसरुपी निधीत दोन लाख ३५ हजार कोटि रुपयांची तूट अपेक्षिण्यात आली आहे. ही कोठून भरुन काढायची हा प्रश्न आहे.


हा एक मुद्दा झाला. जीएसटीच्या भरपाईचे एप्रिल ते जुलै असे चार महिन्यांचे हप्ते केंद्र सरकारने थकविले आहेत. राज्यांनी त्या हप्त्यांची मागणी केली आहे. परंतु केंद्र सरकारकडे तेवढा निधी नसल्याने ते देण्याबाबत केंद्राने






असमर्थता व्यक्त केली आहे. या मुद्यावर राज्यांनी केंद्राकडे पैशाचा लकडा लावला आहे कारण ज्याप्रमाणे केंद्र सरकार करोना साथीचे कारण पुढे करीत आहे त्याहीपेक्षा राज्यांना करोना साथीचे चटके अधिक बसत आहेत कारण प्रत्यक्ष मुकाबला राज्य सरकारे करीत आहेत. केंद्र सरकार नव्हे. त्यामुळे निधीच्या कमतरतेने राज्यांचे प्राण कंठाशी आले आहेत. जवळपास प्रत्येक राज्यावर कर्जाचे बोजे आहेत. या भरपाईसाठीही राज्यांनी कर्ज घ्यावे असा सल्ला केंद्र सरकारने दिल्यावर राज्य सरकारे खवळली आहेत. त्यांना मधाचे बोट लावताना केंद्राने त्यांना यासंदर्भात ते रिझर्व बँकेशी बोलणी




करतील, मध्यस्थी करतील असेही म्हटले आहे. तसेच या कर्जामुळे राज्यांच्या वित्तीय तुटीत वाढ झाली तरी तिला मंजुरी देण्यात येईल असेही सांगण्यात आले. या कर्जाची परतफेड मात्र केंद्र सरकार परस्पर राज्यांना लागू असलेल्या आर्थिक वाट्यातून करील असेही स्पष्ट करण्यात आले. राज्यांनी व विशेषतः विरोधी पक्षांच्या राज्यांनी या योजनेला तीव्र विरोध केला. राज्यांना पूर्णपणे कंगाल व कर्जबाजारी करण्याचे हे कारस्थान असल्याचा आरोपच त्यांनी केला आणि राज्य सरकारे कर्ज काढण्याच्या अवस्थेत नाहीत असे केंद्राला सांगण्यात आले. याऐवजी केंद्र सरकारने स्वतः कर्ज घ्यावे आणि त्यातून राज्यांची भरपाई द्यावी असे त्यांनी सुचविले आहे. यापोटीच्या परतफेडीचे निकषही ठरविण्यात यावेत असेही राज्यांनी सांगितले अन्यथा राज्यांना लागू असलेल्या जीएसटी महसुलातील वाट्यातून परस्पर केंद्राने हप्त्याची रक्कम कापून घेण्याचे ठरविल्यास राज्यांना पुन्हा पैशासाठी केंद्रापुढे गुडघे टेकायला लागेल. यासंदर्भात आता केंद्र सरकार कोणती भूमिका घेते यावर पुढील गोष्टी अवलंबुन राहतील.

या वादातून जीएसटी प्रणालीबाबत काही प्रश्न

उपस्थित होऊ लागले आहेत. जीएसटी प्रणाली मुळे राज्यांच्या आर्थिक अधिकारांचा संकोच झाला आहे हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. जीएसटीमुळे 'एक देश - एक बाजार - एक कर' प्रणाली लागू करण्यात आली. म्हणजेच केंद्रातर्फे राज्यांनी कर गोळा करायचा आणि त्यानंतर ठरविण्यात आलेल्या निकषानुसार राज्यांना त्याचे वाटप करायचे हे सूत्र मान्य करण्यात आले होते. थोडक्यात करविषयक राज्यांचे अधिकारच संपुष्टात आले. केवळ चारच विषय राज्यांच्या अधिकारात ठेवण्यात आले. त्यात पेट्रोल-डिझेल, अल्कोहोल, स्टँप ड्यूटी आणि वीजदर यांचा समावेश होता. याद्वारे राज्य सरकारे स्वतंत्र उत्पन्न मिळवू शकतात असे ठरविण्यात आले होते. परंतु पेट्रोल-डिझेलवर केंद्र सरकारनेच अशी शुल्के लागू करुन ठेवली की राज्यांना त्यात फारसा वाव राहिला नाही.






थोडक्यात राज्यांचे उत्पन्नाचे मार्गच रोखून त्यांना केंद्रावर अधिकाधिक परावलंबी करण्याचा हा प्रकार सुरु झाला. एकप्रकारे या प्रणालीमुळे राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेवर बहुतांशाने अंकुश लागला गेला आहे. त्यामुळेच मतभेद - वाद आणि त्यातून पुढे केंद्र-राज्य संघर्ष अशाच वाटचालीची शक्यता दिसू लागली आहे. हे संघर्ष अधिक टोकदार होऊ शकतात. त्यामुळेच या निमित्ताने तोडग्यावरही विचार करण्याची वेळ आली आहे. अन्यथा हे संघर्ष अर्थव्यवस्थेला व देशाला महागात पडतील. त्याचबरोबर संघराज्य पध्दतीत विकेंद्रीकरणाला प्राधान्य असते. केंद्रीकरणातून संघराज्य पध्दतीवरही ग्रहण येऊ शकते. त्यामुळेच या वादात लवकरात लवकर मध्यम मार्ग काढून राज्यांची गरज प्राधान्याने भागविण्यासाठी केंद्र सरकारला प्रसंगी पडती बाजू घेण्याची तयारीही ठेवावी लागेल आणि ती त्यांनी न घेतल्यास संघर्ष अटळ ठरेल.

जीएसटीचे राज्यांचे पैसे देण्यासाठी केंद्राकडे निधी नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील अर्थव्यवस्थेच्या स्थितीची आकडेवारी जाहीर झाली आहे. त्यात विकासदरात चोवीस टक्के कपात झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. सुदैवाने यावेळी सरकारने त्यात फारशी लपवालपवी






केलेली आढळत नाही. अर्थात ही दारुण आकडेवारी सरकारच्या पथ्यावर पडणारी असल्याने त्यात सरकारने प्रामाणिकपणाचा आव आणलेला आहे. या आकडेवारीनंतर पुढे काय असा स्वाभाविक प्रश्न निर्माण होतो. करोना साथ, त्यामुळे लादण्यात आलेली टाळेबंदी आणि त्या टाळेबंदीमुळे अर्थव्यवस्थेचे जे अपरिमित नुकसान झाले ते भरुन काढण्याबाबत सरकारी म्हणजेच राज्यकर्त्यांच्या पातळीवर कोणत्या उपायायोजनांचा विचार केला जात आहे याबाबत अद्याप अस्पष्टता आहे.









राज्यकर्त्यांच्या तोंडातून केवळ एकाच शब्दाचा जप ऐकायला मिळत आहे आणि तो म्हणजे 'आत्मनिर्भर भारत'! स्वावलंबी भारत ही संकल्पना आदर्श आहे आणि कोणत्याही देशभक्त, राष्ट्रवादाने भारलेल्या व्यक्तीला त्याचा अभिमानच वाटेल. परंतु ज्या वर्तमान जगात प्रमुख देशांच्या अर्थव्यवस्था एकमेकाशी जोडल्या गेलेल्या अवस्थेत असताना आणि भारतानेही आर्थिक उदारीकरणानुसार अर्थव्यवस्था खुली केलेली असताना अचानक घड्याळ थांबवून काटे मागे फिरविण्यास सुरु करणे हा प्रकार आत्मघाती ठरु शकतो. परंतु सध्या आत्मनिर्भरतेचा मंत्र हा अधिक प्रभावी आणि उच्चरवाने सुरु आहे. लोकांच्या मनावर तो ठसविण्याचे प्रयत्न, प्रचार व प्रसार सुरु करण्यात आलेला आहे व त्यासाठी प्रचारयंत्रणांना सक्रिय करण्यात आले आहे. त्यामुळेच भारतीय खेळणी निर्मितीला चालना

देण्यापासून लोकांनी परदेशी जातीच्या कुत्र्यांऐवजी देशी कुत्री खरेदी करण्याचे आवाहन केले जात आहे. परंतु अर्थव्यवस्थेला पूर्वपदावर आणण्यासाठी सरकार कोणत्या उपाययोजना करु इच्छित आहे याचा उल्लेख आढळत नाही. करोना साथ आणि लॉकडाऊनच्या घोषणेनंतर अर्थमंत्र्यांनी वीस लाख कोटि रुपयांच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उपाययोजनांचे तथकाथित 'पॅकेज' जाहीर केले होते. प्रत्यक्षात ते 'पॅकेज' म्हणजे अर्थसंकल्पातील विविध घोषणांचे संकलन असल्याचे उघडकीस आले आणि केवळ सव्वा लाख कोटि रुपयांच्या उपाययोजनाच





नव्या असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतरच्या काळात त्या योजनांवर काय अंमलबजावणी झाली हे कुणालाच कळलेले नाही. परंतु भारतीय उद्योगांना निरनिराळी आवाहने करणारी भाषणे केवळ ऐकायला मिळाली. लॉकडाऊन किंवा टाळेबंदीमुळे उद्योग व्यवसाय बंद पडले. परंतु ते पुन्हा चालू होण्याचे काय ? संघटित क्षेत्राच्या पुनरुज्जीवनातही अडथळे येत असताना सुमारे ७५ ते ८० टक्के असंघटित क्षेत्राची पुरती वाट लागणे अटळ होते. असंघटित उद्योग-व्यवसायातील कष्टकरी हे लॉकडाऊनमुळे आपापल्या गावांकडे परतले आणि बेकार झाले. या परिस्थितीत 'मनरेगा' सारख्या

योजनांची अंमलबजावणी गतिमान करण्याची आवश्यकता होती परंतु ते घडले नाही. या योजनेखाली लोकांना कामेच मिळू शकली नाहीत अशा असंख्य तक्रारी येऊ लागल्या. यानंतर लॉकडाऊन मागे घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आणि पुन्हा एकदा कष्टकऱ्यांना त्यांच्या कामाच्या व रोजगाराच्या ठिकाणी म्हणजे शहरांकडे परतण्याचे आवाहन करण्यात आले. परंतु जोपर्यंत बाजाराला गति मिळत नाही



आणि त्यासाठी बाजारात मागणी निर्माण होत नाही तोपर्यंत हे कष्टकरी पुन्हा शहरांकडे परतून काही उपयोग होणार नाही.

करोनाची साथ आटोक्यात येत आहे असे चित्र तूर्तास तरी दिसत नाही. केंद्र सरकारने सुरुवातीच्या काळात श्रेय घेण्याच्या स्पर्धेत लॉकडाऊन केले. त्याचे जे दुष्परिणाम व्हायचे ते झालेच आहेत. परंतु ही साथ हाताबाहेर जात असल्याचे पाहिल्याबरोबर केंद्र सरकारने त्यातून आपले अंग काढून घेतले आणि या साथीचा मुकाबला करण्याची जबाबदारी राज्यांवर टाकून ते मोकळे झाले. फक्त गाइडलाइन्स जारी करण्यापुरता केंद्र सरकार म्हणजेच केंद्रीय गृह मंत्रालय आपला अधिकार वापरु लागले. परंतु या आपल्या तुटपुंज्या आणि मर्यादित साधनसंपत्तीच्या आधारे राज्य सरकारे या साथीचा मुकाबला करीत राहिली. या परिस्थितीतच जीएसटीच्या थकबाकीपोटी राज्यांना द्यावयाच्या रकमेचा प्रश्न अधिक ज्वलंत व बिकट झालेला आहे. या साथीचा प्रभावी मुकाबला करावयाचा असेल तर केंद्र सरकारने कसेही करुन राज्यांना जीएसटीची त्यांना देणे असलेली थकबाकी त्वरित देणे अत्यावश्यक झाले आहे. यासाठी पक्षपाती व भेदभावाचे धोरण केंद्र सरकारने अवलंबिल्यास तो लोकद्रोह होणार आहे. त्यामुळे केंद्र सरकार आणि राज्यकर्ते त्यांच्या संकुचित पक्षपाती राजकीय लाभाला प्राधान्य देणार की लोकहिताला याचा निर्णय होण्याची घडी आली आहे. एकीकडे पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या बिगरसरकारी 'पीएमकेअर्स फंड' नावाच्या निधीत गेल्या पाच महिन्यात जवळपास दहा हजार कोटि रुपये जमा केले जातात ते कशासाठी हा प्रश्न निर्माण होतो. परंतु राज्यांना पैसे देताना ठणठण गोपाल केला जात आहे. त्यातही मुख्य प्रश्न उरतोच. करोनाची साथ ही गेल्या पाच महिन्यातील आहे. अर्थव्यवस्थेची घसरण त्याच्या आधीपासूनच चालू झालेली होती. या घसरणीचे मूळ नोटाबंदीत आहे. त्याला गति सदोष जीएसटी प्रणालीमुळे मिळाली आणि राष्ट्रीय टाळेबंदी उर्फ लॉकडाऊनमुळे अर्थव्यवस्था पुरती खड्ड्यात गेली. त्यामुळे करोना साथीमुळे नव्हे तर वर्तमान राज्यकर्त्यांच्या सातत्याने अमलात आणल्या गेलेल्या लहरी आर्थिक धोरणांमुळे आज देश आर्थिक दिवाळखोरीच्या स्थितीला आला आहे. अर्थतज्ज्ञांनी या स्थितीत आणखी वर्षभर तरी सुधारणा होण्याची शक्यता नसल्याचे भाकित केले आहे. एवढेच नव्हे तर या दिवाळखोरीचे पडसाद त्यापुढील काही काळ चालू राहतील असाही तज्ज्ञांचा अंदाज आहे. बहुधा दिवाळखोरांना याचा अंदाज आला असावा म्हणूनच आता चीनबरोबरचा संघर्ष, करोनाचे संकट यांचे भांडवल करण्याचा प्रकार सुरु झालेला आहे. पुन्हा एकदा लोकांची दिशाभूल आणि त्यांना संभ्रमित करुन देशभक्ति व राष्ट्रवादाच्या नशेचे इंजेक्शन देण्याच्या हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. म्हणूनच हा देश व देशाची अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने 'राम भरोसे' झाली आहे!





Best Compliments



Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.
CBSE व ICSE शाळा
जिमखाना
• CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
Call: 020-67275300 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
MAGARPATTA CITY

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त विशेष लेख**




# लोकमान्यांचे अर्थचिंतन

**अभय टिळक** नामवंत अर्थतज्ज्ञ

**भारतीय शेती आणि तिचे खडतर बनलेले अर्थकारण यांची नाळ देशी अर्थकारणात प्रदीर्घ काळ मुरलेल्या अनेकविध असमतोलांशी जुळलेली आहे. केवळ शेतीच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून भागणारे नाही. भारतीय शेती आणि शेतकरी यांचे अर्थकारण ऊर्जितावस्थेकडे नेण्यासाठी शेतीइतकेच बिगर शेती क्षेत्रांतही सुधारणांचे प्रयत्न येत्या काळात एकवटावे लागतील, हा खरा धडा आपल्याला या सगळ्या उहापोहाद्वारे शिकावा आणि गिरवावा लागणार आहे.**

रूढ अर्थाने बोलायचे झाले तर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे काही अर्थतज्ज्ञ अथवा अर्थवेत्ते नव्हते. ते उत्तम गणिती होते, ही बाब सर्वख्यात आहे. मुळात, गणिती डोके असलेल्या कोणत्याही व्यक्तीची बुद्धी तर्कशुद्ध विचार करते. लोकमान्यही त्याला अपवाद असण्याचे कारण नाही. त्यांमुळे, त्यांच्या काळात उद्भवलेल्या नानाविध आर्थिक प्रश्नांचा मागोवा टिळक तर्कशुद्धपणे घेताना दिसतात. पत्रकारितेच्या प्रांतात असणाऱ्या आणि संपादकाच्या खुर्चीमध्ये बसलेल्या व्यक्तीला, 'अमुक एक विषय माझा नाही आणि म्हणून त्या विषयाबाबत मी लेखणी चालविणार नाही', अशी आवडनिवड व्यक्त करण्याची चैन कधीच परवडणारी नसते. त्यांतही पुन्हा, संपादक हा लोकशिक्षक असतो, ही भावना










व्रतस्थपणे जपणाऱ्या कोणाही संपादकाला, समोर आलेल्या विषयासंदर्भात समाजाचे प्रबोधन करण्याचा वसा उतता-मातता येत नसतो. लोकमान्यांच्या काळातील जवळपास सगळेच पत्रकर्मी त्याच भावनेने पत्रकारितेच्या प्रांतात कार्यरत राहिले.

तो काळ होता पारतंत्र्याचा. 'केसरी' आणि 'मराठा' या अनुक्रमे मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांचे संपादन लोकमान्य करत होते तेव्हा ब्रिटिश अंमल हिंदुस्थानामध्ये चांगल्यापैकी स्थिरावलेला होता. इंग्रजी अंमल म्हणजे एतद्देशीय समाजावर झालेली थोर ईश्वरी कृपाच होय, ही लोकभावना लोकमान्यांच्या काळापर्यंत बव्हंशी ओसरलेली होती. १८८१ साली मराठी पत्रकारितेच्या विश्वात 'केसरी'चा उदय झाला त्या वेळी, ब्रिटिशांनी चालविलेल्या हिंदुस्थानच्या लुटीबाबतचा सिद्धांत दादाभाई नवरोजी यांनी मांडल्याला चांगली १४ वर्षे उलटून गेलेली होती. साहजिकच, ब्रिटिश राज्यकर्त्यांची राजकीय, व्यापारविषयक तसेच आर्थिक धोरणे, त्या धोरणांमागील शासनकर्त्यांचा सुप्तासुप्त हेतू आणि त्यांचे संभाव्य परिणाम या संदर्भात इथल्या समाजधुरिणांमध्ये चांगल्यापैकी जागरूकता नांदायला लागलेली होती. लोकजागृतीसाठीच प्रवर्तित करण्यात आलेल्या 'केसरी' सारख्या वृत्तपत्राने, त्यांमुळे, ब्रिटिश शासकांच्या व्यापारी, औद्योगिक तसेच आर्थिक धोरणांकडे चिकित्सक दृष्टीने बघावे, हे ओघानेच आले. आर्थिक-औद्योगिक बाबींसंदर्भात लोकमान्यांनी प्रसंगोपात्त केलेल्या लेखनाची गंगोत्री इथे सापडते.

सर्वसामान्य वाचकाच्या अर्थसाक्षरतेची इयत्ता वृत्तपत्रासारख्या माध्यमातून उंचावण्याचा प्रयत्न करणाऱ्या संपादकावर दोन बंधने पडतात. त्यांतील एक बंधन अर्थातच असते ते शब्दसंख्येच्या मर्यादेचे. दुसरे बंधन त्याहीपेक्षा अधिक गहिरे शाबीत होते. ते म्हणजे, सर्वसामान्य वाचकांच्या क्षमतेचा लघुत्तम अथवा महत्तम साधारण विभाजक ध्यानात घेऊन त्यांनुसार प्रतिपाद्य विषयाची मांडणी करणे लेखकाला अथवा संपादकाला भाग पडते. परिणामी, चर्चाविषय



असलेले कोणतेही आर्थिक अथवा औद्योगिक घटित कितीही गुंतागुंतीचे असले तरी त्याचे सर्वांना समजेल असे ढोबळ, सुलभ रूपच वर्तमानपत्रातून मांडावे लागते. उपलब्ध जागेची मर्यादा लक्षात ठेवत, त्या समस्येचे काहीच मुख्य पैलू लेखनामध्ये हाताळता येतात. हे करत असतानाच विवेचनाची भाषादेखील फार बोजड, तांत्रिक संकल्पना व पारिभाषिक संज्ञांनी क्लिष्ट बनणार नाही, याचीदेखील काळजी संपादकाला घ्यावी लागते. केसरीच्या माध्यमातुन लोकमान्यांनी वेळोवेळी केलेल्या अर्थविषयक लेखनाचा आलेख न्याहाळत असताना या पैलूंचे उचित भान आपल्याला राखावे लागणार आहे.

तत्कालीन आर्थिक-औद्योगिक विषयांसंदर्भात लोकमान्यांनी वेळोवेळी केलेले लेखन, 'केसरी प्रकाशना'ने प्रकाशित केलेल्या 'समग्र लोकमान्य टिळक' या ग्रंथमालिकेतील तिसऱ्या खंडामध्ये आपल्याला एकत्रितपणे पाहावयास सापडते. लोकमान्यांचे राजकीय लेख या तिसऱ्या खंडामध्ये समाविष्ट केलेले आहेत. या खंडामध्ये शिक्षण, शेती व शेतकरी, खोतांचे हक्क, दुष्काळ निवारण, आर्थिक धोरण आणि औद्योगिक विकास या ढोबळ उपशीर्षकांखाली संग्रहित केलेल्या लेखनामध्ये लोकमान्यांचे अर्थचिंतन शब्दबद्ध झालेले दिसते. टिळकांनी वेळोवेळी हाताळलेल्या



अर्थसंलग्न विषयांचा पैस बराच विस्तृत आहे. धंदेशिक्षण, शेतीशिक्षण, जमीन महसूल, जमीन महसुलाशी संबंधित कायदा, त्यांतील सुधारणा आणि त्या सुधारणांचे शेतकरी वर्गावरील संभाव्य भलेबुरे परिणाम, खोतीसंदर्भातील कायदा, दुष्काळ व त्या संदर्भातील सरकारी धोरणांची चिकित्सा, दुष्काळाच्या फेऱ्याची कारणमीमांसा, हिंदुस्थानातील गरिबी, सरकारचा जमाखर्च व अंदाजपत्रक, विनिमय दर, हिंदुस्थानचा औद्योगिक विकास व त्या संदर्भातील

शासकीय धोरणांची सुक्तासूक्तता...अशांसारखे विविध पैलू लोकमान्यांनी चर्चिलेले दिसतात. हे सगळे लेखन मुख्यतः केसरीच्या अग्रलेखांद्वारे प्रकाशित झालेले आहे. विषयाचा विस्तार व त्यातील गुंतागुंत यानुसार, प्रसंगी, एकच विषय एकापेक्षा अधिक अग्रलेखांमधूनही मालिकेच्या स्वरूपात विवरण करून मांडला आहे.

## पूर्वसुरी आणि प्रेरणा

पृष्ठसंख्येचा विचार करता, लोकमान्यांच्या अर्थविषयक लेखनाने तिसऱ्या खंडाच्या एकंदर साडेनऊशे पानांपैकी जवळपास चांगली साडेचारशेच्या आसपास पाने व्यापलेली









आहेत. आर्थिक विषयांची चर्चा वर्तमानपत्रातील अग्रलेखासारख्या माध्यमातून करत असताना, बरीचशी शब्दसंख्या प्रथम चर्चाविषय सर्वसामान्य वाचकाला नीट समजावून देण्यातच खर्ची पडते. अग्रलेखाच्या उरलेल्या भागात मग प्रतिपाद्य विषयासंदर्भात संपादकाचे मत अथवा त्याची चिकित्सा सादर होते. लोकमान्यांचे अर्थविषयक लेखनही या सर्वसाधारण परिपाठाला अपवाद नाही. अर्थविषयक मुद्यांना सार्वजनिकरीत्या तोंड फोडून त्यांची चर्चा करण्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांची अर्थसाक्षरता सक्षम करण्याच्या प्रयत्नांमध्ये लोकमान्यांचे मुख्य पूर्वसुरी ठरतात ते महात्मा जोतीराव फुले. विशेषतः हिंदुस्थानातील शेतकऱ्यांच्या दुःसह स्थितीचे चित्रण विलक्षण प्रत्ययकारी शब्दांत मांडत एकंदरच ग्रामीण भागांची परवड जोतीरावांनी सरकारच्या आणि पर्यायाने समाजाच्या पुढ्यात मांडली.

शेती, शेतीसुधारणा, शेतीसुधारणांची गरज, शेतीविषयक सुधारणांचे अपेक्षित स्वरूप, शेतकऱ्यांची दुःसह स्थिती हे विषय लोकमान्यांच्या अर्थविषयक लेखनामध्ये


वारंवार या ना त्या स्वरूपात चर्चिले गेलेले दिसतात. नेमक्या याच बाबींकडे ब्रिटिश शासन दुर्लक्ष करत असल्याची खंतवजा तक्रार लोकमान्यांच्या अर्थविषयक लेखनात अनेक ठिकाणी प्रकर्षाने व्यक्त झालेली दिसते. या संदर्भात, 'शेतकऱ्यांस हलक्या व्याजाने पैसे कसे देता येतील, ते जे पीक काढितात तें कशा रीतीने वाढविता येईल, जमिनीची मशागत जास्त चांगली करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगांत कशाने येईल, अथवा त्यांस शास्त्रीय शोध समजण्याइतके शिक्षण कशाने देतां येईल, इत्यादि गोष्टी महत्त्वाच्या असतांहि सरकारचे तिकडे लक्ष गेलेले नाही. गेल्या २० वर्षांतील रेल्वेची वाढ पाहिली तर ती ९००० मैलांपासून २७००० मैलांपर्यंत झालेली आहे, व त्याकरितां जवळ जवळ ४५० कोट रुपये खर्च झालेला आहे पण त्याच्या ततीयांश देखील पाटबंधाऱ्यांवर किंवा कालव्यांवर खर्च झालेले नाहीत. लॉर्ड कर्झन यांनी दाखविलेले आंकडे खरे धरले तरी, गेल्या २० वर्षांत हिंदुस्थानांत नांगराखाली असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ सुमारे २ कोटि ३० लक्ष एकर वाढलेले आहे. परंतु ही वाढ इतकी नसतां यापेक्षा बरीच कमी असावी, असें डिग्बी यांचे म्हणणे आहे. ही वाढ लोकसंख्येच्या वाढीच्या मानाने पाहिले असतां फार आहे असें नाहीं; कारण सन १८८०-८१ साली लोकसंख्या सुमारे २० कोट होती ती गेल्या खानेसमारीत जवळ जवळ २८ ॥ कोट झालेली आहे. म्हणजे माणसांची वाढ ८॥ कोट आणि एकरांची वाढ २। कोट असा हिशोब पडतो..', हे त्यांनी २८ मार्च १९०२ रोजी लिहिलेल्या अग्रलेखात मांडलेले विश्लेषण मार्मिक ठरते. सिंचनसुविधांच्या विस्ताराकडे सरकारचे झालेले दुर्लक्ष हे तत्कालीन धोरणाचे एक मुख्य वैगुण्य असल्याचा जो मुद्दा लोकमान्य तेव्हा मांडत होते, त्याची प्रस्तुतता आजही उणावलेली नाही.

ब्रिटिश अमदानीत मुख्यतः शेतीप्रधान असलेल्या हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारल्याखेरीज या देशातील गरिबीच्या प्रश्नावर तोडगा निघणे अशक्य आहे, याची सार्थ जाणीव त्या काळातील सर्वच धुरीणांना होती. शेतीमध्ये राबणाऱ्या शेतकऱ्याची आर्थिक स्थिती शेतीची उत्पादकता आणि पर्यायाने उत्पादन वाढल्याखेरीज सुधारणे शक्य नाही, याचीही कल्पना सगळ्यांच लोकनेत्यांना होती. त्या दृष्टीने, शेतकऱ्यांना तगाईकर्जे उपलब्ध करून देणे, सिंचनाची सोय करणे, चांगल्या प्रतीचे बी-बियाणे मिळण्याची व्यवस्था करणे यांसारख्या पारंपरिक उपायांचा अंगीकार ब्रिटिश शासनकर्त्यांनी करावा, अशी मागणीही वारंवार उठवली जात असे. परंतु, याच्याच जोडीने, शेतीमध्ये उत्पादन होत असलेल्या शेतमालावर प्रक्रिया करवून आणत शेतकऱ्याच्या हातात चार पैसे अधिक पडावेत या









दिशेने शेतीसुधारणांचा मोहरा वळवला जाणे अत्यावश्यक असल्याचा मुद्दा लोकमान्य मांडताना दिसतात. 'शेतीची सुधारणा म्हणजे नुसत्या पिकाची सुधारणा नव्हे, तर त्या पिकापासून पुढे जो माल तयार होतो तो माल तयार करण्याचेहि कारखाने या देशांत निघाले पाहिजेत. उदाहरणार्थ, उसाच्या पिकाची सुधारणा झाल्यास त्याबरोबर साखर तयार होणाऱ्या कारखान्यांचीहि अभिवृद्धि झाली पाहिजे. किंवा रबराचा चीक येथे तयार झाल्यास रबराच्या वस्तूंचे कारखानेहि येथे निघाले पाहिजेत...", हे लोकमान्यांनी २२ ऑक्टोबर १९०३ रोजीच्या अग्रलेखात मांडलेले त्या संदर्भातील प्रतिपादन लक्षणीय ठरते. शेतमालावर प्रक्रिया करून शेतकऱ्याच्या पदरात वाढीव मूल्य घालण्याचा पर्याय आजही तितकाच लागू होतो, ही बाब या ठिकाणी अधोरेखित करावयास हवी.

शेतमालावर प्रक्रिया करून शेतकऱ्याच्या खिशात चार पैसे अधिक जमा करण्याचा पर्याय तर्कशुद्ध असला तरी, व्यवहारात, त्या दिशेने करावयाच्या प्रयत्नांची सुरुवात पिकांच्या वाणात सुधारणा घडवून आणण्यापासून करणे भाग पडते. कारण, शेतीमध्ये पिकणारा माल प्रक्रियायोग्य असेलच याची हमी बरेचदा देता येत नाही. या एका सूक्ष्म परंतु महत्त्वाच्या मुद्याकडे लोकमान्य २८ मार्च १९०२ रोजीच्या अग्रलेखाद्वारे सगळ्यांचेच लक्ष वेधतात. हल्ली कापसाच्या गिरण्यांतून जी यंत्रे असतात त्यांत इकडील कापसाचा बारीक धागा निघत नाही. परंतु कापसाच्या लागवडीत सुधारणा झाल्यास लांब धाग्याचा कापूस इकडे उत्पन्न होऊन जवळ जवळ २० कोट रुपयांचा विलायती माल खपण्याचे बंद होईल. आमच्या देशांतील कापसापासून यंत्राने बारीक सूत




कसे काढणे किंवा कापसाच्या लागवडीची सुधारणा करून लांब धाग्याचा कापूस उत्पन्न कसा करावा, या एका प्रश्नाचा पुरा शोध होऊन निकाल लागल्यास त्यापासून देशाचें केवढे हित होईल, हे यावरून लक्षात येईल. हा प्रश्न सरकारच्या व लोकांच्या डोळ्यांपुढे नाहीं असें नाही. अमेरिकन कापसाची इकडे लागवड करण्याबद्दल सरकारने पहिल्याने काही खटपट केली होती; पण ती जितक्या नेटाने चालवावयास पाहिजे होती तितकी चालविली गेली नाही. मि. टाटा यांनी इजिप्त देशांतील कापसाची इकडे लागवड करण्याबद्दल काही दिवसांपूर्वी सूचना केली होती, पण त्यांचे पुढे काय झाले हे कळत नाही. अलीकडे कानपूर येथे लांब धाग्याच्या कापसाची लागवड करण्यासंबंधाने प्रयत्न करून अनुभव घेतला. त्यावरून तशी लागवड होणे शक्य आहे असे दिसून आल्याचे समजतें; पण त्याबद्दल आजच कांहीं खात्री सांगता येत नाही. कसेंहि असो, हा प्रश्न इतका महत्त्वाचा आहे की,

त्याची पिच्छा आम्ही सोडून उपयोगी नाही. इजिप्त देशांत कापसाची जर सुधारणा झाली तर हिंदुस्थानांत तशी सुधारणा कां होऊ नये, हे आम्हांस समजत नाही. मात्र सरकारने, संस्थानिकांनी व लोकांनी या कामांत आपल्या यत्नाची पराकाष्ठा केली पाहिजे...", अशा शब्दांत लोकमान्यांनी या पैलूचे सादर केलेले आग्रही प्रतिपादन आजही कालबाह्य झालेले नाही.



शेती अथवा/आणि उद्योगधंद्यांसारख्या उत्पादक व्यवसायांमध्ये गुंतलेल्यांचे शिक्षण-प्रशिक्षण सतत चालू राहण्याची संस्थात्मक व्यवस्था करणे, हा उत्पादकता सरासरीने वाढविण्याच्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा पैलू ठरतो. त्या दिशेने प्रयत्न करत असतानाच, शेतीविषयक शिक्षण आणि उद्योगधंद्यांचे प्रशिक्षण या संदर्भात केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची सांगड परस्परांशी घातलेली असावयास हवी, याचे पुरेसे भान व्यवहारात राखले जातेच असे नाही. शेतीशिक्षण आणि धंदेशिक्षण यांचा अन्योन्य संबंध नेमका का व कसा आहे, यांकडे सरकारचे व पर्यायाने सगळ्या समाजाचेच लक्ष वेधताना लोकमान्यांनी ७ जून १९०४ रोजीच्या अग्रलेखात व्यक्त केलेले विचार आजही तितकेच मननीय ठरतात. लोकमान्यांच्या प्रतिपादनानुसार, कृषिशिक्षण व धंदेशिक्षण यासंबंधाने एक गोष्ट वारंवार कितीहि सांगितली असतां पुरे होणार नाही. ती अशी की, या बाबतीत बहुतेक जबाबदारी निदान हे शिक्षण यथाप्रमाण देण्याचा उपक्रम करण्याची जबाबदारी तरी सरकारची आहे. हिंदुस्थानांतील शेकडा ऐंशी इतकी लोकसंख्या शेतकीवर निर्वाह करणारी आहे, असे जर ठरलें आहे तर, ही एवढी लोकसंख्या शेतकीच्या उद्योगावरच येऊन कां पडली व ती तशी पडल्यावर तिच्या तरणोपायास मार्ग कोणता याचा विचार, ज्या सरकारच्या गंगाजळींतील मुख्य घटक शेतकऱ्याचा पैसा हा होय, त्यानेच करावयास पाहिजे. कृषिशिक्षण व धंदेशिक्षण यांचा निकट संबंध असा येतो की, कृषिशिक्षणाचा हेतु हाती असेल तेवढ्या जमिनीत चांगले व पुष्कळ धान्य कसे पिकवावें हा होय, व धंदेशिक्षणाचा हेतु देशांतील उद्योगधंदे वाढवून शेतकीच्या ओघांत सांपडून दुर्दशेकडे वहात जाणाऱ्या जितक्या लोकांस परावृत्त करता येईल तितक्यांस वांचविणे हा आहे..." शेतीविषयक शिक्षण आणि व्यावसायिक अथवा धंदेशिक्षण यांच्या आंतरसंबंधांबाबत लोकमान्यांनी मांडलेले हे विश्लेषण आज संदर्भहीन झालेले आहे, असे आपण म्हणू शकतो का ?


अल्पभूधारक आणि/अथवा अत्यल्प भूधारक शेतकरी व्यावसायिकांचे एकंदर शेतकरी वर्गामध्ये असलेले अत्यंत मोठे प्रमाण, हा आपल्या देशातील कृषिविकासाच्या प्रयत्नांमध्ये जाणवणारा एक प्रमुख अडथळा शाबीत होतो. शेती कसणाऱ्या दर शेतकरी कुटुंबामागे उपलब्ध असलेल्या सरासरी लागण क्षेत्राचा आकार सातत्याने आकुंचन पावत राहिला तर, जमिनीचा तो अल्पस्वल्प तुकडा



कसत राहणे शेतकऱ्याला उत्तरोत्तर आतबट्ट्याचे ठरूलागते. एक तर, मुळात लागण क्षेत्रच कमालीचे मर्यादित असल्याने शेती कसण्याच्या नवनवीन यंत्रतंत्रांचा अंगीकार करणे अल्प व

अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्याच परवडत नाही. साहजिकच, या गटातील शेतकऱ्यांची सरासरी उत्पादकता (एक एकक क्षेत्रावर निर्माण होणारे उत्पादन) रोडावलेली राहते. मुदलात, उत्पादकताच कुपोषित राहिल्याने त्याचा






प्रतिकूल परिणाम साहजिकपणेच जाणवतो तो शेतीमधून मिळणाऱ्या एकंदर उत्पादनावर. जमीन कसून पदरात पडणारे एकंदर उत्पादनच सीमित राहिल्याने, अन्नधान्याची घरची गरज भागवून मग बाजारात नेऊन विकण्यासारखा जो काही विक्रीयोग्य वाढावा अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यापाशी उरतो तो विकून हातात येणारे उत्पन्नही दुर्बळच राहते. जे काही तुटपुंजे उत्पन्न शेतीद्वारे मिळते त्यांत बचत करून पुन्हा शेतीमध्ये गुंतवणूक करण्याचे वित्तीय बळच या गटातील शेतकऱ्यांपाशी उरत नाही. गुंतवणुकीअभावी जमिनीची सरासरी उत्पादकता कुपोषित राहते...आणि या दुष्टचक्रापासून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्याची सुटकाच कधी होत नाही. साहजिकच, या गटातील शेतकऱ्यांना वेढून बसलेला आर्थिक हलाखीचा पाशही ढिला होण्याच्या आशा मंदावतात. भारतीय शेतकऱ्याचे हे असे कठोर व दुष्कर भागधेय आजचे नाही. ते वर्षानुवर्षे तसेच टिकून राहिलेले आहे.

ब्रिटिश अंमलाखालील हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची स्थिती नेमकी अशीच होती. ७ जून १९०४ रोजी लिहिलेल्या अग्रलेखामध्ये, लोकमान्य, बरोबर याच वास्तवाकडे सरकारचे लक्ष वेधतात. शेतकऱ्यांच्या याच वर्गाची गाऱ्हाणी जोतीराव फुले यांनी रोखठोक भाषेमध्ये प्रथम मांडली. लोकमान्यांच्या विश्लेषणानुसार, अमेरिकेतील लोक मुख्यतः धंदेवाईक असून, ते शेतकीवर हिंदुस्थानांतील लोकांइतके अवलंबून नाहीत. असे असून शिवाय व्यक्तिशः शेतकऱ्यास मोठ्या प्रमाणावर शेतकी करण्याचे जसें साधन त्यास आहे तसें हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांस नाही. हजारों एकर ज्यांच्या खात्यास लागलेले आहेत असे शेतकरी किंवा शेतकऱ्यांच्या कंपन्या अमेरिकेंत अनेक सांपडतील. उलटपक्षी हिंदुस्थानांत ज्याच्या खात्यास पन्नास एकर लागले आहेत व त्या पन्नास एकरांची लागवड करण्याचे सांप आहे असे शेतकरी किती



निघतील, याचा ज्याचा त्यानेच विचार करावा. हाती उणेपुरे पांच-चार एकरहि नाहीत व पदरी खाणारी माणसें दहापांच, अशी स्थिति हिंदुस्थानांतील शेतकरीवर्गांत प्रायः आढळून येईल. विशेषतः पूर्वीच्या अमदानींत एका जमिनीच्या मालकी-हक्कामुळे ज्यास चराईंचे रान असेल तेथे पाटाचे पाणी व डोंगरकपारीतील मीठ वगैरे अत्यावश्यक जिनसा फुकट मिळत व जमिनीतील निधिनिक्षेपाची ऊबहि ज्यांस थोडीबहुत मिळे अशा पूर्वीच्या शेतकऱ्यांची चोहों बाजूंनी नाडलेल्या आणि सत्त्वहीन होत चाललेल्या जमिनीच्या पृष्ठभागाखेरीज ज्यास दुसरें उपजीविकेचे साधन राहिलेले नाही, अशा हल्लीच्या शेतकऱ्यांची तुलना केली असतां, शेतकी किती कठिण झालेली आहे याची कल्पना होईल. अशा स्थितीत हाती असलेल्या टीचभर जमिनीचीच लागवड करून शेतकरी आपला चरितार्थ चालविण्यास समर्थ होईल, असें शिक्षण त्यास देणे जरूर आहे...". शेतकऱ्यांना उपयुक्त व ते ज्या वास्तव परिस्थितीचा सामना करत शेती कसत आहेत त्या वास्तवाशी सुसंगत असे शेतीविषयक शिक्षण देण्याची गरज प्रतिपादन करत असताना, लोकमान्य, अशा शिक्षणाची व्यावहारिक चौकट किती तपशीलवार रेखाटतात, त्याचा प्रत्यय या ठिकाणी येतो.

इथे उद्धृत केलेला लोकमान्यांचा हा उतारा १९०४ सालातील, म्हणजे, जवळपास १२५ वर्षांपूर्वीचा आहे. भारतामधील शेतीचे या संदर्भातील आजचे चित्र नेमके दिसते तरी कसे, अशी उत्सुकता कोणासही वाटे. २०१५-१६ या वर्षात आयोजित करण्यात आलेल्या कृषिगणनेद्वारे हाताशी आलेली जी आकडेवारी आता उपलब्ध झालेली आहे तिचे अंतरंग न्याहाळून पाहणे या संदर्भात मननीय आणि तितकेच उदबोधक ठरावे. शेती कसणाऱ्या दर शेतकरी कुटुंबामागे आपल्या देशात सरासरीने किती लागण क्षेत्र २०१५-१६ या वर्षात होते, याची या गणनेद्वारे प्रकाशित झालेली सांख्यिकी आकडेवारी मोठी चिंतनीय, चिंताजनक आणि शोचनीय अशीच दिसते. या पाहणीनुसार, देशातील दर शेतकरी कुटुंबामागे २०१५-१६ या वर्षांत सरासरीने अवघे १.०८ हेक्टर इतकेच काय ते लागण क्षेत्र होते. देशातील शेतीक्षेत्राचे व्यावहारिक दर्शन घडविणारी ही कृषिगणना आपल्याकडे दर पाच वर्षांनी आयोजित करण्यात येते. त्या नुसार, २०१०-११ या वर्षात घेण्यात आलेल्या कृषिगणनेच्या आकडेवारीप्रमाणे, त्या वर्षी, देशातील दर शेतकरी कुटुंबामागे उपलब्ध असणाऱ्या














लागण क्षेत्राचे सरासरी आकारमान १.१५ हेक्टर इतके होते. म्हणजे, केवळ पाचच वर्षांच्या कालावधीदरम्यान, देशातील दर शेतकरी कुटुंबाकडे उपलब्ध असणारे सरासरी लागण क्षेत्र १.१५ हेक्टर पासून १.०८ हेक्टरपर्यंत घसरल्याचे ही आकडेवारी सांगते.

सन २०१५-१६ या कृषिवर्षात आयोजित करण्यात आलेल्या या गणनेमध्ये आणखी एक बाब नमूद आहे. ती अशी की, त्या वर्षात आपल्या देशात लागवडीखाली जेवढे म्हणून एकंदर क्षेत्र होते त्यांपैकी तब्बल ४७ टक्के लागण क्षेत्र हे दोन हेक्टरपर्यंतच आकारमान असलेल्या तुकड्या-तुकड्यांचे बनलेले होते. २०१०-११ या वर्षात घेण्यात आलेल्या कृषिगणनेमध्ये हीच टक्केवारी दिसत होती ४५ इतकी. याचाच अर्थ हा की, लहान-लहान, आर्थिकदष्ट्या किफायतशीर शाबीत न होणाऱ्या तुकड्यातुकड्यांच्या लागण क्षेत्रांनी सजलेल्या कृषिक्षेत्राच्या प्रमाणात २०१०-११ ते २०१५-१६ या पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान दोन पर्सेन्टेज पॉइंट्स्नी वाढ घडून आलेली दिसते.

हिंदुस्थानामध्ये धंदेशिक्षणाच्या व्यवस्थेची निर्मिती व प्रसार घडवून आणण्यासंदर्भात सरकारला शिफारशी करण्याच्या हेतूने, साधारणपणे १९०१-०२ सालाच्या आसपास, कर्नल क्लिबर्न यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने एक फिरती समिती नेमली होती, असे लोकमान्यांच्या लेखनावरून ध्यानात येते. हे कर्नल क्लिबर्न इंजिनीयर होते. हिंदुस्थानातील होतकरू विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण प्रदान करण्यासंदर्भात या समितीने अभ्यासांती ज्या सूचनावजा शिफारशी केल्या त्या संदर्भातील एक निर्देश लोकमान्यांच्या २ फेब्रुवारी १९०४ रोजीच्या अग्रलेखात आपल्याला सापडतो. कर्नल क्लिबर्न यांच्या अध्यक्षतेखालील अभ्याससमितीने धंदेशिक्षणाची सुविधा हिंदुस्थानात प्रवर्तित करण्यासंदर्भात समितीच्या अहवालात व्यक्त केलेली भूमिका आणि त्या भूमिकेच्या अनुषंगाने अग्रलेखामध्ये लोकमान्यांनी केलेली टिप्पणी आजही तितकीच प्रस्तुत भासते. लोकमान्यांच्या कथनानुसार, कर्नल क्लिबर्न यांच्या कमिटीचे असें मत आहे की, लहान लहान धंदे शिकविण्याकरितां ज्या शाळा काढावयाच्या त्यांत धंद्यासंबंधानें नुसते शिक्षण देऊन उपयोगी नाही, तर तो धंदा फायदेशीर रीतीनें कसा चालवावा हे व्यापारी शिक्षणहि त्यांत मिळाले पाहिजे. उदाहरणार्थ, चामड्याचा, कांचेचा किंवा

साखरेचा कारखाना घ्या. या कारखान्यांत ज्या रासायनिक क्रिया लागतात त्या विद्यार्थ्यांस शिकविल्या, तर तेवढ्याने हे धंदे फायदेशीर रीतीने चालविण्यास विद्यार्थी तयार होत नाहीत. यासाठी फायदेशीर रीतीने हे धंदे जे लोक चालवितात अशा लोकांच्या कारखान्यांतून विद्यार्थी उमेदवार म्हणून ठेवावे आणि त्यांस अवश्य लागणारे लिहिण्यावाचण्याचे, ड्रॉइंगचे आणि रासायनिक शास्त्राचे ज्ञान धंदेशिक्षणाच्या शाळेत द्यावे अशी कमिटीने सूचना केली होती; आणि अशा प्रकारची शाळा नेपल्स (इटली) येथे चालू आहे, त्या नमुन्यावरच इकडे शाळा कराव्या असे म्हटले होते. हल्ली आमच्या देशांत जे धंदे चालू आहेत त्यांसंबंधाने पाहिले तर ही सूचना कांहीं वावगी नव्हती; किंबहुना नवे धंदे लोकांस शिकविल्यानंतर त्यांपैकी जे लोक कारखाने काढतील त्यांचे ते कारखाने आणि धंदेशिक्षणाच्या शाळा यांची परस्परजोड रहाणेहि इष्ट आहे". कर्नल क्लिबर्न यांच्या अध्यक्षतेखाली, ब्रिटिश अमदानीत नियुक्त करण्यात आलेल्या समितीने होतकरू एतद्देशीय विद्यार्थ्यांना धंदेशिक्षणाची व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत केलेली शिफारस आणि लोकमान्यांची त्या संदर्भातील टिप्पणी त्या नंतर ११६ वर्षे उलटून गेली तरी कालबाह्य ठरत नाही. उपजीविकेसाठी केवळ शेतीवरच निर्भर असलेल्या लोकसंख्येचा भार कमी करावयाचा तर बिगर शेती उद्योगधंद्यांचा विकास–विस्तार होणे गरजेचे ठरते. स्वतःचा धंदा चालू करण्याची इच्छा असणाऱ्या उद्यमशील होतकरूला, त्या दृष्टीने, निव्वळ कौशल्यशिक्षण देऊन भागणार नाही, हा मुद्दा कर्नल क्लिबर्न यांच्या समितीने तिच्या शिफारशींमध्ये विशेषत्त्वाने नमूद केलेला दिसतो. कारण, जो धंदा चालू करावयाचा त्याच्याशी सुसंगत असे यंत्रतंत्रविषयक कुशल शिक्षण–प्रशिक्षण ही स्वतःचा व्यवसाय स्थापन करून तो यशस्वीपणे चालविण्यासाठी अत्यावश्यक पूर्वअट असली तरी ती पुरेशी ठरत नसते. स्वतःचा व्यवसाय किफायतशीरपणे उभा करण्यासाठी कौशल्यप्रधान शिक्षणाच्याही पलीकडे अनंत गोष्टी व त्या संदर्भातील ज्ञानानुभव होतकरू उद्योजकाच्या जवळ असावा लागतो. केवळ तंत्रशिक्षणाने सर्व काही भागत नसते. त्यांमुळे, कौशल्यप्रधान तंत्रशिक्षणाला खऱ्या अर्थाने व्यावसायिक शिक्षणाची अथवा/आणि उद्यमशीलतेचे संस्कार घडविणाऱ्या प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली जाणे, अत्यंत गरजेचे ठरते. ११५ वर्षांपूर्वी लोकमान्य नेमकी तीच गरज परकीय शासनकर्त्यांच्या पुढ्यात वृत्तपत्रासारख्या








लोकमाध्यमाद्वारे मांडत होते. आजची गरजही नेमकी तीच आहे.

व्यावसायिक जबाबदारीची गरज म्हणा वा मागणी आणि 'संपादक' या भूमिकेद्वारे स्वीकारलेले लोकशिक्षकाचे व्रत अशा दोन्ही नात्यांनी लोकमान्यांनी त्या वेळी व्यक्त केलेल्या अर्थविषयक काही विचारांचा, विस्तारभयाचा धोका पत्करूनही, या ठिकाणी विवेचक आढावा घेण्यामागील हेतू मुख्यतः दोन. वृत्तपत्राच्या संपादकाला अनेक विषयांतील काही किमान ज्ञान अथवा माहिती असणे अनिवार्यच ठरते. आज, इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचा अक्षरशः द्रोणागिरी आपल्या बोटाग्री वसलेला आहे. लोकमान्यांच्या काळात तर या कशाचाही मागमूसदेखील नव्हता. तरीदेखील, आपल्याला





जो विषय अग्रलेखाच्या माध्यमातून समाजमनाच्या पुढ्यात मांडावयाचा आहे त्या संदर्भातील आवश्यक तो सारा तपशील मेहनतीने गोळा करून विश्लेषक पद्धतीने सुगम शैलीत प्रतिपादन करण्याची लोकमान्यांची या लेखनाच्या माध्यमातून प्रगट होणारी शैली आजही केवळ अनुकरणीयच नव्हे तर गरजेचीही आहे, ही बाब अधोरेखित करणे, हा या खटाटोपामागील पहिला हेतू. दुसरे म्हणजे, भारतातील शेती आणि शेतकरी यांच्या वाट्याला आलेले दुःसह आणि दुस्तर जगणे हे केवळ उदारीकरणाचे, जागतिकीकरणाचे अपत्य नव्हे, हे वास्तव आवर्जून मांडणे, हा या सादरीकरणाच्या मुळाशी असणारा आणखी एक मुख्य उद्देश. भारतीय शेती आणि तिचे खडतर बनलेले अर्थकारण यांची नाळ देशी अर्थकारणात प्रदीर्घ काळ मुरलेल्या अनेकविध असमतोलांशी जुळलेली आहे. केवळ शेतीच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून भागणारे नाही. भारतीय शेती आणि शेतकरी यांचे अर्थकारण ऊर्जितावस्थेकडे नेण्यासाठी शेतीइतकेच बिगर शेती क्षेत्रांतही सुधारणांचे प्रयत्न येत्या काळात एकवटावे लागतील, हा खरा धडा आपल्याला या सगळ्या उहापोहाद्वारे शिकावा आणि गिरवावा लागणार आहे.


# लॉकडाऊनच्या काळात नागरीपुरवठा विभागाची अन्नधान्य वाटपात विक्रमी कामगिरी

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन झालेल्या व संकटात सापडलेल्या जनतेला मोठ्या प्रमाणावर तातडीने अन्नधान्य व दैनंदिन जीवनाश्यक वस्तूंचा पुरवठा केला. त्यामुळे लोकांचे दुःख थोडे हलके होण्यास मदत झाली. श्री. भुजबळ यांनी वारंवार व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे व प्रत्यक्षही भेट घेऊन जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला. श्री. भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या विभागाने लॉकडाऊनच्या काळात जी मोठी कामगिरी केली तिचा संक्षिप्त आढावा विकास भुजबळ यांनी येथे घेतला आहे.

## मंत्री छगन भुजबळ यांनी विभागाला दिले धन्यवाद!





कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण जग अडचणीत आले असून या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभरात लॉकडाऊन नंतर आता अनलॉकची प्रक्रिया सुरु आहे. अशा परिस्थितीत राज्यातील शेतकरी, मजूर, बेघर, विद्यार्थी कुणीही उपाशी राहणार नाही याची काळजी महाविकास आघाडी सरकारच्या अन्न,नागरी पुरवठा विभागाकडून घेण्यात येत आहे. यासाठी केवळ शासनच नाही तर या कठीण संकटाला सामोरे जाण्यासाठी आपल्या सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका योग्य रीतीने पार पडल्यास आपण या संकटाला दूरू सारू असा विश्वास असून या परिस्थितीत राज्यातील जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून २४ x ७ यंत्रणा कार्यरत असून विविध लोकउपयोगी निर्णयांच्या माध्यमांतून राज्यातील नागरिकांचे प्रश्न सोडविले जात आहे.

देशात आणि राज्यात कोरोनाचे संकट उभं राहिल्यानंतर महत्वाची जबाबदारी अन्न,नागरी पुरवठा विभागावर होती. ती जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत राज्याच्या अन्न नागरी पुरवठा विभागाने गेल्या पाच महिन्यात विक्रमी अन्न धान्याचे वाटप केले आहे. सामान्य परिस्थितीमध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत महिन्यात साधारणतः ३.५० लाख मे.टन धान्य वितरीत केले जाते. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक अडचणी असूनही आहे त्याच यंत्रणेच्या माध्यमातून प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या ३.५० लाख मे.टन मोफत तांदूळाचे वितरण. मे आणि जून पासून केशरी कार्डधारकांना देखील अतिरिक्त १.५० लक्ष मे.टन धान्य वाटप केले जात असल्याने प्रति माह जवळपास ८.५० लक्ष मे.टन म्हणजे तीनपट धान्य वितरीत करण्याचा विक्रम केला आहे.

मार्च २०२० मध्ये राज्यातील ६ कोटी २५ लक्ष ७२ हजार १८२ म्हणजेच ९४.५४ टक्के नागरिकांनी घेतला लाभ. त्यामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) + APL शेतकरी योजनेमधून ३६ लाख २१ हजार ७८४ क्विंटल अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.

एप्रिल २०२० मध्ये राज्यातील ६ कोटी ६८ लक्ष ८० हजार २२६ म्हणजेच एकूण ९५.३५ टक्के नागरिकांनी लाभ घेतला. त्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) + APL शेतकरी योजनेमधून ३६ लाख ६१ हजार ६१७ क्विंटल अन्नधान्याचे वाटप व (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून मोफत तांदूळ ३१ लाख ५१ हजार ९२६ क्विंटल वाटप केले. तर ३६ लाख ५९ हजार ८३७




नागरिकांनी पोर्टेबिलीटी योजनेचा लाभ घेतला आहे.

मे २०२० मध्ये ६ कोटी ५८ लक्ष ४३ हजार ३६८ म्हणजेच ९०.४२ टक्के नागरिकांनी लाभ घेतला आहे. यामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) + APL शेतकरी योजनेमधून ३६ लाख ९२ हजार १६४ क्विंटल अन्नधान्याचे वाटप, (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून ३१ लाख ७३ हजार २९६ क्विंटल मोफत तांदूळ वाटप, (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून ९७ हजार ०२९ क्विंटल मोफत डाळ वाटप, एपीएल केशरीकार्ड धारक लाभार्थ्यांना ८ लाख २६ हजार ३८१ क्विंटल अन्नधान्याचे वाटप, आत्मनिर्भर भारत योजनेमधून १ लाख २१ हजार १६६ क्विंटल मोफत तांदूळ वाटप करण्यात आले आहे. तर मे महिन्यात एकूण १९ लक्ष ४६ हजार ६११ नागरिकांनी पोर्टेबिलीटी योजनेचा लाभ घेतला आहे.

जून २०२० मध्ये ६ कोटी ४६ लक्ष ८ हजार ८३ म्हणजेच ८९.४९ टक्के नागरिकांनी लाभ घेतला आहे. यामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) + APL शेतकरी योजनेमधून ३६ लाख ५४ हजार ३४९ क्विंटल अन्नधान्याचे वाटप, (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून ३२ लाख ०१ हजार ०६६ क्विंटल मोफत तांदूळ वाटप, (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून २ लाख ९३ हजार ११० क्विंटल मोफत डाळ वाटप, एपीएल केशरीकार्ड धारक लाभार्थ्यांना ४ लाख ७७ हजार ६६५ क्विंटल अन्नधान्याचे वाटप, आत्मनिर्भर भारत योजनेमधून १४ हजार ३३९ क्विंटल मोफत तांदूळ वाटप करण्यात आले आहे. तर १६ लक्ष ६३ हजार ३६६ नागरिकांनी पोर्टेबिलीटी





योजनेचा लाभ घेतला आहे.

जुलै २०२० मध्ये ६ कोटी ६४ लक्ष २३ हजार ३४६ म्हणजेच ९१.४६ टक्के नागरिकांनी लाभ घेतला. यामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) + APL शेतकरी योजनेमधून ३७ लाख ३४ हजार ०८६ क्विंटल अन्नधान्याचे वाटप, (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून ११ लाख ५४ हजार ११२ क्विंटल मोफत तांदूळ वाटप. (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून १४ लाख ६५ हजार ०८७ क्विंटल मोफत गहू वाटप करण्यात आले आहे.तर १७ लाख ७ हजार ६१८ नागरिकांनी पोर्टेबिलीटी योजनेचा लाभ घेतला आहे.

ऑगस्ट २०२० मध्येही विक्रमी अन्नधान्याचे वाटप सुव्यवस्थितरित्या सुरूच असून ऑगस्ट अखेर पर्यंत ४ कोटी ७२ लक्ष ४९ हजार ८०४ नागरिकांनी आतापर्यंत लाभ घेतला आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) + APL शेतकरी योजनेमधून २५ लाख २२ हजार २६२ क्विंटल अन्नधान्याचे वाटप, (PMGKY) पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून १३ लक्ष ४५ हजार ४४ क्विंटल मोफत तांदळाचे वाटप करण्यात आले आहे. पंतप्रधान गरीब कल्याण योजनेमधून ६ लक्ष ७४ हजार ७१२ क्विंटल मोफत गहू वाटप करण्यात आला आहे. तर आतापर्यंत १९ लक्ष ९३ हजार ४३१ नागरिकांनी पोर्टेबिलीटी योजनेचा लाभ घेतला आहे.

**अन्न,नागरी पुरवठा विभागाकडून घेण्यात आलेले महत्वपूर्ण निर्णय...**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत समाविष्ट नसलेल्या





एपीएल कार्ड धारकांना सवलतीच्या दरात अन्नधान्य:- राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत समाविष्ट होऊ न शकलेल्या ३ कोटी ८ लाख एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना माहे मे ते ऑगस्ट२०२० या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता गहू रु. ८/- प्रति किलो व तांदूळ रु. १२/- प्रति किलो या दराने प्रतिमाह प्रतिव्यक्ती ३ किलो गहू व २ दोन किलो तांदूळ या प्रमाणे ५ किलो अन्नधान्य देण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून २१ रुपये किलो दराने गहू व २२ रुपये किलो प्रमाणे तांदूळ खरेदी करून केसरी कार्ड धारकांना अल्प दरात धान्याचे वितरण करण्यात आले.

**रेशन कार्ड नसलेल्या गरीब व गरजूंना मोफत अन्नधान्य :-** आत्मनिर्भर योजनेंतर्गत रेशनकार्ड नसलेल्या गरीब व गरजू नागरिकांना माहे मे पासून ऑगस्ट पर्यंत प्रति व्यक्ती प्रतिमाह ५ किलो मोफत तांदूळ वितरण सुरू आहे.

भरारी पथकांची निर्मिती :- साठेबाजार व काळाबाजार रोखण्यासाठी भरारी पथके तयार करण्यात आली आहेत.

**जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना सूट :-** लॉकडाऊनमध्ये जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत सुरु राहण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना लॉकडाऊनमधून सूट देण्यात आली होती.

**पंतप्रधान गरीब कल्याण योजनेतून मोफत तांदूळ व डाळ वाटप :** प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या पात्र ७ कोटी लाभार्थ्यांना एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांच्या कालावधीत प्रति व्यक्ती ५ किलो मोफत तांदुळ वाटप तसेच प्रति कुटुंब १ किलो तुरडाळ किंवा चणाडाळ या दोन्हींपैकी एक डाळ प्रति माह वाटप करण्यात आले आहे. माहे जुलै ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत सदर योजनेंतर्गत प्रति व्यक्ती ५ किलो अन्नधान्य (२ किलो गहू, ३ किलो तांदूळ किंवा ३ किलो गहू, २ किलो तांदूळ) व प्रति कुटुंब १ किलो चणा/चणाडाळ वितरित करण्यात येणार आहे.

**स्वयंसेवी संस्थाना अल्प दरात अन्नधान्य :-** सध्या अनेक स्वयंसेवी संस्था गरजू लोकांना अन्नधान्य वितरण करत असल्याने त्यांना ओएमएसएस (Open Market





Sale Scheme) अंतर्गत भारतीय खाद्य निगममधून रु.२१/- प्रति किलो गहू व रु. २२/- प्रति किलो तांदूळ उपलब्ध करून देण्यात आले.

**भरड धान्य खरेदीच्या उद्दिष्टात वाढ :-** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेद्वारे रब्बी हंगामातील ज्वारी व मका या भरड धान्याची हमी भावामध्ये खरेदी. या योजनेचे उद्दिष्ट २.५० लाख क्विंटल वरून ९ लाख क्विंटल वाढवून योजनेची मुदत १५ जुलै पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून २.५० लाख क्विंटल अतिरिक्त उद्दिष्ट वाढवून योजनेच्या मुदतीत दि. ३१ जुलै पर्यंत वाढ केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

**गहू विकेंद्रित खरेदी योजना:-** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेखाली रब्बी पणन हंगामात गहू या पिकासाठी राज्यात प्रथमच विकेंद्रित खरेदी योजना राबविण्यात आली.

## शिवभोजन

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील गोरगरीब, शेतकरी, मजूर व विद्यार्थी वर्ग उपाशी राहू नये यासाठी शासनाने केवळ पाच रुपयांमध्ये ग्राहकांना जेवण देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय मार्चमध्ये घेतला होता. हा सवलतीचा दर जूनपर्यंत लागू करण्यात आला होता. मात्र अजूनही नागरिकांच्या हाताला काम नसल्याने कुणाचीही उपासमार होऊ नये या उद्देशाने हा सवलतीचा पाच रुपये दर सप्टेंबर पर्यंत लागू राहणार आहे. कष्टकरी,असंघटित कामगार, स्थलांतरित, बाहेरगावचे विद्यार्थी, रस्त्यावरील बेघर इत्यादी नागरिकांच्या हाल-अपेष्टा होत असल्याने शिवभोजन थाळी योजनेचा विस्तार एप्रिल पासून तालुकास्तरावर विस्तार करण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यात देण्यात आलेल्या शिवभोजन थाळीच्या संख्येत पाचपट वाढ करण्यात आली आहे. शिवभोजनच्या वेळेत वाढ करण्यात आली असून सकाळी ११ ते ३ या वेळेत भोजन उपलब्ध करून देण्यात येत आहे. शहरी भागासाठी प्रती थाळी ४५ रुपये आणि ग्रामीण भागासाठी प्रती थाळी ३० रुपये एवढे अनुदान शासनाकडून केंद्र चालकास देण्यात येणार आहे.


**तक्रार निवारणासाठी २४ * ७ हेल्पलाईनची निर्मिती:-**


हेल्पलाईन क्रमांक १८००२२४९५०
०२२-२३७२०५८२ , ०२२-२३७२२९७०
०२२-२३७२२४८३ , ०२२-२३७२१९१२
बीएसएनएल /एमटीएनएल ग्राहकांकरिता -१९६७
ईमेल -helpline.mhpds@gov.in
संकेतस्थळ- mahafood.gov.in

# भूदानयोगी विनोबा

प्रा. डॉ. गणेश राऊत

भूदान चळवळीचे जनक विनायक नरहर भावे उर्फ विनोबा यांचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ रोजी झाला. २०२० मध्ये त्यांना सव्वाशे वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने विनोबांचे एक कृतज्ञ स्मरण.





महात्मा गांधीजींचे अध्यात्मिक वारसदार असणाऱ्या विनोबांचे यथार्थ वर्णन 'गांधी विचारांची प्रयोगशाळा' असं ही करण्यात येते. या प्रयोग शाळेतला सर्वोच्च प्रयोग होता भूदान. त्याची उंची गाठता येणे अशक्य व्हावे एवढे काम त्यांनी केले. सुईच्या टोकावरील जमीन नाकारणाऱ्या 'महाभारताची' परंपरा आधुनिक भारतात विनोबांनी नाकारली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील वैयक्तिक सत्याग्रहातील पहिले सत्याग्रही असणाऱ्या विनोबांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पहिली सर्वात मोठी गांधीवादी चळवळ उभारली. १९४२ पर्यंत फारसे कोणाला परिचित नसणाऱ्या या महात्म्याची दखल 'मॅगसेसे' या पुरस्काराने घेतली आणि सांगता 'भारतरत्न' ने झाली.





कायदा आणि कत्तल यांना नाकारून करुणेच्या माध्यमातून लोकांच्या हृदयाला आवाहन करून विनोबांनी लाखो एकर जमीन भुदानात मिळवली. जगात कोणालाही आजतागायत याची पुनरावृत्ती करता आली नाही. एकमेवाद्वितीय असाच हा प्रयोग होय.

ज्ञान, परहिततत्पर, नि:स्वार्थ सेवक, सेवातत्पर असणाऱ्या साधकाची आणि चळवळीची ही गोष्ट आहे.

विनोबांचे वडील नरहर शंभुराव भावे हे त्यांच्या काळातले एक शास्त्रज्ञ होते. त्यांनी घरातच रंगविषयक प्रयोगशाळा सुरू केली होती. म. गांधीजींच्या चळवळीत 'खादी' कापडास महत्व आले. या खादीचा अभ्यास करताना त्यांच्या असे लक्षात आले की 'आपण जी खादी स्वदेशी म्हणून वापरतो तिचे रंग विदेशी आहेत'. यातूनच त्यांनी स्वदेशी वनस्पतींपासून स्वदेशी रंग तयार करावयाचा प्रयत्न केला. त्यांनी एकदा विनोबांना पत्र लिहिले.त्या पत्रात त्यांनी लिहिले आहे, " या पत्राची सगळी क्रिया माझ्या हातून झालेली आहे. कागद मी बनवला. जी शाई मी वापरली, ती मी बनविली आहे, ज्या लेखणीने पत्र लिहिले आहे ती लेखणी मी बनविली, आणि मी स्वतःच लिहीत आहे". पुढे त्यांनी गायन-वादन या विषयावर पुस्तक लिहिले. सोयाबीनच्या आहाराने मधुमेहावर नियंत्रण आणता येते हे त्यांनी महात्मा गांधीजींना दाखवून दिले होते. १९३५ - ३६ मध्ये कुष्ठरोग निवारण करण्यासाठी श्री मनोहर दिवाण यांनी स्थापन केलेल्या ' महारोगी सेवामंडळ ' या भारतातील अभूतपूर्व अशा संस्थेत त्यांनी पहिली देणगी दिली होती. सेवाकार्य करणे वा सेवाकार्यास मदत करणे हा त्यांचा स्वभाव विनोबांमध्येही आला होता. बदलत्या कामाचा अचूक अंदाज घेण्याची दृष्टी विनोबांच्या वडिलांकडे होती. "इंग्रजी भाषा ही नव्या जगाचा पासपोर्ट आहे," असे त्यांनी विनोबांना सांगितले होते. आपण सुसज्ज






प्रयोगशाळेत अंतिम श्वास घ्यावा असे त्यांचे मत होते. त्यांच्या आयुष्यात विज्ञानाला किती महत्व होते हे यावरून समजते. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच म. गांधी म्हणाले "आपण त्यांच्या जीवनापासून त्यागीवृत्तीचा धडा घेऊ या." विनोबा म्हणाले, "बाबा काही प्रसिद्ध पुरुष नव्हते. परंतु मोठ्यात मोठे अप्रसिद्ध पुरुष होऊन गेले त्यापैकी बाबा एक होते".

विनोबांच्या मातोश्री रुक्मिणीबाई यांचाही फार मोठा प्रभाव विनोबांवर होता. आईकडून त्यांना भक्तीचा संस्कार मिळाला. आपल्याला भूदानाची प्रेरणा आईकडून मिळाली असेही विनोबांचे सांगणे होते. विनोबांच्या ( गागोदे ) या जन्मगावी त्यांच्या घरी फणसाचे झाड होते. फणस पिकल्यावर आईने ते कापून त्यातील गरे शेजाऱ्यांना अगोदर वाटून मगच विनोबांना गरे खायला दिले. आई म्हणाली, "आधी दुसऱ्यांना देऊन मग खाल्ले पाहिजे. देतो तो देव आणि राखतो तो राक्षस".


एकदा आई विनोबांना म्हणाली. "विन्या गृहस्थाश्रम चांगल्या प्रकारे आचरला तर एका पिढीचा उद्धार होतो, परंतु उत्तम ब्रह्मचर्य - पालनाने बेचाळीस पिढ्या उद्धरून जातील". हे ऐकुन विनोबा आणि त्यांच्या बंधूंनी सुद्धा आजन्म ब्रह्मचर्याचे पालन केले. आई सांगायची,

"थोडक्यात गोडी आणि फारात लबाडी ". आईनेच विनोबांना संस्कृत शिकायची आणि गीतेचे मराठी भाषांतर करण्याची प्रेरणा दिली.

'गीताई' या शब्दातच विनोबांनी खुबीने 'आई' चे स्मारक करून ठेवले आहे.


"गीता, आई आणि तकली (टकळी- सूत कातण्याची) )ही माझ्या जीवनाची त्रिमूर्ती आहे " असे विनोबा म्हणत.

विनोबांचे बालपण विशेषतः आयुष्यातील पहिली दहा वर्षे गागोद्यात गेली. येथे शाळा नव्हती म्हणून त्यांचे शिक्षण घरीच झाले. वडील मुलांना खाऊ म्हणून गोष्टींची पुस्तके देत असत. पुढे ते बडोद्यात रहायला गेले. येथे विनोबांचे शिक्षण इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंत घरीच झाले. पुढे शालेय शिक्षण संपवून ते बडोदा कॉलेजात दाखल झाले. या काळात त्यांनी अफाट वाचन केले. विविध ग्रंथामधील शेकडो श्लोक त्यांना पाठ होते. याच काळात सशस्त्र क्रांतिकार्याचेही



आकर्षण त्यांच्या मनात निर्माण झाले होते. क्रांतिकार्य आणि बॉम्ब तयार करण्याच्या कामात त्यांनी पुढाकार घेतला होता. १९१४ मध्ये त्यांनी बडोद्यात 'विद्यार्थी मंडळ' स्थापले. स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा त्यांची सेवा करण्यासाठी हे मंडळ सुरू झाले. १९१२ मध्ये त्यांच्या मनात गृहत्यागाचा आलेला विचार कृतीत १९१६ मध्ये झाला. घर सोडण्यापूर्वी त्यांनी मॅट्रिकची प्रमाणपत्रे जाळून टाकली. गृहत्याग करून ते काशी शहरात संस्कृत शिकण्यासाठी गेले.

विनोबा काशी शहरात असताना मि. गांधी ( ते अजून महात्मा व्हाययचे होते ) यांचे एक अत्यंत गाजलेले भाषणाचे वृत्त त्यांच्या वाचनात आले. गांधीजींच्या या भाषणाचे मध्यवर्ती सूत्र 'मानसिक अहिंसा ही मुख्य अहिंसा आहे आणि ती निर्भयतेशिवाय असूच शकत नाही' असे होते. येथूनच विनोबा आणि गांधीजी यांच्यात पत्रव्यवहार सुरू झाला. पुढे गांधीजींनी विनोबांना आश्रमात बोलावून घेतले. पहिल्याच भेटी संदर्भात विनोबा लिहीतात "मीगांधीजींजवळपोहचलो आणि त्यांच्याजवळ मला हिमालयाची शांती



आणि बंगालची क्रांती मिळाली. तेथे जे मिळाले त्यात क्रांती आणि शांती या दोन्हीचा अपूर्व संगम झाला होता". विनोबांच्या मतानुसार त्यांनी गांधीजींच्या अनेक परीक्षा घेतल्या. गांधीजी कमी पडले असते तर विनोबा त्यांना सोडून गेले असते. परंतु गीतेच्या कर्मयोगाचे प्रत्यक्ष आचरण त्यांनी बापुंमध्ये पहिले. विनोबा गांधीजींच्या आश्रमिय जीवनात १९१७ रुळले असताना १९१७ मध्ये विनोबा संस्कृत शिक्षणासाठी (विशेषतः अध्ययन पूर्ण करण्यासाठी आणि प्रकृतीसाठी हवापालट म्हणून) वाई येथे दाखल झाले. सर्व जातीच्या लोकांना वेदशास्त्रादी शिकविण्यास तयार याची खात्री केल्यावरच त्यांनी शिक्षणाला सुरवात केली. १९१७ मध्ये विनोबांनी वाई येथील सहाध्यायी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना एक पत्र लिहून ''टिळकांचे युग संपत आले आहे. सत्याग्रहाचे शास्त्र लोकांच्या बुद्धिवर नवा प्रभाव पाडील असे दिसते. आता गांधीचे युग सुरू होईल. गांधीच्या मार्गाशिवाय कोणताही दुसरा मार्ग राष्ट्राला पुढे नेऊ शकणार नाही'' असे मनोगत व्यक्त केले होते. १९१७ मध्ये गांधीजींच्या नेतृत्वाविषयी भविष्यवाणी करणे ही गोष्ट विनोबांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारी आहे. १९५६ मध्ये सुद्धा त्यांनी' भारतावर चीन लवकरच आक्रमण करेल' असे सांगितले होते. ते घडल्याचे आपण पाहिलेच आहे.


वाई येथे अभ्यासक्रम पूर्ण करून विनोबा पुन्हा एकदा आश्रमिय जीवनात परतले. वर्धा येथे सुरू करण्यात आलेल्या सत्याग्रहश्रमाचे संचालक म्हणून ते काम पाहू लागले. सूतकाम, मौन, आर्थिक स्वावलंबन यावर त्यांनी



या आश्रमात भर दिला. गांधीजी विनोबांना म्हणाले होते की 'तुझा उपयोग भारताच्या उन्नतीसाठी होवो, ही सदिच्छा १९२३ मध्ये सत्यात उतरली. १९२१ मध्ये गांधीजींनी काँग्रेस चे एक कोटी सदस्य बनविण्याचा आणि एक कोटी रुपयांचा टिळक फंड बनविण्याचा निश्चय केला होता. विनोबांनी घरोघर जाऊन लोकांना या कामाचे महत्व पटवून दिले. १९२३ मध्ये नागपूर मध्ये 'झेंडा सत्याग्रह' सुरू झाला. या सत्याग्रहात विनोबांचे बंधू शिवाजीराव भावे सहभागी होते. विनोबांचे नागपूरला या सत्याग्रहात भाषण झाले. विनोबांना इंग्रज सरकारने अटक करून वर्षभर सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

तुरुंगातून सुटल्यावर विनोबांनी 'महाराष्ट्र धर्म' हे मासिक एकहाती सुरू केले. ईश्वर निष्ठा, राजकारण, आणि सर्वसावधवृत्ती यास प्राधान्य देण्याचे या मासिकाचे धोरण होते. पुढे मासिकाचे साप्ताहिक झाले. यात विनोबांनी २२२ लेख लिहीले. धर्म, शिक्षण, उद्योग, राजकारण, अस्पृश्यता निवारण, हिंदू- मुसलमान ऐक्य, मृत्यू लेख, सामजिक, आरोग्य, साहित्य अशा विविध विषयावर त्यांनी लेखन केले. याचा पुढचा सर्वात मोठा टप्पा विनोबांनी 'गीताई' च्या रूपाने गाठला. 'सर्व आयाबहिणींना हा ग्रंथ उपयोगी पडावा व त्यांच्याद्वारे सर्व समाजाचे कल्याण व्हावे' अशा दृष्टिकोनातून 'गीताई' ग्रंथाची रचना झाली. गीताई समजून घेण्यासाठी 'प्रत्यक्ष आचरण ही वस्तू उपयोगी आहे' असेही विनोबांचे मत होते. गीताई ग्रंथाचे आणि आपले नाते स्पष्ट करताना ते लिहीतात -





**गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता ।**

**पडतां पडतां घेई उचलुनी कडेवरी ।।**

'गीताई'ची पहिली आवृत्ती १९३२ मध्ये प्रकाशित झाली. आज २०२० मध्ये अजूनही तिचे पुनर्मुद्रण चालू आहे. यातच काय ते तज्ञ वाचकांनी समजून घ्यावे.

'गीताई' नंतर गीता प्रवचने आकारास आली. इंग्रजांनी विनोबांना धुळ्याच्या तुरुंगात ठेवले असताना विनोबा प्रवचन देत आणि साने गुरुजींसारख्या सिद्धहस्त लेखकाने ती भक्तिभावाने उतरवून घेतली. हीच प्रवचने म्हणजे 'गीता प्रवचने' ग्रंथ होय.



१९३५ ते अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन प्रथमच खेडेगावी (फैजपुर) भरविण्याचे ठरवले. या अधिवेशनात विनोबांनी पडेल ते काम केले आणि अधिवेशन यशस्वी करण्यासाठी तन-मन वेचले. त्यांनी ग्राम सेवा मंडळाची स्थापना करून वर्धा तालुक्याचे सर्वांगीण सर्वेक्षण केले. यातून चरखा संघ भांडार, चर्मालय, मृत गुरे फाडणे. चरखा पद्धतीत बदल व संशोधन, लोखंडी ओतकाम, गोशाळा इ. उपक्रम सुरू करण्यात आले. विनोबांच्या प्रेरणेने श्री मनोहर बळवंत दिवाण यांनी 'महारोगी सेवा मंडळ' सुरू करून स्वतःचे आयुष्य या रुग्णांच्या सेवेकरिता वाहून घेतले. ही संस्था भारतातील पहिली बिगर शासकीय कुष्ठसेवा संस्था होय.


१९३९ मधे तिसऱ्यांदा इंग्रज सरकारने विनोबांना अटक केली. 'वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही' म्हणून त्यांची निवड गांधीजींनी केली होती. २० ऑक्टोबर १९४० च्या हरिजन पत्राच्या अंकात गांधीजींनी 'विनोबा कोण आहेत?' या शीर्षकाचा मूळ लेख इंग्रजी भाषेत लिहिला. गांधीजींनी आपल्या सहकाऱ्याचा परिचय करून देणारा लेख प्रथमच लिहिला होता. त्या लेखानंतर सुद्धा त्यांनी अन्य कोणावर असा लेख लिहिल्याचे स्मरत नाही. १९४०-१९४१ मध्ये त्यांना परत तुरुंगात जावे लागले. याच तुरुंगवासात 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तकाचा जन्म झाला. १९४२ मध्ये नागपूर, वेल्लोर, शिवनी अशा क्रमाने त्यांना २






वर्ष ११ महिने तुरुंगात ठेवण्यात आले. याच तुरुंगवासातून 'वेल्लोर प्रवचने', 'स्थितप्रज्ञदर्शन' ही पुस्तके आकारास आली. विनोबांनी तुरुंगालाच आश्रमीय जीवन साधनेचे अंग बनवून टाकले.

भारत स्वतंत्र होण्याच्या अगोदर त्यांची तुरुंगातून सुटका झाली. यानंतर त्यांनी परिसर स्वच्छता, मृत जनावरे फाडणे आणि विणाईचे काम करणे असा कार्यक्रम सुरू केला. भारत स्वतंत्र झाल्यावर विनोबांनी 'सर्वोदय समाज' आणि 'सर्व सेवा संघ' स्थापण्याचे ठरविले. लोकांच्या पुनर्वसनासाठी पंडित नेहरूंच्या बोलवण्यावरून ते दिल्लीला गेले. तेलंगण भागात हिंसेने जोर धरला असता ८ एप्रिल



१९५१ च्या हैदराबाद येथील शिवरामपल्ली येथे भरलेल्या सर्वोदय समाजाच्या तिसऱ्या अधिवेशनासाठी विनोबा निघाले. हैदराबाद मध्ये त्यांनी कम्युनिस्ट पुढाऱ्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. १८ एप्रिल १९५१ रोजी नलगोंडा जिल्ह्यातील पोचमपल्ली या गावी त्यांना




आयुष्यातील पहिले भूदान ( १०० एकर जमीन ) मिळाले. रामचंद्र रेड्डी या शेतकऱ्याने विनोबांना भूदान दिले.

भूमिहीनांकरिता जमीन न्यायाच्या नावाने मालकांच्या हातून वेगळी होऊ शकते हा सामाजिक व्यवहारामधला अगदी आगळा आणि कदाचित पहिलाच अनुभव. पण अगदी नैसर्गिकपणे आलेला . तोच पुढे भूदान यज्ञ म्हणून प्रसिद्ध झाला. तेलंगण यात्रेत विनोबांना तेरा हजार एकर जमीन भूदानात मिळाली.

१२ सप्टेंबर १९५१ रोजी विनोबा दिल्ली येथे




पंचवार्षिक योजना तयार करणाऱ्या सदस्यांशी चर्चा करण्यासाठी पायी निघाले. दिल्लीला पोहोचेपर्यंत त्यांना अठरा हजार एकर जमीन दानात मिळाली. विनोबांनी कानपूरमध्ये जमीन वाटप करतानाच साधनदानाची कल्पना मांडली. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी (बैल, अवजारे. इ ) लोकांनी दान द्यायला सुरुवात केली. काशी शहरापासून विनोबांनी 'स्वच्छता मोहीम' सुरू केली. बिहार

मध्ये त्यांनी 'संपत्तीदान ' ची घोषणा केली. या कामासाठी जयप्रकाश नारायण यांनी जीवनदान जाहीर केले. १९५६ मध्ये विनोबांनी 'निधिमुक्ती' आणि 'तंत्रमुक्ति' विचार मांडला. केरळमध्ये विनोबांनी शांती सेनेची कल्पना मांडली. म्हैसुरमध्ये 'ग्रामदान' कल्पना मांडून विनोबांनी 'जय जगत' चा नारा दिला. येथेच त्यांनी 'सर्वोदय पात्र' (रोज लहान मुलांच्या हातून मूठभर धान्य पात्रात टाकणे ) कल्पना मांडली. चंबळच्या खोऱ्यात डाकूंनी त्यांच्यासमोर आत्मसमर्पण केले. त्याच वेळी विनोबांना आशिया खंडातील नोबेल समजले जाणारे 'मॅगसेसे' पारितोषिक जाहीर झाले. विनोबा त्यासाठी परदेशात गेले नाहीत. मिळालेली बक्षिसाची सारी रक्कम भूदान चळवळीच्या कार्यात दान होऊन गेली.

विनोबा आसाममध्ये गेले आणि तिथून पासपोर्ट नसतानासुद्धा पाकिस्तानात गेले. ते म्हणाले मी जगाचा नागरिक आहे, मला पासपोर्ट ची गरज नाही. १९६६ मध्ये त्यांनी बिहार मध्ये आचार्य कुलाची स्थापना केली. आणीबाणीच्या आगेमागे विनोबा राजकारणाचे अध्यात्मिकिकरण करू इच्छित होते. त्यांच्या भूमिकेचा विपर्यास झाला यातून महाराष्ट्रात विनोबांवर टीका सुरू झाली. १९७९ मध्ये त्यांनी पवनारच्या आश्रमात जागतिक महिला परिषद भरविली. १५ नोव्हेंबर १९८२ रोजी विनोबांचे महानिर्वाण झाले. आश्रमातील एक भगिनी महादेवीताईंच्या हातून विनोंबावर अंतिम संस्कार करण्यात आले. आधुनिक भारताच्या इतिहासातील एक पर्व संपले. लाखो एकर जमीन भुदानात मिळवूनही त्या भूमीतील माती आपल्या हातांना चिकटणार नाही, आपला सातबारा आयुष्यभर कोराच राहील याची काळजी या भूदान योग्याने घेतली.




# पंतप्रधान 'काळजी निधि' !

'पीएम केअर्स फंड'!

प्राईम मिनिस्टर्स सिटिझन असिस्टन्स अँड रिलिफ इन इमर्जन्सी सिच्युएशन फंड!

इतके लांबलचक आणि अगदी ओढूनताणून बनवलेले हे नाव आहे की ते लक्षात ठेवणे देखील अशक्य होते.

करोनाची साथ सुरु झाल्यानंतर पंतप्रधानांच्या पुढाकाराने हा स्वतंत्र आणि बिगरसरकारी निधि स्थापन करण्यात आला. असे म्हणतात की पंतप्रधानांनी अडीच-तीन लाख रुपयांची सुरुवातीची प्राथमिक किंवा बीज निधीची रक्कम दिली.

म्हणजेच याला खासगी निधि म्हणायचे काय? कारण हा सर्वसाधारण





धर्मादाय निधीविषयक नियमांखाली स्थापन करण्यात आला आहे. याचे अध्यक्षपद स्वतः पंतप्रधानांकडे आहे तर विश्वस्तांमध्ये केंद्रीय गृहमंत्री, केंद्रीय संरक्षणमंत्री व केंद्रीय अर्थमंत्री यांचा समावेश आहे. ही मंडळी या निधीच्या विनियोगाचा निर्णय करणारी असतील.

२७ मार्च २०२० रोजी हा निधि स्थापन झाला.

दुसऱ्या दिवसापासून या निधीकडे देणग्यांचा ओघच की हो सुरु झाला. आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२०ला संपणार होते. परंतु ३१ मार्च पर्यंत या निधीत ३०७६ कोटि रुपये जमा झाले. हे एक आश्चर्यच होते.

आर्थिक वर्ष संपताना जे हिशोब द्यावयाचे ते देखील सादर करण्यात आले आणि त्या आधारेच ही माहिती समोर आली. मात्र एवढ्या या उदार देणग्या कुणी दिल्या ते देणगीदार मात्र गुप्तच आहेत. त्यांची नावे समजलेली नाहीत. १ एप्रिलपासून पुढच्या काळातील देणग्यांबाबत आणि देणगीदारांबाबत माहिती अधिकारात प्रश्न केले असता हा सरकारी निधि नसल्याचे सांगून माहिती जाहीर करता







येणार नाही असे उत्तर मिळाले. मग हा खासगी निधि आहे का? आणि मग त्यासाठी सरकारी यंत्रणांचा वापर करुन पैसा गोळा करण्याचे कारण काय?

केंद्रीय कर्मचारी, सैनिक, सरकारी उद्योगातील कामगार अशा सर्वांकडून जवळपास सक्तीनेच यासाठी पैसे गोळा करण्यात आले आहेत.

पंतप्रधानांचा निधि म्हटल्यावर उद्योगपतींना तर अंगातच आले. अगदी अनेक आदरणीय उद्योगपतींनी देखील पंतप्रधानांच्या या निधीत आपली देणगी देण्यासाठी अक्षरशः धाव घेतली. सगळ्या धनपतींमध्ये तर देणगी देण्यासाठी चढाओढ लागल्याचे दृष्य होते. परंतु एप्रिलपासून पुढच्या काळात किती पैसा या निधीत आला त्याची माहिती मात्र देण्याबाबत टाळाटाळ सुरु झाली आहे.







'इंडिया स्पेंड' या अध्ययन संस्थेने याबाबत ज्या देणग्यांची जाहीर घोषणा झाली त्यांचा मागोवा घेऊन त्या आधारे एक अंदाजे एकत्रित रकमेचा आकडा काढला आहे. त्यानुसार या निधीत सुमारे ९६७८ कोटि रुपये (९६७७.९ कोटि रुपये) जमा झाले असावेत असे अनुमान केले आहे. अबब ! काय पंतप्रधानांचा वट आहे. पाहता पाहता दहा हजार कोटि रुपये (एव्हाना जमा झाले असतील) जमा केले? जबरदस्त!

आतापर्यंत व्हेंटिलेटर्ससाठी या निधीतून ३१०० कोटि रुपये देण्यात आल्याचे सांगितले जाते. परंतु या निधीकडे पैशाचा - राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय - ओघ वाढतच आहे असे समजते.

पंतप्रधानांना असा स्वतंत्र निधि स्थापन करण्याची गरज का भासली हा अजुनही अनुत्तरित प्रश्न आहे. याचा अर्थ पंतप्रधानांच्या नावे जे इतर सरकारी निधि आहेत ते जवळपास निष्क्रिय झाल्याचे म्हणावे लागेल. कारण यापुढील काळात त्या निधिंकडे कुणी ढुंकूनही बघणार नाही.

याचा अर्थ हे निधि देखील या राजवटीला नष्ट करुन टाकायचे आहेत काय असा प्रश्न निर्माण होतो.

पंतप्रधानांचा दुष्काळ निवारण, आपत्ती निवारण, नैसर्गिक संकट निवारण असे काही निधि आहेत. परंतु तो वारसा नष्ट करुन स्वतःच्या हातात सारी सूत्रे ठेवणारा निधि स्थापन करुन अधिकार केंद्रीकरणाचा आणखी एक प्रयोग चालू करण्यात आला आहे.

धन्य ! धन्य ! धन्य !

# अमितभाईंना झालंय तरी काय?


अमित शहा किंवा अमितभाई हे वर्तमान राजवटीतले दुसऱ्या क्रमांकाचे नेते आहेत. त्यांना द्वितीय पोलादी पुरुष म्हणूनही संबोधले जाते. त्यामुळेच त्यांना सरकार आणि सत्तापक्षात सहनायकाची भूमिका मिळाली आहे हे निःसंशय! त्यांचे वय लक्षात घेता ते दीर्घ खेळी करण्याची क्षमता राखतात असेही मानले जाते. तर अशा या अमितभाईंची प्रकृती अलीकडे बिघडल्याचे निदर्शनास आले.

प्रथम त्यांना करोनाचा संसर्ग झाल्याचे निष्पन्न झाले. ते त्यांनी स्वतःच ट्वीट करुन जाहीर केले. त्यांनी सध्या राजकीय नेत्यात अतिप्रिय अशा पंचतारांकित मेदांता रुग्णालयात ते दाखल होत असल्याचेही जाहीर केले होते. मेदांतामध्ये दाखल झाल्यानंतरही त्यांच्या प्रकृतीबाबतचे काही वर्तमान कळले नव्हते. परंतु अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था किंवा 'एम्स'मध्ये दाखल न होता ते खासगी व तेही भपकेबाज मेदांतामध्ये का दाखल झाले याबाबत उलटसुलट चर्चाही झाल्या.

'एम्स' ही सरकारी संस्था असली तरी तेथे अनुभवी व निष्णात डॉक्टरांची कमी नाही.

मनमोहनसिंग हे पंतप्रधान असताना त्यांनी तेथेच हृदय शस्त्रक्रिया करुन घेतली होती. त्यामुळे अमितभाईंच्या मेदांतामध्ये दाखल होण्यामागचे गूढ वाढले. काही दिवसांनी ते बरे होऊन घरी परतले. परंतु लगेचच बातमी आली की त्यांना पुन्हा 'एम्स' मध्ये दाखल करण्यात आले आहे. मग तर चर्चा वाढू लागल्या. कानोकानी आलेल्या माहितीनुसार असे समजते की सुरुवातीला मेदांतामध्ये दाखल होण्यामागेही काही हेतु होता. हे खासगी व अतिश्रीमंतांसाठीचे रुग्णालय असल्याने तेथे कडेकोट बंदोबस्त असतो.

अमितभाईंच्या प्रकृती व आरोग्याबाबतचे तपशील अतिगोपनीय राखणे तेथे अधिक सुलभ असल्याने तेथे दाखल होण्याचा निर्णय त्यांनी केला. त्यामुळेच तेथे असताना त्यांच्या प्रकृतीबाबतचे कोणतेही निवेदन करण्यात आले नव्हते. यानंतर त्यांना पुन्हा 'एम्स'मध्ये दाखल करण्यात आले. तेथेही ते काही दिवस राहिले परंतु त्यांच्या प्रकृतीसंदर्भात कोणतेही वैद्यकीय निवेदन केले गेले नाही.



सांगण्याचा मुद्दा हा की त्यांच्या प्रकृतिमानाचे तपशील सार्वजनिक होऊ नयेत यासाठी कसोशीने खबरदारी घेतली जात आहे.

दरम्यान, माहीतगार गोटातील सूत्रांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या पत्नीकडून पंतप्रधानांना विशेष विनंती करण्यात आली असून अमितभाईंवरील कामाचा बोजा कमी करण्याची 'गुजारिश' त्यांनी केल्याचे समजते. मागेही त्यांच्या प्रकृतीबाबत वावड्या उठलेल्या होत्या आणि त्यांना दुर्धर रोग जडल्याचे बोलले जात होते. पण तेव्हाही अमितभाईंनी स्वतःच त्यावर खुलासा करुन ते अगदी ठणठणीत असल्याचे देशाला सांगितले होते. आता पुन्हा असेच काहीसे घडले आहे. त्यामुळेच त्यांच्या हितचिंतकांना त्यांच्या प्रकृतीबद्दल काळजी वाटू लागली आहे.

सरकार, मंत्रालय, पक्षसंघटना अशा विविध जबाबदाऱ्या ते पार पाडत असल्याने त्यांच्यावर कामाचा ताण निश्चितच आहे. त्यामुळे अशा क्रियाशील नेत्यावर नको एवढा ताण पडू नये किंवा टाकला जाऊ नये. त्यांच्या प्रकृतीला आराम पडो !

## राम विरुध्द परशुराम??

भारतीय राजकारणात 'जात' हा अजुनही एक निर्णायक घटक मानला जातो. उत्तर भारतीय राजकारणात तर तो विलक्षण प्रभावी आहे आणि राजकारणावर वर्चस्व गाजवणारा आहे.

सध्या उत्तर प्रदेशातील राजकारण धर्मावरुन जातीवर उतरु लागल्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

प्रभू रामचंद्र हे हिंदूंचे देव असले



तरी क्षत्रिय कुलोत्पन्न असल्याने त्या समाजाचा त्यांच्यावरील अधिकार इतरांपेक्षा कांकणभर जास्तच नको का? त्यामुळे स्वतःला क्षत्रिय म्हणविणारे राजपूत-ठाकूर समाज हे रामचंद्रांचा वारसा अधिक आक्रमकतेने मिरविणेही आपोआप आलेच !

सध्याचे उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे क्षत्रिय म्हणजे ठाकूर आहेत.

मूळचे उत्तराखंडचे आहेत. परंतु गोरखपूरच्या गादीचे वारस आहेत. संन्यासी, योगी आहेत. परंतु त्यांच्या राज्यात ब्राह्मण समाजावर फारच अन्याय होऊ लागल्याची चर्चा सध्या वाढत आहे.

विशेषतः गुंड विकास दुबेला ज्या पध्दतीने मारण्यात आले त्यानंतर या चर्चेने वेग पकडलेला आढळतो.

उत्तर प्रदेशातला ब्राह्मण समाज हा 'साडेतीन टक्केवाला' नाही. साधारणपणे बारा टक्क्यांच्या आसपास हा समाज आहे आणि अनेक मतदारसंघांमध्ये त्यांचे निर्णायक प्राबल्य आहे. त्याचप्रमाणे आजही गावागावांमध्ये ब्राह्मण व्यक्ती व कुटुंबांकडे मार्गदर्शक म्हणून पाहण्याची प्रवृत्ती आढळून येते. परंतु सध्या दिवस फिरले आहेत.

उत्तर प्रदेशातील सोशल मीडियावर ब्राह्मण समाजातील लोकांच्या कशा हत्या होत आहे याचे तपशील प्रसारित व प्रचारित केले जात आहेत. ही एक चिंताजनक बाब आहे.

परंतु राजकारणी मंडळींसाठी मात्र ही बहुधा पर्वणी असावी.

योगी सरकारवर जसा ब्राह्मण द्वेषाचा शिक्का मारला गेला तसे विरोधी




पक्षांनी त्यास हवा देण्यास सुरुवात केली. जर क्षत्रियांचा राम असेल तर ब्राह्मणांचा परशुराम तयारच आहे ! परशुराम हे ब्राह्मण होते आणि त्यांनी तीन वेळेस पृथ्वी निःक्षत्रिय केली होती हे प्रथम येथे लक्षात घ्यावे लागेल.

तर.......अयोध्येत राम मंदिराच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम संपल्यासंपल्या दुसऱ्याच दिवशी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यांनी त्यांचे सरकार सत्तेत आल्यास ते भगवान परशुराम यांचा भव्य आणि १०८ फूट उंचीचा पुतळा उभारतील अशी तत्काळ घोषणा करुन ब्राह्मण समाजाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला. समाजवादी पक्षाने हे केल्यावर बहुजन समाज पक्ष मागे राहण्याचा प्रश्नच नाही.

बहन मायावती यांनीही या स्पर्धेत उडी घेतली. त्यांनी योगी राजवटीत ब्राह्मण समाजावर अन्याय वाढत चालल्याचे सांगितले आणि त्या सत्तेत आल्यास समाजवादी पक्षाने आश्वासन दिलेल्या पुतळ्यापेक्षा अधिक भव्य, अधिक उंच असा






भगवान परशुराम यांचा पुतळा उभारतील असे जाहीर केले. मायावती यांनी मागील निवडणुकीत दलित आणि ब्राह्मण यांना एकत्र आणून प्रयोग केला होता आणि त्या सत्तेतही आल्या होत्या. त्यांना पुन्हा ते स्वप्न पडू लागले असावे!

आता तिसरा पक्ष...........भले लिंबूटिंबू का असेना ! तर काँग्रेस पक्षाचे तरुण नेते आणि अर्थातच ब्राह्मण समाजाचे असलेले नेते जितिन प्रसाद यांनी योगी सरकारने भगवान परशुराम जयंतीची बंद करण्यात आलेली सुटी पुन्हा सुरु करावी अशी मागणी केली आणि प्रसंगी त्यासाठी आंदोलन करण्याचा इशाराही दिला.

हे सगळे होत असतानाच योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने ब्राह्मण समाजाकडील शस्त्रांची म्हणजे बंदुका, रायफली व पिस्तुले, रिव्हॉल्वर्स इ. यांची मोजदाद सुरु करण्याचे आदेश दिले. अर्थातच ज्यांच्याकडे परवाने आहेत त्यांच्याकडील शस्त्रांची मोजदाद करण्याचे आदेश देण्यात आल्यानंतर मात्र त्याची जोरदार प्रतिक्रिया उमटू लागली.

हे प्रकरण महागात जाऊ शकते हे ध्यानात आल्यानंतर हा आदेश तत्काळ मागे घेण्यात आला.



उत्तर प्रदेशात असे मानले जाते आणि विशेषतः पूर्वी उत्तर प्रदेशात अनेक दबंग ब्राह्मण नेते होते आणि आजही काही प्रमाणात आहेत. उत्तर प्रदेशात ब्राह्मण समाज हा आक्रमक आहे.

नोकरशाही, प्रशासन, शिक्षण, पोलिस, न्याययंत्रणा आणि शेतीमध्ये हा समाज आपले वजन राखून आहे. त्यामुळेच या वर्गाशी शक्यतोवर कोणी राज्यकर्ता भिडायला जात नाही असेही मानले जाते.

एकेकाळी काँग्रेसचा वरचष्मा असताना ब्राह्मण, मुस्लिम, दलित अशी काँग्रेसची मुख्यत्वेकरुन व्होटबँक होती. नंतरच्या काळात बहुजन समाज पक्षाने दलितांवर कब्जा केला तर समाजवादी पक्षाने मुस्लिमांवर आणि भाजपने ब्राह्मण



समाजाला स्वतःकडे वळविले. परिणामी काँग्रेसचा ऱ्हास झाला व अजुनही काँग्रेस पुनरुज्जीवनाच्या अवस्थेत नाही.

थोडक्यात काय उत्तर प्रदेशातील राजकारण पुन्हा एकदा प्रबळ अशा जातींभोवती फिरु लागले आहे.

आता योगी आदित्यनाथ आणि भाजपचे नेतृत्व हा पेच कसा हाताळतात ते पहावे लागेल; अन्यथा उत्तर प्रदेशात पीछेहाट होणे पक्षाला परवडणार नाही !

## भाजपचे मुस्लिम प्रेम??

अमरसिंग यांच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी भाजपने त्यांचे प्रवक्ते सय्यद झफर इस्लाम यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर अनेकांच्या भुवया




उंचावल्या. त्याला कारणेही आहेत.

भाजप व त्यांच्या नेत्यांच्या मनातला मुस्लिमांबद्दलचा आकस हा लपून राहिलेला नाही. मुस्लिम मतांशिवाय भाजप राष्ट्रीय पातळीवर सत्तेत येऊ शकतो अशी बढाई देखील या पक्षातर्फे मारली जात असते. त्यामुळेच या राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी झफर इस्लाम यांची निवड होणे हे काहीसे आश्चर्यकारक मानले गेले.

झफर इस्लाम हे टीव्हीवर भाजपचे प्रवक्ते म्हणून




लोकांच्या समोर येत असतात. मुस्लिम असून भाजपचा हिंदुत्व अजेंडा आणि राजकारण यांचे समर्थन ते करीत आले आहेत. त्यामुळे त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिली का?

नाही आणखीही काही कारणे आहेत.

काँग्रेसचे फितूर नेते आणि आता भाजपचे खासदार ज्योतिरादित्य सिंदिया यांचे ते मित्र आहेत.

किंबहुना असे सांगितले जाते की झफर इस्लाम यांनी ज्योतिरादित्य यांच्या मनातली खळबळ टिपली. त्यांना काँग्रेसमध्ये उचित मानसन्मान व स्थान मिळत नसल्याचे त्यांनी हेरले आणि त्यांच्याबरोबर अनेक बैठका करुन त्यांना





भाजपमध्ये येण्यासाठी मन वळवले.

ही फार मोठी कामगिरी झफर इस्लाम यांनी पार पाडली.

काँग्रेसचा असा जबरदस्त मासा त्यांनी भाजपच्या गळाला लावला की त्या माशाबरोबर मध्य प्रदेशचे सरकार देखील भाजपच्या जाळ्यात आले. अशी कमाई करुन देणाऱ्या झफर इस्लाम यांना दुर्लक्षून कसे चालेल?

तर त्याची परतफेड म्हणून त्यांना हा मोबदला देण्यात आला. पूर्णवेळ नसली तरी अर्धवट राज्यसभेची मुदत त्यांना मिळेल.




राज्यसभेत भाजपकडे मुख्तार अब्बास नकवी हे मुस्लिम नेते आहेत व ते मंत्रीही आहेत.

काँग्रेसमधूनच भाजपमध्ये आलेल्या नजमा हेपुल्ला आता क्रियाशील राजकारणी नाहीत. त्यांना ईशान्य भारतात राज्यपाल म्हणून पाठविण्यात आले आणि पुनर्वसन करण्यात आले. सय्यद शहानवाझ हुसेन हा भाजपचा आणखी एक अल्पसंख्यक चेहरा.

परंतु या चेहऱ्याला मात्र न्याय मिळालेला नाही.

अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात शहानवाझ यांची चांगलीच चलती होती.

विशेष म्हणजे आपल्या सौम्य स्वभावाने त्यांनी विरोधी पक्षांमध्ये व अगदी काँग्रेसमध्ये देखील संबंध प्रस्थापित केले होते. परंतु २०१४ मध्ये ते निवडणूक हरले आणि त्यानंतर त्यांचे भाग्य जे काही फिरले ते अजून उजाडण्याची चिन्हे दिसत नाहीत.

भाजपचे प्रवक्ते म्हणून पक्षाचे समर्थन करण्याची जबाबदारी ते



इमानइतबारे पार पाडत असतात पण त्या बदल्यात त्यांना राज्यसभाही मिळू शकली नाही. त्यामुळे शहानवाझ बिचारे कोपऱ्यात पडून आहेत.

लोकसभेत भाजपचे मोठे संख्याबळ आहे परंतु एकही मुस्लिम सदस्य नाही.

शहानवाझ यांचे भाग्य कधी उजळेल कुणास ठाऊक???

# काँग्रेसचे 'जी-२३'

जगात अनेक राष्ट्रगट किंवा राष्ट्रसमूह आहेत. त्यात एकाचे नाव 'जी-२०' आहे. तर एकाचे नाव 'जी-८' आहे.

आता काँग्रेस पक्षात एक नवा गट निर्माण झाला आहे आणि मीडियाने त्याचे नामकरण 'जी-२३' असे केले आहे.

काँग्रेस पक्षात अलीकडेच एका पत्राने वादळ निर्माण केले होते.

हे पत्र या 'जी-२३' गटाने लिहिले होते व म्हणून त्याचे तसे नामकरण झाले.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते गुलाम नबी आझाद, उपनेते आनंद शर्मा, कपिल सिब्बल, लोकसभेतील शशि थरुर, मनीष तिवारी यासारख्या वरिष्ठ काँग्रेसजनांचा या गटात समावेश आहे.

पक्षाला पूर्णवेळ अध्यक्ष असावा, पक्षाची कार्यकारिणी निर्वाचित असावी आणि सध्याची देशाची परिस्थिती पाहता प्रमुख




विरोधी पक्ष या नात्याने काँग्रेसला देशासमोरच्या ज्वलंत मुद्यावर आपली भूमिका प्रभावीपणे मांडणे व त्यासाठी पक्षात नियमित विचारविनिमय करण्याची गरज त्यांनी पत्रात नमूद केली. यामध्ये या नेत्यांनी पक्षनेतृत्वाला कोणत्याही पध्दतीने आव्हान दिले नव्हते.



परंतु हा पडला काँग्रेस पक्ष !

अनेक नेतृत्वनिष्ठावंतांनी त्या पत्रावरुन एकच गदारोळ माजवला.

काँग्रेस पक्षात आणि एकंदरच राजकारणात साधेपणाबद्दल व निष्कलंक म्हणून ख्याति असलेले ए.के.अँटनी या पत्रामुळे फारच चिडलेले आढळले. खरंतर ते रागीट म्हणून नव्हे तर सदा हसतमुख व अतिशय सौम्य नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळेच त्यांनी या पत्रावर व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेने सर्वचजण नव्हे तर पत्रकर्ते - पत्र लिहिणारे नेतेही काहीसे चकित झाले.

अँटनी यांनी या नेत्यांवर टीका करताना, 'क्रुएल....व्हेरी क्रुएल' असे शब्द वापरले.

अँटनी थबकत बोलतात. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याचा असा अर्थ होता की सोनिया गांधी यांची प्रकृति बरी नसताना असे पत्र पाठविणे हा क्रूरपणा आहे. हा विश्वासघात आहे. अँटनी यांच्या त्या कठोर प्रतिक्रियेने



पत्र लिहिणारे नेते खरोखर आचंबित झाले.


अँटनी यांच्याकडून ही अपेक्षा नव्हती आणि उलट ते नेहमीप्रमाणे मध्यस्थाची भूमिका पार पाडतील अशी आमची अपेक्षा होती. परंतु त्यांच्या या प्रतिक्रियेमुळे आम्ही अतिशय दुखावले गेलो आणि विशेषतः अनेक वर्षे बरोबर काम केलेले असूनही



त्यांनी अशी कठोर भाषा वापरावी हे दुःखद आहे असे एक नेता म्हणाला.

कार्यकारिणीच्या बैठकीत आणखी एक वरिष्ठ नेत्या अंबिका सोनी यांनी तर या पत्र लिहिणाऱ्या नेत्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी अशी मागणी करुन या नेत्यांना आणखी एक धक्का दिला.

या विनाकारण कठोर प्रतिक्रियेने नाराज झालेल्या या नेत्यांनी खासगीत



आपला रोष प्रकट करताना म्हटले की अँटनी यांचा राजकीय इतिहास कुणाला माहिती नाही?

इंदिरा गांधी यांच्या विरोधात ते गेले होते. केरळमधील काँग्रेसचे सरकार त्यांनी पाडले होते आणि त्यांनी आमच्यावर टीका करावी?

अंबिका सोनी यांच्याबद्दलही या नेत्यांनी अशीच नाराजी व्यक्त केली. अंबिका सोनी या देखील अनेक वर्षे काँग्रेसबाहेर होत्या आणि त्यांनी आमच्यावर कारवाईची मागणी करावी हे अजब आहे.

हे नेते वरिष्ठ आहेत म्हणून त्यांचा आदर ठेवून आम्ही गप्प आहोत असेही हा नेता म्हणाला.


अहमद पटेल, चिदंबरम,



मनमोहनसिंग या नेत्यांनी देखील पत्र फुटण्याच्या प्रकाराबद्दल नाराजी व्यक्त केली परंतु जाहीरपणे ते बोलले नाहीत याकडेही या नेत्याने लक्ष वेधले.

दरम्यान, ताज्या माहितीनुसार या 'जी-२३' गटात आता तट पडल्याचे कळते.

सोनिया गांधी यांनी या पत्रावर



भाष्य करताना पत्रामुळे त्यांना दुःख झाले असले तरी ते सर्वजण आपले अनेक वर्षांचे सहकारी आहेत त्यामुळे त्यांचे म्हणणे आपण लक्षात घेत आहोत असे म्हटले. हे विसरुन पुढे जाण्याचे आवाहनही त्यांनी केले.


यानंतर सोनिया गांधी यांनी काही पावले उचलण्यास सुरुवात केली असून यामुळे काही मंडळी आता प्रकरण फार ताणू नये या मताचे असल्याचे समजते.

आता सोनिया गांधी यांच्याकडून या असंतुष्टांना भेट दिली जाईल अशी माहितीही कळत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात बंडोबा थंडोबा होतील असे दिसते !

## भाजप संसदीय मंडळात कुणाची वर्णी??

भाजपचे नवे अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांना पदभार सांभाळून अनेक महिने झालेले असले तरी अद्याप त्यांना पक्षसंघटनेची फेररचना पूर्ण करता आलेली नाही. सर्वात महत्वाची किंवा सर्वोच्च निर्णय करणारी समिती आहे ती 'केंद्रीय संसदीय मंडळ' किंवा 'सेंट्रल पार्लमेंटरी बोर्ड'. बारा जणांची ही समिती असते. परंतु सध्या या समितीत चार जागा रिकाम्या आहेत. अरुण जेटली, सुषमा स्वराज, अनंतकुमार या तिघांचे निधन झाल्याने आणि वेंकय्या नायडू हे उपराष्ट्रपति झाल्याने या जागा रिक्त झाल्या. त्या अद्याप





भरण्यात आलेल्या नाहीत. अध्यक्ष नड्डा यांच्याखेरीज आता उर्वरित सदस्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी,



गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथसिंग, परिवहनमंत्री नितिन गडकरी, राज्यसभा नेते थावरचंद गेहलोत, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान, संघटनमंत्री बी.एल.संतोष यांचा समावेश आहे. सध्या या रिक्त जागांबद्दल जोरदार चर्चा आहे. सुषमा स्वराज यांच्या जागी कोणत्या महिला नेत्यास नेमायचे यावर विशेष खल आहे. स्मृति इराणी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमन या दोघींमध्ये स्पष्टपणे स्पर्धा आहे. परंतु ताज्या माहितीनुसार निर्मला सीतारामन यांची वर्णी लागण्याची शक्यता वाढली आहे.

आणखी एका जागेसाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ



हे प्रबळ दावेदार आहेत. त्यांचा संसदीय मंडळात समावेश झाल्यास त्यांच्या राजकीय उंचीत आणखी वाढ होणार आहे. दक्षिणेतील एखाद्या नेत्याचाही समावेश होण्याची शक्यता आहे. संतोष हे कर्नाटकचे आहेत परंतु कदाचित आणखी एखाद्या नेत्याचा समावेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्वोच्च आणि सर्वाधिकारी समितीचे सदस्यत्व हे प्रतिष्ठेचे मानले जाते. त्यामुळेच या चार जागांवर कुणाची भरती होते याकडे लक्ष लागलेले आहे आणि कदाचित बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी त्या भरल्या जाणे अपेक्षित आहे. ■■■





# बिहार विधानसभा निवडणूक : बाजी कोण मारणार?

बिहार विधानसभेची निवडणूक नोव्हेंबर महिन्याच्या आसपास होत आहे. त्यासाठीच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. प्रश्न हा आहे की गेली पंधरा वर्षे सत्तेत असलेले नीतीशकुमार आता चौथ्या वेळी मुख्यमंत्री होतात की नाही ? तसे झाल्यास तो एक विक्रम ठरणार आहे. बिहारचे राजकारण हे नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे. गेल्या वेळच्या म्हणजेच २०१५च्या विधानसभा निवडणुकीचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. निवडणुकीच्या आधी नीतीशकुमार यांनी भाजपबरोबरचे संबंध तोडले होते आणि त्यांचे प्रमुख राजकीय प्रतिस्पर्धी लालूप्रसाद यांच्याशी हातमिळवणी केली होती. ते जसे चकित करणारे होते त्याचप्रमाणे लालूप्रसाद यांचे पुत्र आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यांच्याविरुध्द झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाचे निमित्त करुन त्यांनी दोन वर्षातच लालूप्रसाद यांच्याशी राजकीय संबंध तोडले होते आणि चोवीस तासांच्या आता पुन्हा भाजपबरोबर हातमिळवणी करुन पुढील तीन वर्षे म्हणजेच आतापर्यंत बिहारचे मुख्यमंत्रीपद कायम ठेवून राज्याचे संचालन केले. या काळात नीतीशकुमार यांना विश्वासघाताचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून हेटाळणीला आणि अत्यंत प्रखर अशा टीकेला सामोरे जावे लागले. परंतु त्यांनी ते सर्व सहन करीत मुकाटपणे राज्यकारभार केला. हे त्यांचे सातत्य वाखाणण्यासारखेच म्हणावे लागेल. या काळात भाजपकडून देखील त्यांना भरपूर कोंडीत पकडण्याचा किंवा त्यांच्या या भाजपवर संपूर्ण परावलंबी राहण्याचा फायदा घेण्याचे प्रकार केले. त्यालाही त्यांनी यशस्वीपणे तोंड दिले आणि ही पाच वर्षे कशीबशी पूर्ण केली.

नीतीशकुमार यांचे राजकारण बेभरवशाचे आणि त्याचबरोबर व्यक्तिकेंद्री आहे. त्यांच्यादृष्टीने त्यांची प्रतिमा ही सर्वोच्च आहे. भले या प्रतिमेला त्यांच्या लालूप्रसाद यांच्याशी केलेल्या प्रतारणेमुळे तडा गेलेला असो. परंतु त्यांनी हे सर्व सहन करीत आणि राजकारणातले सातत्य राखत पाच वर्षांची आपली मुख्यमंत्रीपदाची कारकिर्द पूर्ण केली आणि बिहारच्या राजकारणात त्यांना अन्य कुणी पर्याय ठेवलेला नाही. एका पूर्णतया नकारात्मक स्थितीत देखील त्यांच्या गाठीला हे सकारात्मक भांडवल जोडले गेले आहे. त्यामुळेच भाजपला देखील त्यांना ब्लॅकमेल करणे सोपे राहिलेले नाही. भाजपने कितीही आव आणला तरी नीतीशकुमार यांच्याशिवाय त्यांना बिहारमध्ये स्वबळावर विजय मिळणे तेवढे सोपे नाही. त्यामुळेच नीतीशकुमार यांनी त्यांच्या राजकारणाने भाजपलाही त्यांच्यावर अंशतः का होईना परावलंबी केलेलेच आहे. त्यामुळेच आगामी निवडणूक ही उत्कंठावर्धक राहणार आहे हे निःसंशय !

नीतीशकुमार यांनी लालूप्रसाद यांना दगा दिल्यानंतर मुकाटपणे बिहारच्या राजकारणावर लक्ष केंद्रित केले. त्यांच्या होणाऱ्या टीकेकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले आणि स्वतःला पुन्हा प्रस्थापित केले.२०१७ मध्ये त्यांनी लालूप्रसाद यांच्याबरोबर काडीमोड घेतला. त्यानंतर लालूप्रसाद यांनी काहीकाळ

अकाडतांडव केले परंतु त्यांच्याही घरातच कलह सुरु झाल्याने त्यांना आपोआपच नीतीशकुमार यांच्याकडे दुर्लक्ष करावे लागले. दुसरीकडे केंद्र सरकार, तपास यंत्रणा आणि न्यायसंस्था यांच्या तिहेरी कोंडीत ते सापडले आणि न्यायालयाने त्यांना भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणात तुरुंगवासात पाठवले. त्यांना जामीन देखील मिळू शकलेला नाही अशी त्यांची स्थिती करण्यात आली. हे ऐकायला विचित्र वाटेल परंतु त्यांना जामीन मिळू शकला नाही. तुरुंगात त्यांची प्रकृती बिघडल्याने अखेर त्यांना रांचीच्या सरकारी रुग्णालयात हलविण्यात आले आणि तेथे त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. परंतु निवडणुकीसाठी व प्रचारासाठी त्यांना जामीन मिळेल अशी शक्यता दिसत नाही. त्यामुळे ही निवडणूक लालूप्रसाद यांच्या अनुपस्थितीत होण्याची शक्यता आहे. लालू जेरबंद राहतील हे भाजपने सुनियोजितपणे केले आहे आणि ती बाब नीतीशकुमार यांच्या पथ्यावर पडणार आहे.


लालूप्रसाद यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या राष्ट्रीय जनता दलाची सूत्रे त्यांचे चिरंजीव तेजस्वी सांभाळत आहेत. प्रदेश राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष जुनेजाणते नेते जगदानंद या ठाकूर नेत्याकडे नेतृत्व आहे. रघुवंश प्रसादसिंग हे ठाकूर नेतेही अद्याप लालूप्रसाद निमित्ताने ते पुन्हा नीतीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलात जाण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती मिळते. त्यांचे खास निकटवर्ति के.सी.त्यागी अद्याप संयुक्त जनता दलातच आहेत आणि ते त्यांना पुन्हा नीतीशकुमार यांच्यासमवेत आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे समजते. लालूपुत्र तेजस्वी यादव यांच्या राजकारणाला कंटाळून रघुवंशबाबूंनी राष्ट्रीय जनता दलाच्या पदाचा राजीनामा दिला आहे आणि तेही नीतीशकुमार यांच्या पक्षाच्या वाटेवर असल्याचे सांगण्यात येते.

असे झाल्यास लालूप्रसाद यांना तो मोठा झटका असेल. तसेही काही आमदार अलीकडच्या काळात फुटून संयुक्त जनता दलाकडे गेले आहेत. त्यातले पाच आमदार हे विधान परिषदेचे होते परंतु दोन आमदार विधानसभेतले होते. एक गोष्ट येथे मान्य करावीच लागेल की लालूप्रसाद तुरुंगात, त्यांच्या अननुभवी व अपरिपक्व मुलाकडे(तेजस्वी) पक्षाची सूत्रे, लालूप्रसाद यांच्या पत्नी राबडीदेवी आणि तेजस्वी यांच्या भरवशावर हा पक्ष सध्या चालू असूनही अद्याप या पक्षात फारमोठी फाटाफूट झालेली नाही. किंबहुना अजिबातच झाली नाही असे म्हणावे लागेल. त्यामुळे आगामी निवडणुकीत भले लालूप्रसाद सक्रिय नसले तरी



यांच्याबरोबरच आहेत. लालूप्रसाद यांची जी व्होटबँक आहे जी प्रामुख्याने मुस्लिम व यादव यांची आहे (एमवाय कॉंबिनेशन) ती अजुनही पक्की आहे. त्यामुळे त्यांची मते राष्ट्रीय जनता दलाला मिळणार असे सांगितले जाते. परंतु नीतीशकुमारही त्यांच्या राजकीय चाली चालतच आहेत आणि ते काही मुस्लिम व यादव नेत्यांना त्यांच्या संयुक्त जनता दलाकडे खेचत आहेत. लालूप्रसाद यांच्याशी दगा केल्यानंतर संयुक्त जनता दलाचे वरिष्ठ नेते शरद यादव यांनी नीतीशकुमार व पक्षाशी संबंध तोडले होते. त्यानंतर ते विरोधी पक्षांबरोबर राहिले. परंतु विधानसभा निवडणुकीच्या त्यांची व्होटबँक पक्की राहील असे सांगितले जाते. ती तोडण्यात नीतीशकुमार यांना अद्याप अपेक्षित यश मिळालेले नाही.

बिहारमधली स्थिती तशी स्पष्ट आहे. नीतीशकुमार हेच प्रमुख नेते आहेत. बिहारचे राजकारण 'एकध्रुवीय' झाले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण नीतीशकुमार यांच्यासमोर कुणी राजकीय प्रतिस्पर्धीच नाही अशी परिस्थिती आहे. भाजपकडे बिहारमध्ये एकमेव चेहरा आहे व तो सुशीलकुमार मोदी यांचा आहे परंतु त्यांना पुढे करुन भाजप निवडणूक जिंकू शकेल अशी स्थिती नाही. बिहारमधील भाजपच्या प्रमुख



रघुवंश प्रसाद सिंग



रविशंकर प्रसाद



आर. के. सिंग



रामविलास पास्वान

नेत्यांमध्ये गिरिराजसिंग(भूमिहार), रविशंकर प्रसाद (कायस्थ), आर.के.सिंग (ठाकूर - राजपूत) हे नेते आहेत. परंतु बिहारचे नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यात नाही.

गिरिराजसिंग हे त्यांच्या कट्टर हिंदुत्वाच्या भूमिकेमुळे वादग्रस्त आहेत. आर.के.सिंग हे माजी केंद्रीय गृहसचिव व सध्या विद्युतमंत्री आहेत. परंतु माजी नोकरशहा यापलीकडे त्यांचे बिहारमध्ये फारसे स्थान नाही. रविशंकर प्रसाद हे बिहारमधील परंपरागत रा.स्व.संघ व भाजपच्या घराण्यातले असले तरी ते मुख्यतः दिल्लीशी निगडित राहिले आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर त्यांचा राजकीय पाया फारसा मजबूत नाही. भाजपकडे स्थानिक पातळीवर सध्या उपमुख्यमंत्री असलेले सुशील मोदी वगळता अन्य कुणी चेहरा नाही. त्यामुळेच भाजपला नाईलाजास्तव नीतीशकुमार यांच्या नेतृत्वाखालीच निवडणूक लढावी लागणार आहे आणि बहुमत मिळाल्यानंतर त्यांनाच मुख्यमंत्री करावे लागणार आहे.

बिहारमध्ये लढत एकतर्फी दिसत असली तरी थोडे खोलात गेल्यानंतर त्यातील कमजोर दुवे लक्षात येतात. बिहारमध्ये भाजप, नीतीशकुमार यांचा संयुक्त जनता दल आणि रामविलास पास्वान यांचा लोकजनशक्ति पक्ष या तीन पक्षांची आघाडी आहे. नीतीशकुमार आणि पास्वान यांच्यात छत्तीसचा आकडा आहे. त्यांचे मतभेद इतके टोकाचे आहेत की विधानसभा निवडणुकीपूर्वी बिहारमध्ये राष्ट्रपति राजवट लावून मग निवडणूक घेतली जावी अशी मागणी रामविलास यांचे चिरंजीव व खासदार आणि त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष चिराग पास्वान यांनी केली होती. यावरुन दोन्ही पक्षांमधील संबंध किती टोकाच्या तणावाचे आहेत हे लक्षात येईल. सध्या या पक्षातही पेचप्रसंग आहे. रामविलास पास्वान हे सध्या प्रचंड आजारी आहेत आणि रुग्णालयात आहेत. ते निवडणुकीत किती सक्रिय राहतील याबाबत गंभीर प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे त्यांच्या पक्षाचे संचालन सध्या त्यांचे तरुण चिरंजीव चिराग पास्वान हे करीत आहेत. घराणेशाहीने चालणारे



जे पक्ष आहेत तसाच प्रकार या पक्षातही आहे. त्यामुळे चिराग पास्वान या पक्षाची नौका कितीकाळ हाकू शकतील हाही एक प्रश्नच आहे. ते त्यांच्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून नीतीशकुमार यांच्या विरोधात उभे आहेत. आपला पक्ष केवळ भाजपशी संबंध ठेवेल आणि जागावाटपही भाजपबरोबर केले जाईल असे त्यांनी आताच जाहीर केले आहे. म्हणजे जेव्हा जागावाटपाची चर्चा होईल तेव्हा जागावाटप प्रामुख्याने संयुक्त जनता दल आणि भाजपमध्येच होईल.

भाजप त्यांच्या वाट्यातून रामविलास पास्वान यांच्या पक्षाला जागा देईल. पास्वान यांची दलित व्होटबँक आहे आणि ती देखील अतिशय पक्की आहे. त्यामुळे पास्वान यांना नगण्य मानता येणार नाही. लोकसभेत त्यांनी सहा जागा जिंकल्या होत्या आणि एकही जागा ते हरले नव्हते हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळेच मतांच्या समीकरणात किंवा बेरजेत पास्वान यांचे स्थान निर्णायक आणि महत्वाचे आहे. नीतीशकुमार यांना



देखील त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्यामुळे रामविलास पास्वान कितपत सक्रिय राहतात त्यावर त्यांच्या पक्षाचे भवितव्य अवलंबुन राहणार आहे. बिहारमध्ये लालूप्रसाद यांनी 'महागठबंधन' स्थापन केले आहे. यामध्ये राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, राष्ट्रीय लोकसमता पार्टी(उपेंद्र कुशवाह) यांचा समावेश होता. हिंदुस्तानी आवाम मोर्चा हा माजी मुख्यमंत्री जीतनराम मांझी यांचा पक्षही या आघाडीत होता परंतु नुकतेच त्यांनी या महागठबंधनशी संबंध तोडून पुन्हा नीतीशकुमार यांचा आश्रय घेतला आहे. आता ते भाजप आघाडीत सामील झाले आहेत. ते मूषाहर समाजाचे आहेत. हा एक अतिमागास समाज मानला जातो. परंतु या समाजापलीकडे मांझी यांना फारसा पाठिंबा नाही. अतिमागस (एमबीसी) जातींमध्ये नीतीशकुमार यांना अद्याप पाठिंबा आहे आणि तो त्यांचा राजकीय 'प्लस पॉइंट' आहे. परंतु दोन्ही कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी लेनिनवादी पक्षानेही या महागठबंधनमध्ये सामील होण्याचा निर्णय जाहीर केला आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा बिहारमध्ये अजुनही विशिष्ट भागात प्रभाव आहे. त्यामुळे त्याचा लाभ महागठबंधनला होईल.

बिहार विधानसभेची मुदत २९ नोव्हेंबरला संपत आहे. त्यामुळे त्याच्या आत तेथे नवीन विधानसभा अस्तित्वात यावी लागेल. करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर होणारी ही पहिलीच निवडणूक असेल हेही एक वैशिष्ट्यपूर्ण असेल. वर उल्लेख केल्याप्रमाणे बिहारमधील निवडणूक एकध्रुवीय म्हणजे नीतीशकुमार या एका ध्रुवाभोवती केंद्रित राहणारी असेल हे तर स्पष्ट चित्र आहे. त्यांच्या स्पर्धेत स्थानिक म्हणजेच बिहारच्या पातळीवरील कुणीही नेता नाही आणि तीच नीतीशकुमार यांची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. सामाजिक समीकरणातही त्यांनी अतिमागास जाति, कुर्मी आणि अन्य मध्यम जातींना बरोबर घेतले आहे. ते स्वतः कुर्मी आहेत. परंतु आपले नेतृत्व व व्यक्तिमत्व आता जातीच्या पलीकडचे आहे असे ते मानतात आणि दाखविण्याचा प्रयत्न करीत असतात. तसेच जातिआधारित राजकारणाने पिंजलेल्या बिहारच्या राजकारणात आपल्याला वरिष्ठ जातीतूनही पाठिंबा मिळतो असा नीतीशकुमार यांचा दावा आहे. तो काही प्रमाणात खरा आहे कारण बिहारमधील शहरी वर्गात त्यांनी स्वतःची एक उदार, मध्यममार्गी व सौम्य सभ्य नेता म्हणून प्रतिमा तयार केली आहे व त्याचा फायदा त्यांना महिला आणि तत्सम वर्गात मिळतो. भाजप हा मुख्यतः उच्चजातींचा पक्ष असल्याने व त्यांची व्होटबँक न फुटणारी असल्याने तिचा फायदा नीतीशकुमार यांना मिळणार आहे. आगामी निवडणूक नीतीशकुमार यांच्या नेतृत्वाखालीच लढणार असून तेच पुढचे मुख्यमंत्री असतील असे भाजपचे निवडणूक प्रमुख अमित शहा यांनी पूर्वीच जाहीर केले आहे. त्यामुळे हे सर्व सकारात्मक घटक नीतीशकुमार यांच्या बाजुने आहेत. परंतु करोनाची स्थिती हाताळण्यात नीतीशकुमार यांनी फारसे प्रशंसनीय काम केले नसल्याची तक्रार आहे. त्यांच्या पक्षातील काही नेत्यांबद्दलही भ्रष्टाचाराचे आरोप झालेले आहेत. तसेच एकंदर राष्ट्रीय पातळीवर भाजपविरुध्द जो मोठा असंतोष आढळून येतो त्याचे पडसाद बिहारमध्ये तीव्रतेने उमटतील असे मानले जाते. त्यामुळे राज्यकारभाराच्या पातळीवर आणि विशेषतः लोकांच्या समस्यांच्या पातळीवर नीतीशकुमार यांच्या सरकारची कामगिरी फारशी समाधानकारक नाही. स्थलांतरित कष्टकऱ्यांबाबत त्यांनी घेतलेली भूमिकाही वादग्रस्त ठरली होती आणि ते जबाबदारी झटकत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. परंतु लोकांमध्ये नाराजी असूनही प्रबळ प्रतिस्पर्धी व पर्याय नसल्याने लोकांना नाईलाजास्तव नीतीशकुमार यांच्या मागे जावे लागेल असे चित्र तूर्तास किंवा प्राथमिक दृष्ट्या दिसते.

# गृहमंत्र्यांची कौतुकास्पद कामगिरी

वैभव तुमाने



कोरोनाचे महाभयंकर संकट. संसर्गजन्य महामारी. घरातला माणूसच घरातल्या व्यक्तींना घाबरायला लागला. संशयाने बघू लागला. स्पर्श, सहवास टाळू लागला. क्षणार्धात अविश्वासाचे आणि भितीचे वातावरण तयार झालेलं. त्यात लॉकडाऊनची घोषणा झाली. घरातनं कुणी बाहेर पडायचं नाही. जीवनावश्यक वस्तुही काही तासच मिळणार. बंधन व नियमांची भली मोठी श्रृंखला तयार झाली. न पाळावे तर जीवाला धोका आहे. पाळावे तर चूल कशी पेटायची हा प्रश्न आहे. सर्व माणसांची आणि विशेषतः गोरगरीब व सामान्य जनतेची अवस्था ‘इकडे आड तिकडे विहिर’ अशी झाली. सरकारला स्वतःचे निर्णय जबरदस्तीने का होईना राबविण्यासाठी पोलिस हीच यंत्रणा हाताशी व उपलब्ध असलेली. पण शेवटी पोलिसही माणूसच आहे. त्यालाही त्याचा जीव प्यारा आहे. इतरांप्रमाणे तोही मरणाला घाबरणारा तरीही धैर्याने सामोरा जाणारा आहे. त्याच्यातले हे धैर्य वाढीला लागावे, त्याच्या दंडुकेशाहीच्या प्रभावाने जनतेकडून नियमांचे पालन व्हावे यासाठी पोलिसी यंत्रणेत आत्मविश्वास व आत्मबळ वाढवून त्यांच्याकडून अधिक कौशल्यपूर्ण काम करुन घेणे आणि तेही या भयंकर संकटाच्या काळात हे मोठे आव्हान होते. राज्याचे गृहमंत्री श्री. अनिल देशमुख यांनी मोठ्या चातुर्याने व सारे कसब पणाला लावून ही आव्हानात्मक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

वास्तविक श्री. अनिल देशमुख यांना मंत्रीपदाच्या कामाचा अनुभव असला तरी गृहमंत्रीपदाचा अनुभव नव्हता. गृहमंत्री हे मोठे काटेरी मुकुट असलेले पद आहे. समाजातल्या सगळ्या वाईट प्रवृत्तींमधून ज्या अनेक निंदनीय व घृणा वाटावी अशा ज्या घटना घडतात त्यांचे सर्व खापर, संबंध असो वा नसो गृहमंत्र्याच्या माथ्यावरच येऊन फुटते आणि जो तो गृहमंत्र्यांचा राजीनामा मागायला तयारच असतो, सरसावून पुढे येत असतो. अशा संकटसमयी श्री. अनिल देशमुख यांनी महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांचा दौरा करुन पोलिस यंत्रणेचे मनोबल तर वाढविलेच पण त्यांच्या अनेक समस्यांचा जागीच निपटाराही केला. या कामात श्री. देशमुख यांच्या सौभाग्यवती आरती याही मागे राहिल्या नाहीत. त्यांनीही महिला पोलिसांची, पोलिसांच्या घरातील महिलांची, मुलाबाळांची कधी समक्ष तर कधी फोनवरुन चौकशी, विचारपूस करुन अडीअडचणी सोडविल्या. २२ मार्चला पहिले लॉकडाऊन जाहीर झाले. तेव्हापासून गृहमंत्र्यांनी सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी, एस.पी., डीआयजी, लोकप्रतिनिधी आणि अगदी रस्त्यावर दिवसरात्र उभे राहून आपल्या जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या पोलिसांशी संवाद, चर्चा सुरु केली. त्यातून अनेक प्रश्न, समस्या समजण्यास मदत झाली. चर्चेतूनच समस्येवरचे उपायही मिळत गेले. त्याप्रमाणे धोरण व निर्णयांची आखणी श्री. देशमुख साहेब करीत राहिले.

मुंबईतील धारावी झोपडपट्टी आणि मालेगाव येथे सर्वात जास्त प्रादुर्भाव सुरुवातीला होता. तीन-तीन वेळा गृहमंत्री स्वतः त्या ठिकाणी गेले. समोरच्या प्रत्येक माणसाशी बोलून त्याचे म्हणणे, दुःख, गाऱ्हाणे, तक्रार समजून घेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना देखील स्वतः गृहमंत्री आपल्याला भेटताहेत, बोलतोय हे पाहून अधिक काम करण्याचे सामर्थ्य उत्पन्न झाले. त्यांचा थकवा, कंटाळा मावळला. पोलिसांनी मोठ्या हिमतीने व धैर्याने समोर येऊन काम केले. त्यामुळे लॉकडाऊन यशस्वी झाला. अनेक पोलिस व अधिकारी यांना कोरोनाची बाधा झाली. २७ ऑगस्ट पर्यंत पोलिस दलातील १२४ कर्मचारी आणि १५ अधिकारी असे एकूण १३९



कर्मचारी मृत्यूमुखी पडले. पोलिस दलातील तीन हजाराहून अधिक व्यक्तींना या संसर्गाची बाधा झाली. या मृत झालेल्या पोलिसांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ६५ लाख रुपयांची मदत सरकार देणार आहे तशी धोरणात्मक व्यवस्था श्री. देशमुख यांनी मंत्रीमंडळाकडून करवून घेतली.

गृहमंत्री देशमुख केवळ पोलिस व त्यांच्या कुटुंबियांनाच भेटले असे नाही. अनेक घराघरात जाऊन त्यांनी रोजच्या अन्नाची व्यवस्था करणारा धान्य, डाळी, तेल, साखर यासारखा शिदा पोहचविला. तो व्यवस्थितपणे मिळतो की नाही याची चौकशी केली. पुण्याला फॉरेनसिक लॅब स्थापन होऊन ६५ वर्षे झाली होती. आजपर्यंत कोणत्याही गृहमंत्र्यांनी या लॅबला भेट दिली नव्हती आणि तिथल्या समस्या समजून घेतल्या नव्हत्या. श्री. देशमुख यांनी पहिल्यांदा या लॅबला भेट देवून त्यांच्या समस्या सोडविण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. जे वृद्ध, अपंग घरी एकटेच आहेत. त्यांना भेटून वा फोनवरुन विचारपूस करुन त्यांना औषधपाण्याची सोय केली. लोकांना सोयीसाठी सेंट्रल हेल्पलाईन क्रमांक दिला. त्यावर येणाऱ्या फोनची त्वरित दखल घेऊन पाहिजे ती मदत पाठविली. अनेकदा रस्त्यावरुन कारने जात असताना रस्त्यावर उभ्या राहिलेल्या पोलिसाजवळ गाडी उभी करुन त्याच्या समवेत चहा तर घेतलाच पण त्याची दुःखेही समजून घेतली. यातून तळागाळात काम करणाऱ्या माणसांच्या व पोलिसांच्या समस्यांची यथार्थ जाणीव त्यांना झाली असे म्हटले तर ते वावगे ठरु नये. एका पोलिसाचा तर वाढदिवसच गृहमंत्र्यांनी स्वतः केक नेऊन साजरा केला.

## गृहविभागाने घेतलेले महत्वाचे निर्णय (सामान्य)

१. चाईल्ड पोर्नोग्राफी विरोधात ब्लॅकफेस नावाने मोहीम उघडली असून संबंधित गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. २. लॉकडाऊनच्या काळात वाढलेल्या घरगुती हिंसाचार आणि महिला अत्याचाराच्या तक्रारींची गंभीर दखल घेत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात आदेश दिले आहेत. ३. नॅशनलाईज बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देत नसल्यास अशा बँकांची गंभीर दखल घेऊन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. ४. कोरोनाच्या अनुषंगाने वसई येथे होणारा तबलिगी समाजाच्या धार्मिक कार्यक्रमला परवानगी नाकारली. ५. तबलिगी समाजाच्या मरकजच्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाल्याप्रकरणी आणि लॉकडाऊनचे नियम तोडल्याप्रकरणी १५० जणांवर गुन्हे दाखल. ६. राजगृह या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानाला २४ x ७ संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. ७. राजगृह या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानावर हल्ला करण्याच्या प्रकरणात आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली. ८. राज्यात उद्योगधंदे पुन्हा सुरू झाल्याने परराज्यातून येणाऱ्या सर्व मजुरांची कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग्य नोंद व थर्मल तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ९. आंध्रप्रदेश सरकारने केलेल्या दिशा कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात नवीन कायदा करण्यात येणार आहे. १०. Covid१९ वर रामदेव बाबांच्या पतंजलीने बनवलेल्या कोरोनिल औषधाची महाराष्ट्रात दिशाभूल करणारी जाहिरात केली तर त्यांच्यावर नियमानुसार गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. ११. कोरेगाव भीमा प्रकरणातील ६४९ पैकी ३४८ गुन्हे, मराठा आंदोलनातील ५४८ पैकी ४६० गुन्हे आणि नाणार आंदोलनातील ३ गुन्हे मागे घेण्यात आले आहे. १२. मागील सरकार सत्तेत असतांना सत्तेचा गैरवापर करून राजकीय पक्षांच्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मोबाईल फोन टेप केले होते,




त्याप्रकरणी कडक कार्यवाही करण्यात येईल. १३. राज्यातील गुटखाविक्रीच्या सूत्रधारांना शोधून त्यांच्यावरच मोकांतर्गत कारवाई करणार. गुटक्याचा प्रतिबंधित साठा किंवा वाहतूक होताना आढळून आल्यास तेथील अन्न व औषध प्रशासनाच्या व पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावरही कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले. १४. १९३२ साली बंद करण्यात आलेले अश्वपथक तब्बल ८८ वर्षानंतर मुंबईत पुन्हा २६ जानेवारी २०२० पासून ३० अश्वांचे अश्वपथक सुरू करण्यात येत आहे. १५. मोहखेडी, कलंभा, वाढोना, गोन्ही ता. काटोल भागातील शेतकऱ्यांचे गारपिटीने मोठया प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानीचे सर्व्हे तात्काळ करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. १६. अभिनेता सुशांत सिंग राजपूत आत्महत्या प्रकरणी चौकशी समितीची स्थापना केली. १७. कोरोना संबंधित औषधींचा



काळाबाजार होऊ नये यासाठी खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले. १८. राज्य सरकार ने सर्व उपहार गृह बंद ठेवण्याचे निर्देश दिले असताना हॉटेल सुरू ठेवणाऱ्या नागपूर येथील हल्दीराम (सदर) व सूजल सावजी (बजाज नगर) या ठिकाणी धाड टाकत कड़क कारवाईचे आदेश दिले. १९. कोरोनाच्या अनुषंगाने बाजारात मास्कचा तुटवडाही निर्माण होऊ नये यासाठी राज्यातील सर्व मध्यवर्ती कारागृहांमध्ये कैद्यांद्वारे मास्कनिर्मिती करण्यात येत आहे. २०. वांद्रे प्रकरणी जमावबंदीचे नियम मोडणाऱ्या विनय दुबेसह १० जणांना अटक करण्यात आली आहे. २१. पर्यटन व्हिसाचा गैरवापर केल्याप्रकरणी १५६ तबलिगीवर गुन्हे दाखल. २२. नागपूर आणि गोंदिया जिल्ह्यांच्या खरीप हंगामाच्या नियोजनाबाबत शेतकऱ्यांना अडचण येऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. २३. पंजाब येथील लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीतून २०० विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात आणले. २४. काटोल विधानसभा क्षेत्रातील कापूस खरेदी केद्रांना भेट देऊन शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त कापूस खरेदी करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना निर्देश दिले. २५. शांताबाई पवार यांचा पक्षातर्फे १ लाखचा धनादेश व साडी चोळी देऊन सन्मान केला. २६. प्लाझ्मा थेरपीच्या नावाखाली काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. २७. गोंदिया जिल्ह्यातील दरेकसा (ता.सालेकसा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा लोकार्पण सोहळा ऑनलाइन पद्धतीने पार पडला. २८. गोंदिया येथे जिल्हा परिषद कार्यालयात महिला व बाल विकास भवनाचे उद्धाटन केले.

## गृहविभागाने घेतलेले महत्वाचे निर्णय (पोलीस)

१. डिसेंबर अखेर पोलीस दलावरील ताण कमी करण्यासाठी पोलीस दलात विविध पदांवर १२,५३८ पदांची भरती. २. कोरोनाच्या आव्हानात्मक परिस्थितीत फ्रंटलाईनवर काम करणाऱ्या पोलिसांना आपत्ती सेवा पदक. ३. कोरोनाच्या काळात पोलिसांच्या सर्व प्रकारच्या मदतीसाठी जिल्हानिहाय एक नोडल अधिकारी आणि विशेष कोविड-१९ हेल्पलाईन सुरू ४. कोरोनाच्या लढ्यात शहीद झालेल्या पोलिसाच्या कुटुंबीयांना सेवानिवृत्तीपर्यंत सरकारी निवासात राहता येईल. ५. कोरोना झालेल्या पोलिसांच्या आरोग्यासाठी जिल्हानिहाय स्वतंत्र कोरोना दक्षता कक्ष. ६. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील ३५०० कैद्यांना त्यांच्या घरापर्यंत सोडण्यात येईल. ७. पोलीस दलावरील ताण कमी करण्यासाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २० कंपन्यांची मागणी. ८. पोलीस आणि कोरोना योध्यांवर हल्ले करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश. ९. कोरोनाच्या लढ्यात राज्यातील पोलिस दलातील कर्मचारी-अधिकाऱ्यांचा दुर्दैवानं मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना ६५ लाख सानुग्रह अनुदान देण्यात येणार. १०. मुंबई पोलिसांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि गस्तीसाठी मदतगार ठरेल अशा #segway प्रणालीचे अनावरण करण्यात आले. ११. मुंबई पोलीस दलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून त्यांना मास्क व सॅनिटायझरचे देण्यात आले. १२. कोरोनाच्या संभाव्य रुग्णांना पकडताना पोलिसांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई पोलिसांना शासनाकडून "पर्सनल प्रोटेक्शन इक्विपमेंट" चे देण्यात आले. १३. पालघर प्रकरण अफ़वेतून घडले, हे सीआयडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी १५४ जणांना अटक करण्यात आली असून पुढील कार्यवाही कोर्टात सुरू आहे. १४. कोरोनाचा संसर्ग तुरुंगात



होऊ नये म्हणून जवळपास १२ हजार कैद्यांना पॅरोल वर सोडण्यात आले. १५. होमगार्डचा कर्तव्यभत्ता ३०० वरून आता ५७० रुपये प्रतिदिन. १६. होमगार्ड पदासाठी वर्षातून किमान ५० टक्के रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट १७. होमगार्डची वयोमर्यादा ५५ वरून ५८ वर्षे करण्यात आली. १८. होमगार्डला गणवेश किट भत्त्यासाठी रकमेत २५०० रुपये वाढ करण्यात आली. १९. २६/११ रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ऐतिहासिक शौर्य गाजवणाऱ्या १४ ही अधिकाऱ्यांना महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये पदोन्नती देण्यात येत आहे. २०. कारागृहातील वाढत्या गुन्हेगारीला रोखण्यासाठी, कारागृहात भ्रमणध्वनी संच, तंबाखू व इतर नशेचे पदार्थ पोहोचू नाही यासाठी प्रत्येक कारागृहात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. २१. कोरोनाच्या अनुषंगाने दाट लोकवस्ती असलेल्या भागातील लोकांच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी मुंबई पोलीसांच्या ताफ्यात विशेष ड्रोन तैनात. २२. पोलीस आयुक्तांनी शहरासाठी स्वतंत्र 'सायबर पोलीस ठाणे' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटचे पान

## नारायणरावांच्या कर्तृत्वाची निशाणी

# मोडक सागर धरण



काही वर्षांपूर्वीची पावसाळ्यातली मुंबई जर आपण आठवली तर खूप वेगवेगळी चित्रं आपल्या नजरेसमोर येतात. मला वाटतं १९७० च्या काळापर्यंत मुंबई शहरामध्ये पावसाळ्याच्या तोंडावर जे रेल्वेपूल जायचे रस्त्यांच्या वरून तिथे आडवी होर्डिंग लागायचे आणि त्याच्यावर जाहिरात असायची टायर कंपनीची. त्यामध्ये मॉन्सून मुंबईमध्ये दाखल होण्याची तारीख दिलेली असायची. पावसाळ्यापूर्वी आपल्या वाहनांची काळजी घ्या, टायरची काळजी घ्या, असा मजकूर असायचा. जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस येणार, हा अंदाज हवामान खात्याने सांगितलेला असायचा. पावसाचं आपल्याशी डेटिंग एखादं दोन दिवस अलिकडेपलीकडे व्हायचं, त्या खात्याचे अंदाज चुकल्याबद्दल त्याकाळी सुद्धा खूप विनोद निर्माण व्हायचे. म्हणजे त्यांनी सकाळपासून धुवादार पाऊस येणार असं सांगायचं, आपण सगळा जामा निमा करून छत्री, रेनकोट, गमबूट, पूर्वी ते गुडघ्यापर्यंत येणारे बाटाचे गमबूट फार प्रसिद्ध होते. घराबाहेर पडावं आणि लख्ख ऊन पडलेलं असावं. त्यामुळे गमबूट घालून उन्हात चालताना लोक आपल्याकडे बघून सुंदर ते ध्यान म्हणत असावे असं वाटायचं. ओपनिंग पेयरनं दमदार फलंदाजी करावी तसा खेळ मग सुरुवातीला पाऊस करायचा. महानगरीला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण, तलाव क्षेत्रात पावसान जोर धरला तर आपला जीव भांड्यात पडायचा. पण अचानक पाऊस नाहीसा होऊन जायचा. पावसाने ओढ दिल्यावर बळीराजाचा जीव टांगणीला लागायचा पण शहरी लोकांना फिकीर असायची त्यांच्या सबंध वर्षभर लागणाऱ्या पाण्याची. मग फार अंतर पडले की पाणी कपातीचं संकट येणार म्हणून बातम्या सुरु व्हायच्या. काही वेळा तर दहा टक्के, वीस टक्के पाणी कपात जाहीर सुद्धा व्हायची. असंच वातावरण राहिलं तर काय संकट समोर येईल, या विचाराने सामान्य माणसाची झोप उडून जायची. मग ध्यानीमनी नसताना कुठल्या तरी वाऱ्यांचे थवे बंगालच्या किंवा इतर उपसागरातून पुढे निघाले आहेत. आता बेसुमार पर्जन्यवृष्टी होणार, समुद्र खवळणार, भरतीच्या वेळी मुंबापुरी, तुंबापुरी होणार, हे सगळं दर वर्षी घडत राहतं. सायन, माटुंगा, हिंदमाता, मिलन सबवे, लोकलचे ट्रॅक, हे सर्व पाण्याखाली गेल्याचं बघायला मिळतं. सहनशील मुंबईकर हे सगळे आघात झेलत असतो. त्याचं लक्ष मात्र लागलेलं असतं, भातसा, तानसा, वैतरणा, पवई, मोडक सागर धरणातल्या पर्जन्य वृष्टीवर.

मग वाढ होत गेली तर त्याची पाण्याची पातळी किती फुटापर्यंत वाढली आहे, हे मोजमाप रोजच्या रोज वाचलं जातं आणि मग मुंबईकर सुखावतात. शेवटी मग धरणे तुडुंब भरतात, पाणी कपात मागे घेण्याची महापालिकेकडून घोषणा होते. सारखं त्याच्याबद्दल मोठ्यान 'मुंबई स्पिरीट'च्या गोष्टी रंगवून सांगितल्या जातात.

अलीकडच्या काळात 'क्लायमेट चेंज' आणि 'ग्लोबल वॉर्मिंग' यामुळे आपल्या जगण्यातलं हे पावसाळ्यातलं थ्रील सुद्धा हिरावून घेतलं. वर्षभर आता पाऊस कोणतीही शिस्त नं पाळता त्याच्या मर्जीने केंव्हाही येतो आणि गायबही होतो. यंदा सुद्धा शंभर टक्क्याहून अधिक पाऊस पडण्याचा अंदाज जाहीर झाला आहे. मुंबईला पाणी पाजणारा एक महत्वाचा डॅम म्हणजे लोअर वैतरणा, आता त्याचं नाव 'मोडक सागर'. इतर धरणांना नावं होती भातसा, तानसा, अपर वैतरणा, पवई लेक वगैरे. पण

मोडक सागर हे अस्सल मराठी नाव का दिलं गेलं असेल या विषयी माझ्या मनात जबरदस्त कुतूहल होत.

पूर्वी देशातील बहुतेक मोठी धरणे ब्रिटिशांनी बांधलेली असायची, म्हणजे ज्याला आपण भंडारदरा धरण म्हणतो तो पूर्वी विल्सन डॅम म्हणून ओळखला जायचा. कदाचित विल्सन नावाच्या गोऱ्या ईंजिनियरने तो बांधला असावा. आपल्याकडे तर सर्रास रस्ते, शाळा, मार्केट, रेल्वे स्टेशन, एअरपोर्टपर्यंत सगळ्यांचीच नामकरणं झाली आहेत. त्यात राष्ट्रपुरुषांपासून अनेक महान व्यक्तींची नावं देण्यात आली आहेत. पण त्या मानाने धरणांची तेवढी बारशी झाली नव्हती. तर आत्ताचं मोडक सागर म्हणजे पूर्वीचं लोअर वैतरणा जवळजवळ शंभर-सव्वाशे वर्षांहूनही अधिक काळ अस्तित्वात आहे.

ब्रिटीशांच्या काळात ते किमान दोन-तीन वेळा दुरुस्त करून घ्यायला लागलं होतं. परंतु, महापालिकेच्या पाणी खात्याकडे हे जेंव्हा वर्ग करण्यात आलं त्यामुळे ती जबाबदारी आता महापालिकेवर आली. १९५४ साली मुंबई महापालिकेत



नारायण मोडक हे सिटी ईंजिनियर म्हणून या सगळ्याचा कारभार सांभाळत होते. नानासाहेब मोडक हे त्यांचं टोपण नाव. त्या सिटी इंजिनियरच्या पदावर काम करत असताना महानगराला बारा महिने पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी त्यांच्या खात्याकडे होती. त्यामुळे काही धरणं आणि पाण्याचे मोठे तलाव जे महापलिकेच्या मालकीचे होते, इतर धरणातून महापालिकेला राज्य शासनाकडून पाणी हिश्याचे असेल, ते पैसे द्यायला लागत असत. तेंव्हा नानासाहेबांनी १९५४ साली हे स्व:मालकीचं धरण असल्याने ते पूर्णपणे दुरुस्त आणि पुनर्बांधणी करण्याचं ठरवलं. हे धरण तसं खूप जुनं होतं आधी आपण म्हंटलच. नानासाहेबांच्या या योजेनेला महापालिकेचे आर्थिकपट मिळण्यासाठी त्यांनी जोरदार फिल्डिंगही केली.

जेंव्हा ठराव मंजूर झाला तेंव्हा कंत्राटदार नेमन्यापासून हे आव्हानात्मक काम पूर्ण करण्यासाठी नानासाहेबांनी तिथे तळच ठोकला. अखेर, त्यांच्या या प्रयत्नांना यश येऊन हे काम यशस्वी झालं आणि हे धरण, ही जलसंपदा महापालिकेच्या मालकीची कायमची झाली. त्यांच्या या कर्तृत्वाची दखल घेऊन त्याचे नामकरण मोडक सागर असे करण्यात आले. कदाचित एखाद्या कुशल इंजिनियरच नाव असलेलं देशातलं हे एकमेव धरण असू शकतं. या मोडक सागर स्थळावर आजही एक शिलालेख आहे, आणि नानासाहेब मोडक यांचा पुतळासुद्धा आहे. आजकाल पुतळ्यांची गर्दी सगळीकडे वाढत चाललेली आपण बघत असतो, त्याठिकाणी नानासाहेब मोडक या इंजिनियरचा पुतळां असणे ही एक अभूतपूर्वं आणि विलक्षण गोष्ट आहे. समाज त्या काळी किती समंजस होता, हे ही महत्वाचं आहे. आपण हे सगळं बघत असताना जे पुढे आपण जातो त्यामुळे कदाचित आपल्या लक्षात येईल की १९५४ ते २०२०, म्हणजे जवळ जवळ ६५ वर्षे हा जलसागर सुरक्षित आहे.

१९२० नंतर स्वातंत्र्य चळवळीला जोर आला. त्यामुळे ब्रिटिशांचा भारतातील धरणबांधणीच्या कार्यक्रमातील रस संपला. म्हणून १९२० ते ५० अशी तीस वर्षे फारसे विकासाचे काम इंग्रजांनी हाती घेतले नाही. स्वातंत्र्यानंतर मात्र विकासाच्या गरजांचा विचार करता कामे हाती घेणे गरजेचे होते. आत्तापर्यंत सगळी कामे मुंबई बेट केंद्रित करून त्यावरच करण्यात आली होती. नारायणराव मोडक यांनी पहिल्यांदा या बेटाच्या बाहेर जंगलातल्या जागी जाऊन सर्व्हेक्षण करणे, आराखडा करणे, धरण बांधणे ही सर्व कामे केली. या धरणासाठी तर पाठपुरावा केलाच पण अन्य खूप विकासाची कामेही केली. यातले एक उल्लेखनीय काम म्हणजे मरीन लाईन्सची नेकलेस सारखी उभारणी. आजही रात्रीच्या वेळी विजेच्या झगमगाटात हा हार किती सुंदर दिसतो हे मी तुम्हांला सांगण्याची गरज आहे का? हा हार ही देखील नारायणराव मोडक यांचीच निर्मिती आहे.

पाणी हे जीवन आहे असं म्हणतात, त्या संजीवनाचे निर्माते म्हणून नारायणराव मोडक हे एका सेवाव्रती ईंजिनियरच निमित्ताने स्मरण होतं, ही फार मोठी गोष्टं आहे. कर्तृत्वाला सलाम करण्याची आजकाल क्षीण होत चाललेली संवेदना, संवेदनेची ही ज्योत सतत पेटती रहावी एवढीच नारायणराव मोडकांच्या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

